MBVA

२०१७ • अंक १२

# गृहबंध

## मराठी बांधकाम व्यावसायिक असोसिएशनचे मुखपत्र

खासगी वितरणासाठी



## दिवाळी विशेष

THE HOTTEST BUZZ IN AUNDH!



THE BUSINESS HIVE

It's a Premium Project by

LIFE PROPERTIES
A Chandrakant Kele Venture

The preferred, upmarket locality of Aundh is soon to get its very own exclusive complex, ideal for businesses of repute.

On offer are Premium Retail and Offices Spaces, thoughtfully designed and future-ready, that represent a one-of-its-kind investment opportunity for those with a vision.

Do plan a discussion. Call +91 7709080808 / 7709060606.


MAHA RERA Regn. No. P52100004333



एक असं घर जिथं निसर्गसुद्धा
तुमच्या घराचा अविभाज्य भाग असेल!
ध्रुव
just iconic !
@ पुनावळे
१ आणि २ बीएचके टेरेस फ्लॅटस्
रेरा रजि. नंबर : P52100000555
सोनचाफा
Blend of Career & Family !
@ वाकड
रेडी पझेशन ३ बीएचके टेरेस फ्लॅटस्, शॉप
वाकड–हिंजेवडी मेन रोड, वाकड
संगम Ph II
Fusion of Good Things!
@ सूस–बाणेर
रेडी पझेशन
१ आणि २ बीएचके टेरेस फ्लॅटस्
द प्रेस्टिज अ‍ॅव्हेन्यू
COMFORT FIT HOMES
@ बाणेर–पाषाण लिंक रोड
२, २.५, ३, ३.५ बीएचके टेरेस फ्लॅटस् ऑफिसेस्, शॉप्स्
रेरा रजि. नंबर : P52100001856
सदाफुली Ph III
A Home with 'Puneri Touch'
@ बाणेर–बालेवाडी
रेडी पझेशन ३ बीएचके टेरेस फ्लॅटस्
देवराई
Grow with nature...
@ किवळे–रावेत
रेडी पझेशन २ बीएचके टेरेस फ्लॅटस्,
ऑफिसेस, शॉप्स्
यश्विन
जीवन ऑर्किड
@ सूस–बाणेर
२ बीएचके टेरेस फ्लॅटस्
रेरा रजि. नंबर : P52100000011
यश्विन
आनंद ऑर्किड
@ सूस–बाणेर
२ बीएचके टेरेस फ्लॅटस्
रेरा रजि. नंबर : P52100000012
(020) 2543 4021, 2545 4757, 088888 53127, 099224 46975
sales@sanjeevanideve.com, www.sanjeevanideve.com
Sanjeevani
Group
Think Green, Think Life



५
तेजातून उजळो उद्यमी भवताल!
अध्यक्षीय



७
आव्हानांचा वेध घेताना...
प्रमोद चौधरी

१०
Understanding 'UD'
Sanjay Deshpande

१२
बांधकाम कामगार कौशल्यविकास
आर. बी. चाफळकर



१३
Are we Building for all ?
Kavita Murugkar

१६
२०२५ मधील माझं शहर...
प्रभा कुडके



२०
कवितेतलं घर
प्रवीण दवणे



२२
कानोसा... बदलत्या समाजजाणिवांचा!
संजय सोनवणी



२८
सावध ऐका पुढल्या हाका...
संजय नहार



३१
जग! चौकटीबाहेरचं, मनात सामावलेलं!
सचिन ईटकर

३४
महाराष्ट्राच्या शेतीचे भवितव्य
सुनील चव्हाण

३६
रेरा-बांधकाम प्रकल्पाचे अंदाजपत्रक व प्रमाणपत्र

३८
जीएसटीअंतर्गत विक्रीवरील परिणाम व अर्थलाभ

४०
वसुंधरेचं धन...वृक्षारोपण!

४१
जीएसटीचा वेध घेताना...

४२
Impact of Revised Earthquake Design Codes on Building



४३
वार्षिक सर्वसाधारण सभा २०१६-१७



४६
तिसऱ्या जगाची एक अद्भूत सफर..!
मोहन कलाटे

५०
News Track



**गजेंद्र पवार**
अध्यक्ष, एम.बी.व्ही.ए.
gajendra@mbva.in

# तेजातून उजळो उद्यमी भवताल!

**सभासद बंधू-भगिनींनो,**

**आपणा सर्वांना दीपावलीच्या शुभपर्वानिमित्त हार्दिक शुभेच्छा! प्रत्येकाच्या अंतःकरणामधील तेजाचा अंश हे दिवाळीचे पर्व आणखी उजळून काढो. आपल्या तेजस्वी जाणिवांतून प्रसारित होत ही तेजोकिरणे आपला भवताल आणखी लखलखीत करोत, अशी सदिच्छा व्यक्त करतो.**

मराठी बांधकाम व्यावसायिक असोसिएशन (एमबीव्हीए)च्या माध्यमातून मराठी उद्योजकांना, विशेषतः जे बांधकाम व पायाभूत विकासक्षेत्रात कार्यरत आहेत अशा शेकडो उद्योजकांना आपण एका सूत्रात बांधलेले आहे. हे सूत्र आहे स्नेहाचे, सहकार्याचे, अनुभवाचे, उमेदीचे आणि भविष्यवेधी जाणिवांचे. एमबीव्हीएच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांद्वारे हेच सूत्र आणखी भक्कम करण्याचा आपला प्रयत्न असतो आणि सर्वांच्या सहकार्याने ही वाटचाल उत्तमरीत्या सुरू आहे. मात्र, काळाची हाक लक्षात घेता, आपण आणखी गती घ्यायला हवी, असे मला प्रकर्षाने वाटते, जाणवते आणि त्या दृष्टीने होत असलेल्या प्रयत्नांना आपली आजवर लाभली तशीच साथ लाभेल, याबाबत खात्री आहे.

नोटाबंदी, जी.एस.टी. यासारखे अर्थव्यवस्थेवर मूलभूत परिणाम करणारे निर्णय झाल्यानंतरची ही पहिलीच दिवाळी. आधीच आव्हानांशी लढत असणाऱ्या बांधकाम क्षेत्राला बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेताना जरासा वेळ लागतो आहे आणि ही गोष्ट स्वाभाविकही आहे. मोफा, रेरा यासारखे कायदे, नियम या क्षेत्राला ढवळून काढणारे आहेत. या नियम-कायद्यांमागील उद्देश नक्कीच चांगला आहे; मात्र त्यातील काही तरतुदी (या व्यवसायासाठी अगदीच नवीन असल्याने) रुजण्यास, रुळण्यास काहीसा वेळ लागू शकतो. आपण व्यावसायिकांनी त्यांचे सखोल आकलन करून त्यानुसार व्यवसायातील व्यवहाराच्या पद्धतीमध्ये बदल घडविणे अपेक्षित आहे. आपल्यातील अनेकांनी त्या दिशेने पावले उचलली आहेतच. सर्वसामान्य ग्राहकांशी आपली बांधिलकी ही आहेच आणि त्यांच्या हितासाठी जे-जे प्रयत्न होतील, त्याला आपण नेहमीच पाठिंबा देत असतो. या पार्श्वभूमीवर, नवीन नियम-कायदे म्हणजे या व्यवसायाच्या भवितव्यासाठी चांगल्या सुधारणा करण्याची संधी ठरेल, अशा भावनेतून आपण कार्यरत आहोत. अर्थात, अवास्तव अथवा अप्रस्तुत वाटणाऱ्या बाबी आपण संबंधित घटकांना कळवून, त्यांच्याशी संवाद साधून, त्याचा पाठपुरावा करीत धोरणकर्त्यांच्या निदर्शनास आणू शकतो आणि त्यास नक्कीच यश मिळू शकते. नोटाबंदीचा तत्कालीन परिणाम अनेक व्यवसायांवर जसा झाला, तसा आपल्या क्षेत्रातही नक्कीच दिसून आला. मागणी व पुरवठा यांत बरीच तफावत निर्माण झाल्याचे चित्र पुढे आले, जे नक्कीच या क्षेत्राच्या प्रगतीच्या दृष्टीने सकारात्मक नव्हते. मात्र, त्याचबरोबर परवडणाऱ्या घरांकरिता केंद्र सरकारने हाती घेतलेल्या योजना, बँकांकडून गृहकर्जाच्या व्याजदरात होणारी कपात, रेरासारख्या कायद्याने ग्राहकांच्या मनात गुंतवणुकीसाठी निर्माण होत असलेला विश्वास या बाबीदेखील लक्षात घ्यायला हव्यात. बदलत्या या सर्व साधक-बाधक बाबींचे विश्लेषण आपल्या व्यवसायाच्या संदर्भात करून घेतले गेले, तर आव्हानांचेही संधीत रूपांतर होऊ शकते. तसे करण्याची आपली क्षमता आहे. मुंबई, पुणे, नागपूर येथे मेट्रोचे प्रकल्प, पुण्यात रिंगरोड प्रकल्प आकारास येऊ घातले आहेत आणि त्यातून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेबरोबरच पायाभूत क्षेत्राचाही झपाट्याने विकास होऊ शकतो. ही सारी परिस्थिती आपल्या विकासकेंद्रित व्यवसायासाठी अनुकूलता घेऊन येणारी आहे, असे मला येथे आवर्जून नमूद करावेसे वाटते.

**आपणा सर्वांना प्रकाशपर्व दीपावली आणि त्यानंतर येणाऱ्या नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा. आपली उद्यमशीलता या काळात आणखी उजळून निघो आणि नव्या तेजोमय पर्वाचे आपणा सर्वांच्या आयुष्यात सुखद आगमन होवो!**





**नितीन ढेपे**
संपादक
mbvabulletin@gmail.com

# मन उजळू दे, जग उजळेलच!

नमस्कार!

**प्रत्येकाच्या अंतःकरणाच्या गाभाऱ्यामध्ये एक तेजस्वी ज्योत तेवत असते. आतील अथवा बाह्य जगात जेव्हा-जेव्हा आव्हानरूपी अंध:कार पसरू लागतो, तेव्हा-तेव्हा आपल्या मनातील ही तेजस्वी दिव्याची जाणीव करून देणारे पर्व म्हणजेच दिवाळी येते. सर्वप्रथम मन उजळायला हवे, जग आपोआप उजळून जाते, हाच दिवाळीचा खरा संदेश. आपणा सर्वांना या संदेशाचे स्मरण करून देणे, यालाच मी दिवाळीच्या खऱ्या शुभेच्छा मानतो.**

मराठी बांधकाम व्यावसायिक असोसिएशन (एमबीव्हीए)चे मुखपत्र असलेल्या 'गृहबंध'ने व्यावसायिकांना व्यक्त होण्यासाठी प्रभावी माध्यम तर देऊ केलेच; शिवाय समाजातील विविध क्षेत्रांमधील मान्यवरांच्या सहभागातून कसदार साहित्यही पुढे आणले आहे. यंदाचा दिवाळी अंकदेखील याच परंपरेला पुढे घेऊन जातो आहे, हे सांगताना मला मनस्वी आनंद होतोय. यंदाच्या अंकामध्ये भविष्याचा वेध घेऊ पाहणाऱ्या मान्यवरांच्या विचारांना विशेष स्थान देण्यात आले आहे. एमबीव्हीएचे मार्गदर्शक तथा मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष प्रमोद चौधरी, सीमावर्ती राज्यांमध्ये कार्यरत सरहद संस्थेचे संस्थापक संजय नहार, समाजचिंतक लेखक संजय सोनवणी, स्ट्रॅटेजिक फोरसाईट ग्रुपचे वरिष्ठ सल्लागार सचिन ईटकर, प्रसिद्ध कवी-लेखक-गीतकार प्रवीण दवणे, आर्किटेक्ट कविता मुरूगकर, कृषी अभ्यासक व मुक्त पत्रकार सुनील चव्हाण अशा मान्यवरांच्या सहभागाने अंकाचे वाचनमूल्य बहरले आहे. बांधकाम क्षेत्राबाहेरही लेखक-वाचक लाभलेल्या आपल्या गृहबंधची संग्राह्यता यामुळेच जपली जाते. आमच्या विनंतीस मान देऊन सहभागी मान्यवरांनी आत्मीयतेने आपला लेखन सहभाग दिला, त्याबद्दल त्यांचे आभार मानणे मला महत्त्वाचे वाटते.

वाचकहो, खरं सांगायचं तर दिवाळी अंक ही संकल्पना काळानुरूप खूप बदलली आहे. पूर्वी फराळासमवेत दिवाळी अंकांचे वाचन ही एक प्रकारची परंपराच होती. अलीकडे टीव्ही, इंटरनेट, मोबाईल अशा साधनांनी या जुन्या परंपरेला मागे सारले असले, तरी दिवाळी अंकांची प्रतिष्ठा मात्र वाचकांच्या मनात कायम आहे. मराठी वाचनसंस्कृतीमध्ये दिवाळी अंकांना आजही विशेष स्थान आहे, ही नक्कीच समाधानाची बाब आहे. बांधकाम व्यावसायिकांच्या संघटनेचे मुखपत्र असलेले गृहबंध हे मुख्य प्रवाहातील दिवाळी अंकांच्या तुलनेत दर्जा, विषयांत वैविध्य आणि निर्मितिमूल्य आदींच्या बाबतीत नक्कीच वाचकांना सुखद अनुभव देईल, याची आम्हाला खात्री वाटते. अर्थात, या सर्वांत आपण आजवर दिलेली भरभक्कम साथ, मनोमन सहकार्य व सहभाग यांचा मोठा वाटा आहे. एमबीव्हीएला समाजाशी जोडण्याचे अनमोल कार्य यातून घडते आहे आणि तेच या प्रयत्नांचे मोठे यश असेल.

**शुभपर्व दिवाळी व त्यांनतर येणारे नववर्ष आपणा सर्वांच्या आयुष्यात आनंदाच्या, प्रसन्नतेच्या सुखद अनुभवांची मालिका घेऊन येवो, हीच शुभेच्छा!**





**प्रमोद चौधरी**
संस्थापक,
प्राज इंडस्ट्रीज लि.



# आव्हानांचा वेध घेताना...

**जैवऊर्जा संबंधित तंत्रज्ञान व यंत्रसामुग्रीमध्ये अग्रगण्य समजल्या जाणाऱ्या 'प्राज इंडस्ट्रीज' समूहाचे संस्थापक अध्यक्ष श्री. प्रमोद चौधरी हे उद्योगजगतातील आदरणीय व्यक्तिमत्त्व. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज् ॲण्ड ॲग्रिकल्चरचे अध्यक्षपदही ते सध्या भूषवीत आहेत. तरुणांमध्ये उद्योजकतेची ओढ निर्माण व्हावी यासाठी आग्रही असतानाच उद्योग व उद्योजकांसाठी दिशादर्शन करणाऱ्या विविध संकल्पना चेंबरच्या माध्यमातून त्यांनी हाती घेतल्या आहेत. उद्योजकता, त्यातील सध्याची आव्हाने आणि भविष्यातील संधी यांचा मागोवा घेणारे त्यांचे चिंतन निश्चितच नवा विचार देऊन जातात. शाश्वत विकास व तो साध्य करण्यासाठी कशाचा अवलंब करता येईल, यावर त्यांनी केलेली मांडणी एकूणच उद्योगविश्वासाठी मार्गदर्शक ठरते.**

## उद्योगात आहात... प्रगतीचं काय?

प्रगतीकडे वाटचाल करायची असेल तर उद्योजकाला मी, माझा व्यवसाय मोठा कसा बनू शकेन, असा अस्वस्थ करणारा प्रश्न पडायला हवा. उद्योग सुरू करणे ही बाब अलीकडे निश्चितच सोपी झालेली आहे. कारण त्यासाठी आवश्यक अशी अनुकूलता, विविध योजना तसेच सुविधा आता आहेत. मला आठवतं, २५-३० वर्षांपूर्वी उद्योग सुरु करणं म्हणजे अतिशय मोठी जोखीम समजली जायची. एक प्रकारे तो अस्तित्वाचा लढा असायचा. त्या तुलनेत अलीकडे सर्वसाधारण उद्योजकता बऱ्याच प्रमाणात सोपी झालेली आहे. इथेही जोखीम जरुर आहे, मात्र त्यातील तीव्रता, अस्तित्वाची भीती बऱ्याच अंशी कमी आहे. आपल्या व्यवसायात आणखी गती कशी आणता येईल, त्याची व्याप्ती कशी वाढवता येईल हे विचार जोवर तुम्हाला अस्वस्थ करीत नाहीत, तोवर तुम्हाला मोठं म्हणावं असं यश हाती लागणार नाही. मर्यादित यशावरच समाधान मानावे लागेल. उद्योजकाने अशा मर्यादांमध्ये स्वतःला बांधून घेऊ नये, असं मला वाटतं. मी जेव्हा जेव्हा उद्योजकांशी संवाद साधतो तेव्हा बहुतांश जणांना प्रगती कशी साध्य करता येईल, हाच मुख्य प्रश्न अधिक भेडसावत असतो. व्यवसायात प्रगती साध्य करायची असेल तर व्यावसायिकाला नवीन (ज्याला इंग्रजीत नीश् म्हटलं जातं) असे क्षेत्र निवडावे लागेल. कारण सर्वसाधारण क्षेत्रात, बाजारपेठेत मोठी स्पर्धा आहे. अर्थात, नीश् ओळखता येणं हा अनेकदा नशीबाचाही भाग ठरतो. या पार्श्वभूमीवर, उद्योजकाला व्यवसायामधील यू.एस.पी. (युनिक सेलिंग प्रपोझिशन) काय आहे, हे समजून घ्यावं लागेल. यू.एस.पी. म्हणजेच ग्राहकांना आकृष्ट करणारे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य.

### ब्रँड कसा निर्माण होतो?

उद्योजक, व्यवसायाच्या विश्वासार्हतेवर ग्राहकांच्या मनात तयार होणारी अनुकूल प्रतिमा म्हणजे ब्रँड होय. कंपनीचे उत्पादन, त्याच्याशी निगडीत सेवा, कंपनीची एकंदर उल्लेखनीय कामगिरी याचा सातत्यपूर्ण, चढता आलेख त्या कंपनीचा ब्रँड ग्राहकांच्या मनात ठसण्याच्या दृष्टीनं खूपच महत्त्वाचा ठरतो. माझ्या 'प्राज' या कंपनीतील व्यवसायवृद्धी विभागातील सहकारी जेव्हा एखाद्या ग्राहकाकडून प्रथमच ऑर्डर आणतात तेव्हा तो संधी मिळण्याचा भाग आहे, असं मी मानतो. मात्र, जेव्हा त्याच ग्राहकाकडून पुन्हा एकदा मागणी (रिपीट ऑर्डर) येईल, तेव्हाच ते यश म्हणता येईल, असं मला वाटतं. कारण पुन्हा ऑर्डर तेव्हाच येईल, जेव्हा कंपनी ग्राहकाला उत्तम सर्वांगीण सेवा देईल. विश्वासार्हता म्हणजे केवळ चांगली सेवा देणंच नव्हे तर ग्राहकाला अशा सेवेमुळे चार पैसे जास्त नफा मिळायला हवा. ग्राहकाची प्रथम पसंती व दोघांची प्रगती हे उद्योजकाचे स्वप्न असायला हवे. ग्राहकाची प्रगती झाली की आपसूकच व्यवसायाची तसंच उद्योजकाचीही प्रगती होते. ग्राहकाच्या अशा विश्वासातूनच व्यवसायाचा ब्रँड कायम होतो.

### शहरीकरण आणि आव्हानं

शहरीकरण (अर्बनायझेशन) म्हणजे एक प्रकारचा राक्षसच. आगामी काळात हे एक फार मोठे आव्हान असणार आहे. शहरांमधील लोकसंख्या ज्या प्रमाणात वाढते आहे, त्या प्रमाणात अर्थपूर्ण, दर्जेदार रोजगार निर्माण होणे हे सद्यस्थितीत मोठे आव्हान आहे. शहरांमधील मुळातच मर्यादित असणाऱ्या पायाभूत सुविधांवर वाढत्या विस्तारामुळे मोठा ताण येतो आहे. ग्रामीण भागातून शहराकडे स्थलांतरित होण्याचा वेग वाढतो आहे. या परिस्थितीचा वेळीच सामना करायचा असेल तर ग्रामीण भागात रोजगारनिर्मितीवर विशेष भर देणे ही काळाची गरज आहे. ग्रामीण भागामध्ये काम करताना मिळणारे अल्प उत्पन्न आणि अन्य अडचणी हे या स्थलांतरामागील मुख्य कारण आढळते. ग्रामीण तरुणांच्या हातास कामच मिळाले नाही, तर त्यातून चिंताजनक स्थिती निर्माण होऊ शकते, असे मला वाटते. शहरीकरण हा या समस्येवरील उपाय ठरू शकत नाही. ग्रामीण भागात चांगले उत्पन्न मिळवून देणारी रोजगारनिर्मिती त्यासाठी अत्यावश्यक ठरते. ग्रामीण उद्योजकता या कल्पनेचा पाठपुरावा झाला पाहिजे.


### शहरणीकरण - संधीदेखील

बांधकाम व पायाभूत विकास क्षेत्रात काम करणाऱ्या उद्योग व उद्योजकांसाठी शहरीकरण ही नक्कीच मोठी संधी आहे. शहरांच्या वाढत्या विस्ताराबरोबरच भविष्यातील गरजा लक्षात घेता विस्तारित परिसरांमध्ये टाउनशीपच्या माध्यमातून होऊ घातलेला विकास नक्कीच महत्त्वाचा आहे. माझ्या दृष्टीने, उद्योगांनी ग्रामीण भागात जाणे आणि तिथेही टाउनशीपसारखे प्रकल्प मोठ्या प्रमाणात उभारणे अधिक गरजेचे आहे. यातून रोजगारनिर्मिती तसेच उद्योगांनाही अधिक संधी उपलब्ध होऊ शकतात. बांधकाम व्यवसायाचा विचार करता, परवडणाऱ्या गृहप्रकल्पांना मिळणारे प्रोत्साहन ही नक्कीच उत्तम संधी आहे. कृषीप्रधान उद्योगांचा विकास वेगाने झाला तर स्थानिक रोजगारनिर्मितीला चालना तर मिळेलच शिवाय पर्यावरण व विकासाचा

## आव्हानांकडून शाश्वत विकासाकडे... व्हाया इनोव्हेशन!

शाश्वत विकास, ज्याला इंग्रजीत Sustainable Development असे संबोधले जाते, तेच कोणत्याही देशाच्या सर्वांगीण प्रगतीचे मुख्य सूत्र ठरते. जगात, विशेषतः भारताचा विचार करता आपल्यापुढे अनेक आव्हाने उभी आहेत, भविष्यात त्यांची तीव्रताही आणखी वाढू शकते. त्यांचा विचार करता, शाश्वत विकास हेच सर्व समस्यांचे उत्तर असल्याचे लक्षात येते. याचा अभ्यास करून मी एक थेअरी मांडलेली आहे. यामध्ये प्रामुख्यानं आपल्यापुढची नेमकी आव्हाने, शाश्वत विकास प्रक्रियेतील तीन मूलभूत घटक आणि असा विकास साधण्यासाठीचे नेमके उपाय यांची उकल होऊ शकते. केवळ उद्योगच नव्हे, तर कोणत्याही माध्यमातून होऊ घातलेल्या शाश्वत विकासासाठी ही मांडणी उपयुक्त ठरू शकते.



समतोलही राखता येऊ शकतो. ग्रामीण भागात उद्योगनिर्मितीसह टाउनशीप उभ्या राहणे, त्यासाठी पायाभूत सुविधांचे विकेंद्रीकरण होणे हा भविष्यातील आव्हानांवर मात करण्याचा उत्तम मार्ग असू शकतो.

## मूल्यनिर्मिती झाली तरच उद्योगचक्र फिरेल!

स्मार्ट सिटी, मेक इन् इंडिया असे विविध उपक्रम केंद्र सरकारच्या वतीने हाती घेण्यात आलेले आहेत. ते अर्थातच स्वागतार्ह आहेत. मात्र अजूनही ते प्राथमिक अवस्थेत आहेत. ते परिपक्व होऊन पूर्णत्वास येण्यासाठी आणखी वेळ द्यावा लागेल. आजवर भारताचा सेवा क्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर भर होता. त्यात आपण चांगली प्रगतीही केली. हॉटेल्स, मॉल्स येथे चांगल्या प्रमाणात व्यवसाय चालू असल्याचं दिसतं. मात्र, मूल्यनिर्मिती (व्हॅल्यू क्रिएशन) उत्पादनक्षेत्रातच होते. सेवा क्षेत्र पैशाला एकातून दुसऱ्या प्रकारात रूपांतरित करते. उत्पादन क्षेत्रात, मात्र प्रत्येक टप्प्यामध्ये मूल्यनिर्मिती होत असते. थोडक्यात, जो जे काही नवे तयार करतो, ज्यातून काही निर्मिती होते त्यातून प्रत्येक टप्प्यात, प्रत्येक सहभागी घटकास त्याचा लाभ होतो. दृश्य (टँजिबल) स्वरूपातील निर्मिती ही मूल्य तयार करते आणि त्यातून आर्थिक चक्रास चालना मिळते. म्हणून, मूल्य निर्मिती होणाऱ्या उद्योगांच्या विकास आणि विस्ताराची मोठ्या प्रमाणात गरज आहे. सध्या रोजगाररहित विकासाची (जॉबलेस ग्रोथ) शक्यता अर्थकारणाच्या आणि शाश्वत विकासाच्या दृष्टीने अस्वस्थता निर्माण करणारी बाब आहे. उत्पादन क्षेत्राला प्रोत्साहन देण्याचे केंद्र सरकारचे धोरण स्वागतार्ह असले तरी वास्तवात ऑटोमोबाईल क्षेत्राचा काही अपवाद सोडता आपल्या येथील खाजगी गुंतवणुकीचा ओघ इतरत्र फारसा वळताना दिसत नाही आणि त्यामुळे उद्योगचक्र वेगाने फिरताना आढळत नाही. त्यातून सर्वंकष विकास मंदावतो. यातून लवकरात लवकर मार्ग काढायला हवा, असे मला वाटते.

उद्योजकतेला सातत्यानं प्रोत्साहन दिलं जाणं, त्यासाठी अनुकूल पार्श्वभूमी तयार होणं ही कोणत्याही राष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी आवश्यक बाब असते. उद्योगी समाज हा कायम सकारात्मक असतो आणि ही सकारात्मकताच अर्थव्यवस्थेत ऊर्जा भरत असते. शाश्वत विकास हाच व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांच्या सर्वांगीण प्रगतीकडे नेणारा राजमार्ग आहे. त्या दिशेनं प्रवास करण्याची इच्छाशक्ती, ऊर्मी प्रत्येकात हवी.

(शब्दांकन : संतोष देशपांडे)

### आव्हानं (Challenges)

सुरक्षितता (Security)-
अन्नसुरक्षा, ऊर्जासुरक्षा या अर्थानं.
टंचाई (Scarcity)-
पाणीटंचाई किंवा पायाभूत सुविधांची कमतरता
विस्तारक्षमता (Scalability)-
विस्तारक्षमता म्हणजे व्यवसायाची व्याप्ती वाढविण्याची क्षमता.

वर्तमानातील आव्हानांवर मात करतानाच भविष्यात भेडसावू शकणाऱ्या वरील दीर्घकालीन आव्हानांचा विचार उद्योगांना करावा लागेल.

### संरचना (Framework)

वरील आव्हानांवर मात करत शाश्वत विकास साध्य करण्यासाठी तीन मुख्य घटकांवर लक्ष केंद्रित करावे लागेल. त्यांच्या रचनेला सस्टेनेबिलिटीचे '३ पी' असं मी मानतो. हे तीन घटक म्हणजेच:

१. नफा (Profit)-
   व्यवसाय, आर्थिक उत्पन्न इ.
२. परिसर (Planet)-
   भोवतालचा परिसर, पर्यावरण
३. समाज (People)-
   आपण ज्याचा अविभाज्य भाग आहोत तो समाज, लोकसमूह

शाश्वत विकास साध्य करण्यासाठी तुम्ही या तिन्ही बाबींचा समतोल राखायला हवा. प्रॉफिट म्हणजेच पैसा कमावताना तुम्ही प्लॅनेट आणि पीपल यांना ओढत नाही, हे फार महत्त्वाचं आहे. भविष्यकालीन आव्हानांचा वेध घेतानाच उपरोक्त साध्यांकडे जाण्यासाठीचे मार्ग अथवा रचना (फ्रेमवर्क) विकसित होणं अत्यंत आवश्यक ठरते.

### उपाय (Solution)

वर दिलेल्या संरचनेमधील घटकांचा विचार करून व आव्हानांवर मात करून शाश्वत विकास घडविण्यासाठी काही उपाययोजना अमलात आणल्या पाहिजेत. हे उपाय म्हणजेच:

१. शिक्षण (Education)
२. नावीन्य (Innovation)
३. उद्योजकता (Entrepreneurship)

या उपायांचा अवलंब करून शाश्वत विकास केल्यास उद्योगाला चालना मिळू शकते. या संरचनेमध्ये नावीन्य म्हणजेच Innovation हे केंद्रस्थानी आहे. उपरोक्त आव्हानांचा वेध घेण्यासाठी आगामी काळात शिक्षणाबरोबरच नावीन्य आणि उद्योजकतेलाही गतीनं चालना दिली जाणं आवश्यक आहे. त्या दृष्टीनं सुनियोजित प्रयत्न गरजेचे आहेत. एक अशी व्यवस्था निर्माण होणं गरजेचं आहे, जी भविष्यातील आव्हानांचा वेध घेण्यासाठी आवश्यक कौशल्यांचा विकास करेल. त्यासाठी अनुकूल पार्श्वभूमी तयार करेल. शिक्षण क्षेत्रात त्यासाठी विशेष भर द्यायला हवा. विद्यार्थ्यांमधील कौशल्यांना विकसित करतानाच त्यांच्यातील कल्पकतेलाही वाव त्यातून मिळायला हवा. इनोव्हेशनला खरा अर्थ तेव्हाच प्राप्त होतो, जेव्हा त्याचं उत्तमरीत्या उपयोजन (ॲप्लिकेशन) होऊ शकतं व समाज हा त्याचा अंतिम लाभार्थी असतो.



**Sanjay Deshpande**
Developer

# Understanding 'UD'



> *Cities have the capacity to provide something for everybody, only because & when they have been created by everybody*
>
> *Jane Jacobs*

When it's planning of cities then the name Jane Jacobs is immortal one as hundreds of such quotes are not mere words but have become back bone of city planning which unfortunately we have named as urban development, more popularly known as Urban Development in our State Govt., short formed as just UD! Well, the mere mention of the word UD makes media enticed by the thought of gossip it holds, developers/ politicians/ beurocracy gets excited by the money it spins & common man gets nervous because of the outcome it generates! That's way UD is always in lime light, (though mostly for wrong reasons) but when a powerful minister in Center of the ruling Govt., makes accusations about its poor performance or working, then like "kahani me twist", many eye brows get lifted up thinking what's next? Before 90's UD was never much in demand as whatever urban development this State has, it was restricted to Mumbai & Pune & this was the scene till late 80's or early 90's. Obviously then the UD ministry or the department was always considered as less important & its responsibility was given to some grade two or three level minister to look after. Ours was agriculture based State & most CM's were from rural as well the policies & budget of the State used to move around departments like irrigation, agriculture, rural development & roads, that's it. Very few even knew till late 80"s about existence of UD but come 90's & first time the then CM i.e. Manhohar Joshi (needless to tell he himself was a builder) kept the charge of UD with him as he very well understood the power of UD in reference to changing future of State & its towns as well larger cities. And since then UD has never looked back & has become such a star department that every CM has kept the charge of this dept. with himself. Irony is most of them had to leave the CM'ship itself, because of not by poor management of the State but because of the scandals in UD!

Now let's see what brings such glamour to UD that even the CM couldn't resist to let it go to someone else; in one simple word the one who controls the life of the people he is God & with majority population (read voters) moving to the cities, it's the UD which holds control over lives of these millions of people in cities. And then with conversion of villages to towns, towns to cities & cities to Metros, urbanization becomes the buzz word like famous "Gold Rush" in USA, as today the land itself has become gold. Naturally, as its UD which controls every policy related to the land use, soon it became a big money churner in many ways, for the Govt. as well any of those who has been associated with this Dept. For this, we need to understand the structure of this entire land related matter in the cities as well towns of our State. The need of having urban development started way back as when we realized that no more we are a community living in villages which mostly depended on natural resources. Obviously, the population was less so the resources like water, shelter (read homes), roads etc., were sufficient for the then population. There was no question of industries or IT parks type developments & most of the transportation was on feet or by bullock carts, so parking wasn't an issue at all, in short whatever problems we face of our modern times infrastructure today, all were unheard of.

But as the industrialization grew, that brought along large scale migration of people at one place & then there was dire need of managing infrastructural need of this population & for that there has to be an organization which would study the population, its needs & a plan of the land use for all such essential infrastructure. In a way every piece of land which comes under expand of any

town, city or Metro (very large city like Mumbai) in this State, its use is decided by UD. Though these towns or cities are governed by local bodies, for e.g. there is PMC in Pune or we have Nagar Parishad in town like Baramati, depending up on the population of these towns/ cities. And all these local bodies have their own set of rules which are called as Development Control rules i.e. DC rules which they has to get clearance from UD. For this UD has town planning dept (call as arm of UD) which governs land use of the lands which doesn't comes under in municipal corporation or civic body such as Nagar Parishad. The Director of Town Planning is like supreme authority or consultant to UD for any dispute regarding land use or DC rules for any civic body in State. The UD has two IAS officers as well a set up in Mantralay (Ministry), in Mumbai & head is Cabinet level minister which since last many years is Hon Cm himself. Now you can understand the importance of UD in today's times as every sq. inch of land's use (read potential) is decided by the UD, which in a way means fate of every land along with its land owner is decided by UD! At the same time every municipal corporation as well municipal council in the State comes under jurisdiction of UD, no wonder it's a huge vote bank for any political party & that's tempting enough for every CM to keep a hold of it. Thought nothing wrong as this very potential makes UD one of the most important ministry also as if you really want to develop the State then the UD holds the key for the development is a fact.

Now let's see what was expected from UD regarding the land use or cities; as the name suggests UD was meant to control growth of the towns or cities in proper way. Here proper way has many dimensions which includes giving basic infrastructure like water, roads, electricity, drainage like physical infrastructure along with social developments of these cities, let's call them as settlements. Social developments includes not just education & public health but employment generation too & on top of it to make the homes with all such facilities available to the needy ones in & around these settlements at affordable cost, is the prime job of UD. But with due respect to all the persons working in UD under we have been developing cities without understanding the development essence itself. For e.g. millions has to migrate from smaller towns to big cities like Mumbai & Pune as there are no jobs in smaller towns & neither basic above mentioned infrastructure as mentioned above. And even does those who have been migrated to the big cities are happy with what life style they are getting in these cities? Well, let's see the scene in our Pune region itself; the execution of the controlling activities of development here has been divided in numbers of civic bodies & each having separate sets of their DC rules. And these DC rules differs even periphery of some 50 km also, take example of PMC, PCMC & PMRDA, the fire premium types charges differs here in multiple folds in all three civic bodies & so is the case for many policies related to urban development in these areas. Then there is no control on monitoring the infrastructure development as for us UD is just sanctioning new buildings & collecting premiums under various heads. The development plans of the cities/regions takes years just to get finalized & then its implementation happens at snail's pace & then what about the development of the city during this period, this question nobody has answered. The city is growing hap-hazard with some people getting rich & millions getting poor due to land policies, such is the planning scene. We sanction buildings, built them & then with individual whims or say convenience rest of things like roads & water follows, is the common scene all around the State. Lastly there is issue of illegal constructions which is strait outcome of unavailability of affordable legal homes, defeating the very purpose of UD!

High time there has to be serious thinking about UD's functioning itself, right from having same DC rules to all cities as well policies like premiums. And more importantly need is having a system in place which will ensure timely implementation of these DC rules as well policies from the local civic bodies which are acting like parallel UD in itself individually! At the same time we can think of appointing professionals in the field of Urban Planning in UD at key positions instead going through routine Govt. job appointment process, as this is something job of skill & not just seniority. As an IAS or administrative officer can be good in administration of the system but to understand the concept of planning & making proper policies suiting to need of not just present problems but for future too, you need a person who knows what urban planning is! And then give these professionals deadlines to achieve what has been planned, as sorry to say but right now UD is like a ship in the ocean travelling without any destination to reach. Many of my friends won't like my statement but look at the scene around us, in the Smart city like Pune neither can we finalize airport location in time nor we can find alternate dumping place for city's garbage & on other side we dream for Metro Rail & river front development type projects, year after year, what all this suggests? And in the mean time, city keeps expanding with hundreds of projects mushrooming all around as people need homes is a fact. Even for that the so called town planning dept, how many of them has even planned one town ship & executed it till the possession? And if not so, how we can expect them to understand issues of common developer or end flat holder while building single building or buying their own homes in this city? As most of the politicians as well Govt. servants gets nice Govt. accommodations (exception like police line are there) in best part of the city so they never know what it takes to live in homes where you have spent your life times earning to buy it & yet you don't have got even decent road if not public transport, to reach your home from your work place, leave apart water & other facilities!

Lastly, there is an issue of balancing environment as with rampant urbanization we are actually killing natural habitats of millions of species & we even haven't spared our rivers, hills, lakes or forests & we are encroaching on them for our homes. With majority population migrating to the cities the job of UD is vital & if in time we don't take proper steps then like a balloon exploding with the pressure of gas in it, our cities will burst under the pressure of residents in them & that day is not far long!



**आर.बी. चाफळकर**
ज्येष्ठ बांधकाम व्यावसायिक

# बांधकाम कामगार कौशल्यविकास



एका राष्ट्रीय स्तरावरच्या समितीवर काही महिन्यांपूर्वी काम करण्याचा योग आला. ज्याचा विषय होता, 'कौशल्य विकास' (स्किल डेव्हलपमेंट).

बऱ्याच राज्यांचे प्रतिनिधी सांगत होते, की त्यांचे बांधकाम प्रकल्प बांधकाम कामगारांअभावी रखडत आहेत किंवा प्रकल्प पूर्ण होण्यास उशीर लागत आहे.

बऱ्याच राज्यांत आज अशी परिस्थिती आहे, की बाधंकामासाठी कुशल, अर्धकुशल व अगदी अकुशल कामगारांचीसुद्धा वानवा आहे.

एवढेच नव्हे, तर असेही त्यावेळी ऐकण्यात आले, की बांधकाम कामगारांची एवढी वानवा आहे म्हणून बांधकाम क्षेत्रातील काही कंपन्यांनी बांधकाम कामगारांची आयात करण्याची परवानगी केंद्र सरकारकडे मागितली होती.

आपल्या देशाची एवढी लोकसंख्या असताना कामगार आयात करायला लागावेत, ही मोठी शोकांतिका ठरेल. म्हणून आपल्याच देशातील इच्छुक अकुशल कामगारांना कुशल करण्याची आवश्यकता आहे.

अशावेळी मुख्य आव्हान हे भाषेचे आहे. तसेच, वेगवेगळ्या राज्यांतील बांधकाम प्रक्रियांमधील व बांधकाम साहित्यामधील विविधतेचेही आहे. उदाहरणार्थ- पुण्यात गच्चीच्या वॉटरप्रूफिंगसाठी आपण विटांचे तुकडे वापरतो; पण गोव्यात मात्र वॉटरप्रूफिंगसाठी वीट वापरण्याची पद्धत कमी आहे.

एकूणच, बांधकाम प्रक्रियेसंदर्भात राष्ट्रीय पातळीवर समानता आणता येईल का, याचा विचार होणे आवश्यक ठरेल. उदाहरणार्थ- प्रत्येक राज्यात रंग देण्याच्या प्रक्रियेत समानता असेल, तर एखाद्या राज्यातील बांधकाम कामगार दुसऱ्या राज्यातसुद्धा सहज रंगकाम करू शकतील.

यासाठी मी मजुरांच्या प्रशिक्षणाकरिता रंगकाम, बांधकाम, प्लॅस्टर व प्लंबिंग यांचे सिलॅबस डिझाइन करून दिले, ज्यावर अनेक मजुरांचे सध्या प्रशिक्षण सुरू आहे.

हे प्रशिक्षण देणारे कोण आहेत? तर, ज्यांनी बांधकाम कामगार म्हणून अनेक वर्षे काम केले असेल, ते हे प्रशिक्षण देत असतात. प्रथम अशा बांधकाम कामगारांना प्रशिक्षक होण्यासाठी प्रशिक्षण दिले जाते व मग ते अकुशल कामगारांना त्यांना समजणाऱ्या भाषेत प्रशिक्षण देतात.

अशावेळी अकुशल कामगार प्रथम अर्धकुशल कामगार म्हणून प्रशिक्षित होऊ शकतात व अर्धकुशल कामगार हे कुशल कामगार म्हणून प्रशिक्षित होऊ शकतात. प्रशिक्षण झाल्यावर त्यांना प्रमाणपत्र दिले जाते.

मी माझ्या ट्रेनिंग सेंटरद्वारेसुद्धा असे प्रशिक्षण देत असतो. असे प्रशिक्षण देणाऱ्या इतरही काही संस्था आहेत; पण ही संख्या एकूणच गरजेच्या मानाने अत्यंत तोकडी आहे.

अशावेळी मराठी बांधकाम व्यवसायिक असोसिएशनला या संदर्भात काही करण्याची इच्छा असेल, तर माझे आपल्या असोसिएशनला पूर्ण सहकार्य राहील. यामुळे कामगारांचे बांधकाम कौशल्य वाढून त्यांना जास्त चांगला रोजगार मिळू शकेलच; शिवाय एकूणच बांधकामाचा दर्जाही सुधारण्यास मदत होईल.





**Kavita Murugkar**
Architect &
Senior Faculty,
Dr.B.N. College of
Architecture, Pune

# ARE WE BUILDING FOR ALL ?

Who are we and what kind of a society we live in? This can be understood the best through the environment we create around us – the streets, the public spaces, buildings, places where we live and work. Any place that offers equal opportunity for all, that is safe, healthy, that facilitates harmonious living and fosters universal brotherhood and empathy is INCLUSIVE in nature and thus, represents an INCLUSIVE SOCIETY.
The state of affairs in our country (that is obvious, but also came as an evidence based finding through the extensive surveys I conducted through my appointment as a Universal Access consultant and auditor for the Government of India under the ACCESSIBLE INDIA CAMPAIGN) is unfortunately not inclusive rather DISCRIMINATORY in nature at all levels, beginning with the exclusion of a considerable section of our society through the DISABLING environment we have been and are creating even today! I am here referring to the most ignored and left out but vulnerable groups of people – the PERSONS WITH DISABILITIES that represent almost 4 to 8 % percent of our population and the senior citizen groups which amount to almost 40 % of our population.
In all the development related initiatives ranging from city planning to infrastructure to individual buildings, the most EXCLUDED are the persons with disabilities and the elderly. Right to access and shelter for ALL is a human right, as per our constitution and United Nations protocol to which India is signatory. Inspite of related laws and policies that protect this basic right, we find almost all of us violating this right by creating INACCESSIBLE and DISABLING environments. Hence, my question is– ARE WE BUILDING FOR ALL?
Societies abroad are conscious of this need and have taken concrete steps in ensuring that every citizen irrespective of being disabled or not is addressed in the process of design and creation of physical infrastructure, thus empowering them through self- reliance. That is the reason their LIVABILITY INDEX is extremely high, while Indian cities score very poorly on this rating. DISABILITY is universal and can occur to any of us in our life cycle as a result of some accident or part of ageing. It is more of a mental/social and environmental creation and less of an individual's attribute. Hence BARRIER FREE and AN ACCESSIBLE environment is a universal need, for each one of us. Victor Papaneck, a renowned architect says – GOOD DESIGN ENABLES AND BAD DESIGN DISABLES. As a result of non-acceptance and poor attention to this universal need, there are not even handful of buildings in our country that are ACCESSIBLE to ALL. This is also in a way a huge economic loss, by missing out on a potential client group and needs of people that may not be satisfied through a design that is only based on the needs of the non-existent STANDARD USER OR ABLE BODIED.
Many think that by creating SPECIAL ENVIRONMENTS or SPECIAL FEATURES like a senior citizen housing, homes for the disabled, special schools and rehabilitation centers etc., we are being empathetic to the needs of these special groups, but unknowingly we are discriminating and excluding them forever from the mainstream. What is required is an urgent shift in the way we design and create buildings and infrastructure! A UNIVERSAL DESIGN approach that creates products,



environments and services that are usable by all people, to the greatest extent possible, without the need for adaptation or specialized design, needs to be adopted widely in the practise of construction. For example, an innovative concept of a STRAMP as shown in the picture, being a combination of a ramp and steps offers choice and independent mobility for many types of users including those who use wheel chair or have ageing issues.

The concept of universal design has now spread worldwide and is practiced in many different ways. New ideas and new professional methods have been implemented, and the concept has many names and professionals connected to it, such as: Design for All, Inclusive Design, Participatory Design, Human Centered Design, Usability, Life Span Design, Independent Living etc.

By building the design strategy around Universal Design where the main focus is on the principles of 'EQUAL ACCESS', many countries on the world map are creating fully accessible buildings and public infrastructure that can be used equally by all. Accessibility is often associated with the guidelines set out in our building regulations, but working with Universal Design does not merely demand extensive knowledge about requirements and standards, but perhaps even more importantly, adequate knowledge and understanding of the needs of the functionally disabled users. The building, therefore, is the result of a process in which accessibility is not based on building regulations, but on detailed information about the users. Such knowledge is essential in order to be able to build with full accessibility for everyone.
The Disabled Peoples Organisations Denmark (DPOD) office building has been recognised as the most accessible office building in the world as it meets the highest standards of inclusive design while also showing substantial reduction in energy consumption, and respect for the climate challenges.



The world famous Guggenheim Museum at New York, designed by the Master architect Frank Llyod Wright with its gentle spiral ramp riding to a domed skylight and the open design affords disabled as well as non-disabled viewers complete access and possibility to see the displayed art work at the same time.



To share an Indian example, The Disha Resource Centre for Children with Multiple Disabilities at Jaipur, designed by Architect Ashok Lall is also a very good example of an environment and energy efficient building as well as physically accessible multi-storeyed building. A continuous ramp in the core of the building provides access to all floors to all types of users in an aesthetically pleasing and non-discriminatory manner, offering great character to the building.

No cities exist that are fully Barrier-Free, however, many cities around the world are actively working toward the idea of a Disabled Friendly or rather Accessible city like Barcelona, Singapore, Berlin, Wellington, Cardiff, Milan, Denmark to name a few. A SMART CITY cannot be created unless it is designed as a CITY FOR ALL that keeps accessibility at the heart of the planning and recognises the growing use of technology to enhance the lives of older and disabled people.

One of our recently completed retrofitting projects for improving Universal Access to the building is the CPWD's Nirman Bhavan at Akurdi, where we incorporated ramps, handrails, a tactile guiding path throughout the building and premises, accessible toilets, accessible lifts and Universal signage design in the existing condition without any structural modification.

As per the recent edition of the National Building Code 2016 and Rights for Persons with Disabilities Act 2016, it is mandatory to make any new building or facility Universally Accessible and non-compliance is liable to action on account of discrimination in built environment. An access consultant or an informed architect must be consulted at the design stage to incorporate all the requirements of an accessible building. The need of the hour is to upgrade our knowledge and practise the construction by understanding the conceptual and technical-know how of Accessibility and Universal Design and creating more and more examples of Inclusive buildings and public infrastructure to make a better, happier, liveable and Inclusive World for ALL !



"

*The problem is not how to wipe out all differences (in human capabilities), but how to unite with all differences intact.*

*Shri. Rabindranath Tagore*

# २०२५ मधील माझं शहर...

**कलाकारांचं व्यवसायानिमित्त पुण्या-मुंबईसारख्या शहरांशी घट्ट नातं जुळलेलं असतं. या शहरांचं २०२५ मध्ये काय रूप असेल-असावं, याबाबत त्यांचे विचार त्यांच्याच शब्दांत !**

(शब्दांकन : प्रभा कुडके)

## कायदा व सुव्यवस्थेत बदल अपेक्षित!

“ मी अगदी प्रामाणिकपणे एक गोष्ट इथे मान्य करतो, की इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र नक्कीच पुढारलेला आहे. कला, सांस्कृतिक जडण-घडण आपल्या मातीत खूप उत्तम झालेली आहे. भविष्यात ती अधिक वृद्धिंगत होईल यात वादच नाही. लोकवस्ती आणि लोकसंख्यावाढ हा एक महत्त्वाचा मुद्दा मात्र विचारात घ्यायला हवा. जो उठतो तो मुंबईत पाऊल ठेवतो. मुंबईत येणारी माणसे इतकी आहेत, की त्यांची संख्या दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत आहे. इतर देशांमध्ये जाताना किंवा तिथे काम करण्यासाठी जे कायदे केले जातात ते खरोखरच वाखाणण्याजोगे आहे. तसेच कडक कायदे आपल्याकडे करायला हवेत. कायदा आणि सुव्यवस्था सुधारली तर समाज सुधारतो, असं मला वाटतं. आपल्याला कायद्याचे भय नसल्यामुळेच आपण येता-जाता सर्रास नियम मोडतो. आपल्याकडे फुटपाथ हे माणसांना चालण्यासाठी असतात की फेरीवाल्यांसाठी, हेच मला अजून कळलेलं नाही. या छोट्या गोष्टींपासून बदलांना सुरुवात व्हायला हवी, अशी माझी अपेक्षा आहे. २०२५ पर्यंत या छोट्या बदलांमध्ये प्रगती झाली तरी खूप मोठे शिखर पादाक्रांत करू.



सुबोध भावे


## मुंबई-पुण्यातील बदलती जीवनशैली...



मृणाल कुलकर्णी

“ पुणे आणि मुंबई ही दोन्ही शहरे मला प्रिय आहेत. एक शांत शहर आणि एक सदैव घड्याळाच्या काट्यावर धावणारे शहर. आता पुणेही पहिल्यासारखे शांत राहिलेले नाही म्हणा; पण मुंबईइतके फास्टसुद्धा नाही. अख्खे पुणे रिक्षाने फिरू शकता. पण, हा फरक मुंबईत जाणवतो, की मुंबईत एका टोकाहून दुसरीकडे जाण्यासाठी किमान एक ते दीड तास मोजावा लागतो. शिवाय, सध्या मुंबईत होणारी वाहतूककोंडी ही तर एक महत्त्वाची समस्या आहे. मुंबईतील वाहतूककोंडी सोडली तर मला अजून काहीच मोठा बदल व्हावा, असे वाटत नाही. शहर म्हणून खरेच छान आहे, यात दुमत नाही. पण, भविष्यात ही वाहतूककोंडी कमी व्हावी, हीच एक इच्छा असेल. अजून इथे एक मुद्दा मला मांडावासा वाटतो, तो म्हणजे प्रदूषण. दिल्लीइतके प्रदूषण मुंबईत नाही; परंतु भविष्यात ते वाढेल. त्यामुळे त्यावर काहीतरी ठोस उपाययोजना नक्कीच व्हायला हवी. नवी मुंबईचा विमानतळ लवकर सुरू व्हायला हवा, म्हणजे विमानांची संख्या वाढेल आणि एका विमानतळावर पडणारा बोजा कमी होईल. आता पुण्याच्या बाबतीत मी केवळ इतकेच म्हणेन, की पुणेही आता खूप पसरत चाललेले आहे. साधारण पंधरा वर्षांपूर्वी खूप इमारती नव्हत्या. आता पुणेसुद्धा मुंबईसारखे वाटू लागले आहे. पुण्याशी एक वेगळे नाते आहे; त्यामुळे त्याची मुंबईशी तुलना करता येणार नाही. पण, २०२५मध्ये या शहराची जीवनशैली नक्कीच सुधारेल, यात दुमत नाही. दुकाने लवकर उघडावीत आणि पुणेरी पाट्यांचे विषयही बदलावेत...

# स्वयंशिस्त महत्त्वाची!



प्रशांत दामले

“ नाटकानिमित्त किंवा इतर कामानिमित्त फिरणं बरच होतं. आपण आजूबाजूला फिरताना भोवताली झालेले बदल आपल्याला लक्षात येतात. साधं मुंबईचं उदाहरण घ्या... गेल्या चार ते पाच वर्षात ट्रान्सपोर्टच्या खूप उत्तम सुविधा शहरात सरू झाल्या. मोनो रेल्वे, मेट्रो यामुळे अनेकांना सुखकारक प्रवास करता येतो, यात काही शंकाच नाही. परंतु परळला जे काही घडलं ते खूपच धक्कादायक होतं. मला स्वतःला ट्रेनने प्रवास करण्याची वेळ येत नाही; पण आपलं कुणी ना कुणी जवळचं या मुंबईच्या जीवनवाहिनीचा एक भाग झालेला आहे. ट्रेनचं विस्तारलेलं जाळं हे वाखाणण्याजोगं आहे, पण सोयीसुविधांचा नक्कीच अभाव आहे हेसुद्धा तितकंच खरं. परदेशातील सुखसुविधांशी मी इथे तुलना करत नाही; पण आपल्याकडे जे आहे ते तरी उत्तम असावं, ही मात्र माझी नक्कीच अपेक्षा आहे. नाट्यगृहांची स्थिती सुधारायला हवी तरच प्रेक्षक नाट्यगृहाकडे वळेल. खूप मोठे बदल होत राहणारच आहेत, मोठ्या योजना येणारच; पण त्याबरोबरीने छोट्या बदलांसाठी आपण स्वतःहून पुढाकार घ्यायला हवा. स्वच्छता न पाळणं जन्मसिद्ध हक्क असल्यासारखं आपल्याकडे वावरलं जातं. आधी स्वत:ला शिस्त लागायला हवी. आपल्याला केवळ पळायचं असतं, रांग लावणं हे अनेकांना ठाऊकच नाही. त्यामुळे शिस्त अंगात आली, तर असलेल्या सोयीसुविधांचा नक्कीच उपयोग करून घेता येईल. सर्वात मुख्य गोष्ट आपल्याकडे रस्त्यांची अवस्था फारच वाईट आहे. मी कोणत्याही एका शहराविषयी बोलत नाही. तर रस्ते व्यवस्थापनामध्ये होणारा भ्रष्टाचार थांबायलाच हवा, म्हणजे अपघातांची संख्या कमी होईल. २०२५ पर्यंत अतिशय उत्तम रस्ते महाराष्ट्राला मिळावेत, असं मला वाटतं.

# प्रगतीच्या वाटेवर...

“ वास्तविक पाहता आपण निरीक्षण केलं तर एक दिसून येईल की, आपल्या आजूबाजूला प्रगती ही होतच असते. फक्त ती आपल्याला दिसून येत नाही. रोजची वाट आपल्याला नवीन वाटत नाही, तिच्यात काय दिसणार काय शोधायचं हे असं वाटत राहतं. तसंच आपल्या शहराचंही आहे. मी कामानिमित्त मुंबईत राहते. वेळ मिळाला तर घरी येते पुण्यात. मुंबई-पुणे प्रवास आता पूर्वीसारखा रेंगाळणारा राहिलेला नाही. कशामूळे हा प्रश्न आपण स्वतःलाच विचारायला हवा. तर लांबलचक झालेल्या सलग रस्त्यांमुळे, एक्स्प्रेस हायवेमुळे... त्यामुळे प्रगती ही नक्कीच झालेली आहे, हे आपण नाकारू शकत नाही. फक्त आपण एखादी गोष्ट रोज पाहतो तेव्हा त्यात आपल्याला बदल फारसा जाणवत नाही तसंच काहीसं आपलं होतं. भविष्यात बदल नक्कीच होणार, कारण बदल व्हायलाच हवेत. २०२५ मध्ये मूलभूत सोयीसुविधा उत्तम मिळायला हव्यात, एवढचं माझं मागणं असेल.



प्राजक्ता माळी

# आपल्यात बदल होणे गरजेचे...

माझ्यासाठी जेव्हा महाराष्ट्र हा विषय निघतो, तेव्हा माझ्या घराविषयी मला जे वाटतं तेच मला आपल्या राज्याविषयी वाटतं. आपण परदेशात गेल्यावर स्वच्छतेचे नियम काटेकोरपणे पाळतो की नाही.. मग आपल्या राज्यात बघावं तिथे पिचकारी का मारत सुटतो. बदल हा स्वतःपासून सूरू व्हायला हवा. राज्य सरकारने रस्ते मोठे केले, पण आपण ट्रॅफिकचे नियम पाळतो का... रात्रीच्या प्रहरी ट्रॅफिक पोलिस हजर नसताना किती जण सिग्नल पाळतात... हे असे अनेक प्रश्न आपण स्वतःला विचारायला हवेत. २०२५ मध्ये नक्कीच प्रगती होणार, पण आपण खरोखर ही प्रगती चांगल्या प्रकारे उपभोगायला हवी असेल तर आपल्यामध्येही बदल होणं गरजेचं आहे. आज महाराष्ट्रात दुष्काळ पडतो अशी ओरड होते. याला कारणीभूत कोण आहे? तर फक्त आपणच कारणीभुत आहोत. आपल्याला कोणतीही नैसर्गिक गोष्ट जतन करण्याची मुळात ओढच नाही. पाऊस पडतोय, पडूदे.. दुष्काळ पडला की फक्त जागं व्हायचं. मग हेच पाऊस पडण्याआधी किती गावं जागी होतात. त्यामुळे सरकारला किंवा कुणालाही दोष देण्याआधी आपण नागरिक म्हणून काय करतो हेसुद्धा तपासून पाहायला हवं. सरकारी योजना बक्कळ निघतात; पण त्याचा फायदा घेणं जमायला हवं. एकमेकांना सहकार्य करून आपण पुढे जायला हवं. त्यामुळे २०२५ असो किंवा २०५० जोपर्यंत आपली मानसिकता बदलत नाही, तोपर्यंत आपल्याला प्रगती झाली तरी ती अनुभवता येणार नाही, हे आपण प्रत्येकाने लक्षात घ्यायला हवं.


मकरंद अनासपुरे

# स्वच्छ व निरोगी शहराला प्राधान्य

बेला शेंडे



मुंबई स्वच्छ व्हावी, सुंदर व्हावी हे इथल्या प्रत्येक नागरिकाला वाटतं तसंच ते मलाही. त्याकरिता २०२५ यायची वाट पाहायला नको. आपल्या या मुंबई शहरात एक नदी आहे, किती जणांना ती माहितीय..? मिठीचं विद्रूप रूप पाहताना त्रास होतो. आपण आपल्या शहराची तुलना इतर देशांतील शहरांशी करतो, तेव्हा आपण किती मागे आहोत, हे कळतं. याला कारण केवळ राजकीय अनास्था नाही, तर आपणही तितकेच जबाबदार आहोत. इतर देशांतील शहरांमध्ये नदीचं आरोग्य चांगलं राहील, याकडे लक्ष दिलं जातं. आपल्याकडे मात्र ते तसं होताना दिसत नाही. मिठी नदीचं गटार करण्यास आपणच कारणीभूत आहोत. मुंबईत वाहतुकीचा खोळंबा होतो; पण नवीन चाललेल्या प्रकल्पांमुळे असा खोळंबा होणारच. नवनवीन रुंदीकरण झालेल्या रस्त्यांमुळे पूर्वीपेक्षा पश्चिम उपनगरांमध्ये जाणं आता खूप सोप्पं झालंय. मुंबईनं दिलेली मेट्रो ही अनेकांना खूपच उपयोगी ठरलेली आहे, यावर दुमत नाही. भविष्यात येणारी बुलेट ट्रेनसुद्धा नक्कीच उपयोगी पडणार. त्यामुळे मला इथं केवळ एकच नमूद करावसं वाटतं, कुठल्याही एका वर्षाची वाट न पाहता आपण शहराचं आरोग्य कसं चांगलं ठेवू शकतो, याकडे लक्ष द्यायला हवं. स्वच्छता ठेवायला हवी. आपलं घर स्वच्छ ठेवतो तसं शहर स्वच्छ ठेवायला हवं, इतकीच माझी अपेक्षा या शहरातील नागरिकांकडून असेल.

# मायानगरीतील नव्या बदलांचे स्वागत..!

“ २०२५मध्ये आपलं शहर नक्कीच एका वेगळ्या उंचीवर असेल, यात दुमत नाही. शहरांमध्ये होणारे बदल नक्कीच जाणवू लागले आहेत. अगदीच स्पष्ट सांगायचं, तर क्रांती एका दिवसात होत नाही. क्रांती होण्यासाठी काही काळ जावा लागतो. गेल्या दहा वर्षांत मी खूप बदल जवळून पाहिले आहेत आणि अनुभवलेदेखील आहेत. हिरानंदानीमध्ये रहायला येऊनच मला जवळपास १५ वर्षं झाली असतील. त्याआधी परळमधील आंबेडकरनगरमध्ये मी रहायचो. रस्त्याची लांबी-रुंदी वाढताना पाहिली. त्यामुळे खूप सारे महत्त्वाचे शहरातले बदल अगदी जवळून पाहिले. आता तर बुलेट ट्रेन येणार आहे. कधी येईल माहीत नाही; पण हा बदल खरोखर क्रांती असेल, असं मला वाटतं. एक मात्र मला सांगावंसं किंवा मांडावंसं वाटतं, ट्रॅफिकची समस्या नक्कीच भविष्यात वाढणार आहे. त्यावर सरकारनं काही ठोस पावलं उचलायला हवीत. आपल्याकडे गाड्यांची संख्या वाढलीय; पण पार्किंग उपलब्ध नाही, हे चित्र सर्वच ठिकाणी दिसतं. शूटिंगच्या ठिकाणीसुद्धा पार्किंगची बोंबाबोंब आहे. त्यामुळे पार्किंगच्या समस्येवर तोडगा निघाला तर खूपच बरं होईल, असं मला वाटतं. बाकी मुंबईच्या बाबतीत बोलायचं झालं, तर या कर्मभूमीनं मला घडवलं. तिच्यातल्या मोनो-मेट्रोसारख्या बदलांचा मी साक्षीदार झालो. येत्या काही वर्षांत जे काही नव्यानं बदल होतील, त्यांचंदेखील नक्कीच स्वागत असेल.




केदार शिंदे

१९

# शहरातलं प्रदूषण कमी व्हावं...

“ शहरातील बदल हे केवळ एका रात्रीत होणारे नसतात. त्याकरिता काळ जावा लागतो. मला अजूनही आठवतंय. विदर्भातून मी जेव्हा नाटक किंवा एकांकिकांच्या निमित्तानं मुंबईत यायचो, तेव्हा मुंबई मला अजस्त्र वाटायची. या गर्दीत आपण हरवून जाऊ, अशी भीती सतत वाटायची. रवींद्र नाट्य मंदिराच्या समोर उभा राहून मी येणाऱ्या-जाणाऱ्या गाड्या पाहत उभा राहायचो. आपलीही कधी तरी अशी गाडी असेल, असं वाटायचं. मुंबईनं मला माझ्या आयुष्यात स्वप्न बघायला शिकवलं. आज जेव्हा मागे वळून पाहतो, तेव्हा मला असं वाटतं, त्या काळी अजस्त्र वाटणारी मुंबई मला आपलीशी वाटू लागलीय. शहरानं मला भरभरून प्रेम दिलं, पोट भरून माया दिली. २०२५मध्ये शहरात काय बदल व्हावा, यावर मी केवळ इतकंच म्हणेन, प्रदूषण कमी व्हावं. आता रस्त्यावर गाड्या इतक्या झाल्यात, की मोकळा श्वास घेणं कठीण झालेलं आहे. त्यामुळे वाहतुकीच्या समस्यासुद्धा खूप वाढल्या आहेत. एक मात्र इथं मी नमूद करतो, मुंबईसारखी वाहतूकव्यवस्था जगभरात कुठंही नाही. भविष्यात ती अधिकाधिक वृद्धिंगत व्हावी, इतकीच काय ती माफक अपेक्षा.



भारत गणेशपुरे



**प्रवीण दवणे**
कवी-लेखक

# कवितेतलं घर



पोटापाण्याची पायपीट जिथं
विश्वासानं विसावते ते 'घर'!
असं घर नामवंत कवींनी आपल्या
शब्दांमधून समर्थपणे उभं केलं.
त्यातल्या काही घरांचा वेध घेतला आहे-
मनात घर करणाऱ्या छोट्या,
सुबक ललित लेखातून
कवी-लेखक **प्रवीण दवणे** यांनी.

आयुष्य आपल्याही नकळत आपल्याला पुढे-पुढे नेत असतं आणि वाटेवर अनेक व्यक्तींची पशुपक्ष्यांची सोबत देत-घेत वास्तूंनाही आपला स्पर्श देत असतं. पुढे स्थिरस्थावर झाल्यावर आयुष्यात येणाऱ्या प्रशस्त, घाटदार घरापेक्षा आपल्या धडपडत्या काळात सावरणाऱ्या भिंतींची ऊब चिरंतन असते. जगात कुठंही गेलात, व्यवसायानिमित्तानं पंचतारांकित शहरात वावरलात तरी आपल्या माणसांच्या छोट्या घरामध्ये आलं, की पिलाला आईच्या पंखाखाली जे वाटत असेल, तसं आपल्याला घरात वाटतं.

या घराची सावली शब्दांच्या सोबतीनं, कविता होत भाषेतही स्वतःचं 'घर' करीत राहिली. या कवितेत केवळ घर-भिंती-छपराचं वर्णन नव्हतं, तर आपल्या घरात दडलेल्या भावजीवनाचं मैत्र होतं.

विंदा करंदीकरांसारखा संवेदनांतून चांदणं पेरणारा कवीही घराकडच्या आठवणी निघाल्या, की भावुक होतो. या घराकडच्या आठवणींत काय नसतं..! अगदी आमसुलाच्या साराच्या, लोणच्याच्या खाराच्याही आठवणी रस-रंग-गंधासह बिलगलेल्या असतात. विंदा म्हणतात-

*घराकडच्या आठवणी : दाराच्या कडीच्या,*
*घातल्या-न घातल्याच्या*
*न्हाणीतल्या साबणाच्या सवयीच्या वासाच्या*
*चौघांच्या घासाच्या*
*चड्डीच्या नाडीचे टोक आत गेल्याच्या*
*गाल फुगव्या जावयाच्या*

'घर' म्हणजे अशा अनंत आठवणींचं माहेरघर. अनोळखी घरात आपण गेल्यावर जे अनोळखीपण वाटतं, ते म्हणजे नेमकं काय वाटतं, तर त्या घरातल्या कुठल्याही स्पंदनाशी आपले श्वास संवादत नसतात. सारं काही उपरं-उपरं. म्हणून अशा घरातून आपण बाहेर पडतो तेव्हा आत काहीच 'राहिलेलं' नसतं. परंतु, विंदांसारखा तरल संवेदनांचा विलक्षण भावोत्कट कवी-'मन' म्हणून अशा स्वतःच्या घरात गुंतलेला असतो, तेव्हा त्यात एरवी अगदीच नगण्य वाटणाऱ्या सुमार गोष्टींनाही एक हृदयस्थ सन्मान प्राप्त होतो. कारण आपली आजची जडणघडण अशा सूक्ष्मातिसूक्ष्म रागरंग, विभ्रमांनी, रुसव्याफुगव्यांनी, संघर्ष-राग-अनुरागाने तयार झालेली असते. घर म्हणजे अशा अनंत श्वास-निःश्वासांचं, नियतीच्या अतर्क्य खेळाचं स्पंदनशील माहेर असतं.

गदिमांसारख्या चित्रमय शैलीचं रेखीव वरदान लाभलेल्या मनातलं घर हे त्यातल्या अपार मांगल्यासहच व्यक्त होतं. ग. दि. माडगूळकरांची लेखणी म्हणजे रंगकुंचलाच! शब्दानं चित्र रेखलं जातं. गदिमांच्या या घरात फक्त वस्तू वा आठवणी नसतात, तर संस्कारांचं निरांजन घेऊन वात्सल्याचा वर्षाव करणारी आईही असते; तर कधी कष्टून-दमूनभागून आलेले बाबाही असतात. पण तेही कसे? आज चेहरा कदाचित हरवलाही असेल; पण त्यांनी दिलेला तेजोमय चेहरा सोबतीला आहेच असे-

*माजघरातील उजेड मिणमिण*
*वृद्ध कंकणे करती किणकिण*
*किणकिण ती हळू ये कुरवाळू*
*दूर देशीचे प्रौढ लेकरू*
*खेड्यामधले घर कौलारू*

ज्या घरात नंदादीप... वात्सल्याची लगबग तेच घर! गदिमांनी त्यांच्या मनातल्या घराचं चित्र साक्षात बोट धरून- त्या मनातल्या घरात नेल्यासारखं चितारलं आहे. ज्या घराच्या भोवती हिरवी सावली येत आहे, सर्व पाऊलवाटा घराच्या अंगणाशी येऊन मिळत आहेत- असं हे आता मनातलं घर आता मनातच उभं करावं लागत आहे.

घराचं ऐश्वर्य नेमकं आहे कशात? रंगरंगोटी, कलाकुसरीत? - ज्या घरात हृद्‌बंध गुंफलेले आहेत तेच शेवटी घर ना! मोजकीच, पण आशयघन गीतं लिहिणारे कवी सूर्यकांत खांडेकर! पारंपरिक ओव्यांसारखी रचना करून स्वतःच्या मनातल्या घराचं वैभव चितारतात -

*नाही माझ्या घरट्यात। रास हिऱ्यामाणकांची*
*भावमय किमया ही। हृदयीच्या दौलतीची।*

साध्या, पण किती सात्त्विक ओळी! जिथं जिव्हाळा, वात्सल्य त्या वास्तूलाच 'घरपण' असतं.

*नाही माझ्या घरट्यात।*
*कधी कपाळाला आठी*
*खुले हासणे दिसेल।*
*माझ्या चिमण्यांच्या ओठी।*

या ओव्यांनी 'घरपणा'चा कळस गाठला आहे. किलबिलाटाशिवाय घराचं 'घरटं' होत नाही. जिथं समाधान-शांती आहे, तेच घर. उगीच कपाळावर नापसंतीची आठी नाही. 'खुले हसणे' हेच या घराचं तोरण!

कधी घर सुगरणीचा 'खोपा' होतं नि बहिणाबाई चौधरींसारखी निसर्गकन्या तो खोपा म्हणजे टांगणीला लागलेला 'जीव'च अशी कल्पना करून, घरातल्या पिलांसाठी दाणापाणी आणायला गेलेल्या माऊलीचं 'मन' सांगून जाते. कधी- दूर गावहून घरी आलेल्या कवीमुळे साऱ्या घराला कसा आनंद होतो, हे सांगताना कविवर्य बा. भ. बोरकर कवी न् घर यांचे व्यक्तीप्रमाणेच असणारे अनुबंध सांगतात. 'घर असावे - घरासारखे' या कवयित्री विमल लिमये यांच्या ओळी म्हणजे तर प्रत्येक घराचं चिरंतन सुभाषितच झालं आहे.

वेचायलाच बसलं तर अशा मनात घर करणाऱ्या घर कवितेचा सडाच मराठी कवितेत विखुरलेला दिसेल.

घराबद्दल कविता कुठलीही वा कुणाचीही असो- सर्वांचं सार मात्र दोन ओळींत सांगायचं तर मी म्हणेन-

*घरालाही पडतात स्वप्ने,*
*आपुलकीच्या नात्याची*
*उन्हामधल्या छायेची!*
*आतुर उत्कट मायेची*



**संजय सोनवणी**
सामाजिक अभ्यासक,
लेखक



# कानोसा... बदलत्या समाजजाणिवांचा!

मानवी जीवनात वेगाने होत असलेल्या तंत्रज्ञानातील प्रगतीबरोबरच नव्या आर्थिक, सामाजिक आव्हानांची भर पडते आहे. सन २०२५ चा विचार करता जागतिक परिदृश्यामध्ये भारतीय सामाजिक जाणिवांचा प्रवास महत्त्वाच्या टप्प्यावर पोचलेला असेल. तरुणाईपुढील आव्हानांचा, संधींचा वेध घेत आकारास येऊ घातलेल्या नव्या व्यवस्थांचा कानोसा घेणारे हे मुक्त चिंतन.

आपण भारतीय मिथ्या इतिहासात रमणारे प्राणी आहोत. भारतात भविष्यकथन करणाऱ्यांची रेलचेल असली, तरी वास्तवदर्शी पायावर आम्ही उद्या कोठे असायला हवे आणि ते साध्य करण्यासाठी काय करायला हवे, याबाबत मात्र आमचे विचारवंत मूक असतात. आर्थिक, सामाजिक व राजकीय प्रगती करायची, तर आम्हाला ज्ञानात्मक बौद्धिक प्रगती आधी करावी लागेल व तीही कोणत्या प्रकारे आणि कशी करायची, याचीही योजना आपल्याकडे आजही नाही. सरकारे येतात आणि जातात; पण मानवी समाज मात्र अखंड प्रवाही राहतो. हा प्रवाह ध्येय ठरवून त्या दिशेने फार वेगाने गेला नाही तरी चालेल; संथपणे का होईना त्या दिशेने वाटचाल करेल, यासाठी मात्र निश्चित धोरणे असावी लागतात. आपल्या देशातील नागरिकांची मानसिकता, क्षमता आणि स्वप्ने यांचे वास्तवदर्शी भान असावे लागते. ते आपल्याकडे आहे का, याचा विचार प्रत्येक जण स्वतंत्रपणे करू शकतो. २०२५ साली भारत कसा असेल आणि कोठे असायला हवा, यावर जर विचार करायचा असेल तर प्रथम आपण आज कोठे उभे आहोत आणि जागतिक आव्हाने कोणती व जग कोणत्या दिशेने जाऊ पाहत आहे, यावरही एक दृष्टिक्षेप टाकायला हवा.

## ■ भविष्याचे कुतूहल

भविष्याचे कुतूहल नाही, असा माणूस क्वचित असेल. भविष्यासाठी तरतुदीही माणूस करतो ते संभाव्य व अनपेक्षित अनिष्टांचा सामना करण्यासाठी. सरकारची अथवा व्यक्तीची अंदाजपत्रकेही एक प्रकारे भविष्याचीच आर्थिक वाटचाल ठरवत असतात. अंदाजपत्रके अथवा बजेट अनेकदा कोलमडतातही. कधी कधी ती अपेक्षेपेक्षा जास्त यशस्वीही होतात. अंदाजपत्रक म्हणजे भविष्यातील एका कालखंडात नेमके काय व कसे साध्य करायचे, याचा आराखडा व त्यासाठी केल्या गेलेल्या तरतुदी. बजेटचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर आढावा घेण्याचीही पद्धत असतेच. आपल्याला काय साध्य करायचे होते आणि त्यातील किती खरोखर साध्य झाले, जे झाले नाही ते का झाले नाही, याचे विश्लेषण यात अपेक्षित असते व त्यानुसार पुढचा मार्ग शोधला जातो. अर्थात, ही अंदाजपत्रके केवळ आर्थिक असतात. सामाजिक, सांस्कृतिक भाकितांचा त्यात सहसा समावेश नसतो; त्यामुळे त्याबाबत योजनाही

नसते. पण, मानवी समाजाने स्वत:च अशी उद्दिष्टे समोर ठेवून ती कशी साध्य करायची, याचा ऊहापोह केला पाहिजे.

हा मार्ग बऱ्यापैकी वास्तव असतो. म्हणजे, त्याला आजच्या स्थितीचा एक बेस असतो. हा बेस ठरविण्यासाठी वापरले जाणारे मानदंड नेहमी बरोबरच असतात, असे नाही. आजची स्थिती ठरविण्याचे नेमके मानदंड काय असावेत, यावर विद्वान नेहमीच चर्चा करत असतात; प्रसंगी वादही घालत असतात. सुधारणांना नेहमीच वाव असतो, हेही खरे. अनेकदा अनपेक्षित अरिष्टे अशा पद्धतीने अवतरतात, की अंदाजपत्रकांना काही अर्थ राहत नाही. ही अरिष्टे निसर्गनिमित्त असतील, मानवनिर्मित असतील किंवा अंमलबजावणीतील भोंगळपणामुळेही निर्माण झालेली असतील. अचानक होणारी युद्धे, दंगली, कोणाएका दुसऱ्याच राष्ट्राची अर्थव्यवस्था एकाएकी कोसळणे यामुळेही व्यक्ती व सरकारांची अंदाजपत्रके कोसळू शकतात. मानवी समाजाचीही उद्दिष्टे साध्य होतीलच, असे नाही. समाजातही ऐतिहासिक किंवा वर्तमान काळातील कारणांमुळे संघर्षाची स्थिती उद्‌भवून समाजप्रवाहाला वेगळेच वळण लागू शकते. सध्या अशा घटनांचा वेग वाढलेला आहे, हे आपण सहज पाहू शकतो. नागरिक वास्तव प्रश्नांच्या सोडवणूकीपेक्षा अस्मितांच्या प्रश्नांत एकमेकांविरुद्ध उभे ठाकतात, ही स्थिती गतिमान झालेली आहे.

पण, याचा अर्थ असा नसतो, की अंदाज बांधू नयेत, भविष्याचा वेध घेऊ नये. समग्र मानवजातीला अधिकाधिक स्वतंत्र, अर्थपूर्ण, निर्वैर आणि समाधानी जगण्याकडे जायचे असते; पण अधांतरी व ध्येय नसलेली स्वप्ने पाहून माणूस कोठेही कसा पोचेल? त्यासाठी वास्तवाचा पुरेसा आधार लागतोच. मानवजात आज कोठे आहे, हे नेमके समजल्याखेरीज पुढची दिशा ठरविता येणे अशक्यच आहे, हेही आपल्याला समजून घ्यावे लागेल.

येथे भविष्य म्हणजे एखाद्या ज्योतिष्याने कुंडली मांडून ग्रह-तारे एखाद्याच्या वा राष्ट्राच्या जीवनावर परिणाम करतील, असले पोकळ भविष्य आपल्याला निश्चितच अभिप्रेत नाही. आपल्याला येथे येणाऱ्या पुढच्या सात वर्षांत भारतीय नेमका कोठे असेल, याची संभाव्य दिशा तपासणे हा आपला हेतू तर आहेच; पण ध्येयांमध्ये आणखी काही भर घालता येऊ शकते का, हे पाहणेही आपला हेतू असेल. सात वर्षांत भारतीय किती पुढे गेलेला असेल, यापेक्षा किमान २०५० सालासाठी तरी त्याने काय तयारी करायला हवी, यावर विचार करणेही येथे अभिप्रेत आहे. मनुष्य समाजाने भूतकाळात अनेक ध्येये समोर ठेवली होतीच. मग ते तत्त्वज्ञ असतील, राजकीय धुरीण असतील अथवा शास्त्रज्ञ असतील. ती सर्व ध्येये अजूनही पूर्ण झाली, असे म्हणता येणार नाही. अनेक तर आज विस्मरणात गेलेली आहेत. काही ध्येये अशीही होती, की जी कधीकाळी माणसाने ठरवली असतील, हे आज खरेसुद्धा वाटणार नाही.

आज आपण एकविसाव्या शतकात आलो आहोत. अनेक क्षेत्रांत माणसाने अद्‌भूत प्रगती केलेली आहे. असे असले तरी माणसासमोर हजारो वर्षांपूर्वी जे प्रश्न होते, ते आजही नीटसे सुटले आहेत, असे नाही. चुका सुधारून नव्या दुरुस्त्या तो अवश्य करत आला आहे; पण त्या दुरुस्त्यांनी प्रश्न सोडवले आहेत की जटिल केले आहेत, हाही एक प्रश्नच आहे. खरे तर सामाजिक व म्हणूनच आर्थिक व राजकीय प्रश्न तर अधिकच जटिल बनलेले आपल्याला दिसतात. उदा.- राज्यव्यवस्था नेमकी कशी असावी, अर्थव्यवस्थेचे नेमके प्रारूप कसे असावे, धर्माचे जीवनातील नेमके स्थान व आवश्यकता काय, राष्ट्रवादाची आवश्यकता आहे की नाही, दहशतवादी प्रेरणा कोठून येतात, युद्धविहीन जागतिक व्यवस्था येऊ शकते का, जातिसंस्थेचे अखेर काय होणार, गरिबीचे निर्मूलन शक्य आहे की अशक्य, मानवी आरोग्याचे नेमके पुढे काय होणार, भविष्यात विविध क्षेत्रांत कोणते नवे शोध लागून मानवी जीवन आमूलाग्र बदलू शकेल, कला माध्यमांत अजून कोणती नवी प्रारूपे येतील वगैरे असंख्य प्रश्न आज आपल्यासमोर आहेतच. यात भारतीय म्हणून आपण समस्या सोडविण्यासाठी काही ज्ञानात्मक, संशोधनात्मक भर घालण्यासाठी झटतो की या समस्या अजून वाढवत नेऊन जटिल व गुंतागुंतीच्या करत नेतो, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. मुळात आम्ही आमचे सामाजिक मानसशास्त्र सुदृढ करण्यासाठी नेमके काय प्रयत्न करणार आहोत, यावरच आपली पुढची दिशा ठरेल व त्याची सुरुवात केवळ आणि केवळ बौद्धिकतेच्या संरचनेपासून होते. आणि आपली नेमकी हीच सुरुवात अद्यापही झालेली नाही, हे नाइलाजाने म्हणावे लागते. काही भारतीयांनी जी बौद्धिक उंची गाठली ती स्वप्रेरणेने; क्वचितच तिला आपल्या शिक्षण अथवा सामाजिक व्यवस्थेने हातभार लावल्याचे चित्र दिसते.

## ■ बदलता समाज, शिक्षण आणि जाणिवा !

कोणताही समाज कोणत्या दिशेने जाणार आहे, तो भविष्यात कोठे आणि कसा असेल, हे समजून घ्यायचे असेल तर आजची पिढी नव्या पिढीला कशी घडवते, हे आधी पाहावे लागेल! पिढीमागून पिढी असा शृंखलाबद्ध प्रवास मानवी समाज करत असतो. आई-वडील, शिक्षक आणि समाज हे नव्या पिढीवर काहीना काही संस्कार करणारे घटक असतात. समाजाची वर्तमान स्थिती नवागत नागरिकाच्या समग्र व्यक्तिमत्त्वावर परिणाम करत असते. समाजाच्या निराशा, स्वप्ने व जगण्याच्या प्रेरणा नकळतपणे या नवागत नागरिकाच्याही प्रेरणा बनतात व तो त्याच परिप्रेक्ष्यात व परिघात स्वप्न पाहू लागतो. आहे त्या समाजव्यवस्थेत अडथळ्यांवर मात करत ती स्वप्ने पूर्ण करण्याचे प्रयत्न करू लागतो. अमेरिकेतील मुलगा जी स्वप्ने पाहील, ती भारतातील मध्यमवर्गातील मुलगा पाहीलच, असे नाही. किंबहुना, अशीही स्वप्ने असू शकतात, याची तो कल्पनाही करू शकणार नाही. शेवटी व्यवस्था स्वप्नांना वावही देते आणि ती बंदिस्तही करते.

याकडे आपल्याला अत्यंत व्यापकपणे व अनेक अंगांनी पाहावे लागेल. नवीन पिढी घडविणारा महत्त्वाचा घटक असतो व तो म्हणजे शिक्षण! विद्यार्थ्याला साक्षर बनवत, विविध ज्ञानशाखांशी परिचय करून देत भविष्यात त्याला कोणत्या तरी एक आवडीच्या ज्ञानशाखेत नवी भर घालण्यासाठी अथवा एखादी नवीच ज्ञानशाखा स्वप्रतिभेने निर्माण करण्यासाठी तयार करणे

म्हणजे शिक्षण! शिक्षण म्हणजे जुलमाचा रामराम नसतो. प्रत्येक विद्यार्थी स्वत:तच एक स्वतंत्र विश्व असते, व्यक्तिमत्त्व असते. बाह्य प्रभाव जेवढे व्यक्तिमत्त्व घडवायला कारण घडतात, त्याहीपेक्षा त्याच्या आंतरिक प्रेरणा महत्त्वाच्या ठरतात. या आंतरिक प्रेरणा लहानपणी सुप्तावस्थेत असल्या, तरी व्यवस्था अशी असावी लागते, की वाढत्या वयाबरोबर त्या प्रेरणांचे सुयोग्य प्रस्फुटन होत सामाजिक संरचनेत महत्त्वाची भर घालणारा नागरिक तयार व्हावा.

पण, आपण आजच्या आपल्या व्यवस्थेकडे पाहिले तर जे चित्र दिसते, ते अत्यंत निराशाजनक आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. म्हणजे, आम्ही मुळात मुलांना शिक्षणच देत नाही, तर विद्यार्थ्याला केवळ साक्षर बनविण्यापलीकडे व एक बौद्धिक श्रमिक बनवण्यापलीकडे काहीही विशेष साध्य करत नाही, हे आपल्या लक्षात येईल. आमच्या दृष्टीने 'सब घोडे बारा टक्के' या पद्धतीने ठराविक विषय लादत, सर्वांत पास होणे बंधनकारक करत, ज्याला अधिक मार्क तो हुशार, अशी धारणा बनवून बसलो आहोत. थोडक्यात, मार्क हाच आमचा गुणवत्तेचा एकमेव निकष आहे. मेरिट अथवा गुणवत्ताही आम्ही त्यावरच मोजतो. ९७% मिळूनही प्रवेश नाही आणि त्यांना ५०%ला प्रवेश अशा प्रकारच्या सामाजिक दुहीतही अडकतो. ही एक वंचना आहे, हे मात्र आपण मुळात समजून घेतलेलेच नाही. मुळात ९७% मिळाले म्हणून त्याची गुणवत्ता जास्त आणि ४०% मिळाले म्हणून गुणवत्ताच कमी, असे ठरविण्याचे साधनच अस्तित्वात नाही. ही पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी करून घेतलेली फसगत आहे. आणि आमची आजची संपूर्ण व्यवस्थाच या फसगतीवर उभी आहे.

मुळात आपली शिक्षणव्यवस्था हीच मानवी प्रेरणांना विसंगत आहे. 'नैसर्गिक कल' आणि त्यातच प्रावीण्य मिळू देण्याच्या संधी आम्ही नाकारलेल्या आहेत. थोडक्यात, प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाच्या भावी पिढ्या कशा घडणार नाहीत, याचीच पुरेपूर काळजी आम्ही घेतली आहे. सर्वच प्रज्ञावंत होऊ शकत नाहीत हे सत्य मान्य केले, तरी अशा बहुसंख्याक विद्यार्थ्यांना जगण्याची कौशल्येसुद्धा शिकविण्यात आम्ही अजून खूप मागेच आहोत. पुन्हा वर आम्ही भावी विकासाच्या गप्पा मारतो, ही तर मोठी विसंगती आहे. खरे म्हणजे आम्ही आमच्या शिक्षण पद्धतीतून मुलांना खुरटवणारी, संकुचित करणारी, त्यांचे कुतूहल व स्वप्ने छाटणारी, कौशल्याचा अभाव असणारी पिढी घडवत आहोत, हे आमच्या लक्षात कधी आले नाही. या नव्या पिढ्याही मग तशाच पुढच्या साचेबंद पिढ्या घडवत जाणार, यात शंका बाळगण्याचे कारण नाही.

आज आपण पाहिले, तर जागतिक पहिल्या २०० विद्यापीठांत आमचे एकही विद्यापीठ नाही. कोणत्याही ज्ञानशाखेत नवी भर घालणारे विद्वान व शास्त्रज्ञ आम्ही घडविले नाहीत. विदेशात जाऊन जे भारतीय अगदी नोबेलप्राप्तही होऊ शकले, त्यांची गणना यात करण्याचे कारण नाही. ते येथेच असते तर ते तसे घडू शकले नसते, कारण आपली व्यवस्थाच मुळात प्रतिभेला फुलावू देणारी नाही, हे कटू वास्तव त्यातूनच अधोरेखित होते. भारताचा नव्या जगात ज्ञान-विज्ञानक्षेत्रात नेमका वाटा काय, हे पाहायला गेले तर निराशाजनक चित्र सामोरे येते ते यामुळेच!

मग आम्ही आमची नवीन पिढी सबल, सक्षम व प्रज्ञावंत बनवू शकलो नाही, तर आमचे भविष्यही तेवढेच मरगळलेले राहणार, यात शंका नाही. आम्ही सर्व प्रश्नांवर आंदोलने करत आलेलो आहे; पण आमच्याच भवितव्याचा कळीचा प्रश्न जो आहे त्याबाबत मात्र आम्ही थंडगार आहोत. इंग्रजी माध्यमांच्या इंटरनॅशनल म्हणवणाऱ्या शाळांत भरमसाट पैसे भरून मुलाला प्रवेश मिळवला, की आपण कृतकृत्य झालो, असेच सर्व पालकांना वाटते. मुलांनी कोणत्या शाखेत प्रवेश घ्यावा, कशात करिअर करावे, हेही एकुणातला बाजार-ट्रेंड पाहून ठरविले जाते. पण, ज्याला हे सारे करायचे आहे त्यालाच मात्र नेमके विचारात घेतले जात नाही. मतामतांच्या गलबल्यात तो दुर्लक्षितच राहतो व शेवटी मिळेल ती वाट चालू लागतो. एका अर्थाने आम्ही परिस्थितिशरण पिढी बनवत आहोत, हे आपल्या लक्षात येत नाही.

आपल्या व्यवस्थेतच दोष आहेत, हे मान्य करू. हा दोष आमच्या विचार करण्याच्या पद्धतीतील भरकटलेल्या दिशेमुळे निर्माण झाला आहे, हेही आपण स्वीकारू. पण, चुका कधी ना कधी दुरुस्त कराव्याच लागतात. एका रात्रीत व्यवस्था बदलत नाही हे मान्य केले, तरी व्यवस्थाबदलासाठी मानसिकता बनविणे व पुढाकार घेणारे काहीजण तरी पुढे येणे महत्त्वाचे असते. आणि येथे तर पुढाकार पालकांना घ्यावा लागणार आहे; पण त्यासाठी पालकांनाच शिक्षण म्हणजे नेमके काय, याची जाण व भान देणे आवश्यक आहे. वर्तमानाचेच ते आव्हान आहे.

## ■ जागतिकीकरणाकडे वाटचाल

आज आपण जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आहोत. राष्ट्रवादही आपले स्वरूप बदलतांना दिसत आहे; त्यामुळे भविष्यातील जागतिकीकरण नेमके कसे असेल, हेही आपल्याला अंदाजावे लागेल. जागतिक ज्ञान अशी संकल्पना असली, तरी सर्वच ज्ञान जगातील सर्वांनाच उपलब्ध होऊ शकत नाही. अनेक राष्ट्रे आपापली ज्ञानात्मक गुपिते जपत असतात. त्याला आपण बौद्धिक भांडवलशाही म्हणू शकतो व ती मक्तेदारीयुक्तच असणार, यात शंका बाळगायचे कारण नाही. त्यामुळे इतरांनी ज्ञान विकसित करावे व मग त्यापासून आपण शिकावे आणि बौद्धिक श्रमिक म्हणून पोटापाण्याला लागावे अशी योजना, आज आहे तशीच नजीकच्या भविष्यात असेलच, असे नाही. खरे तर ज्ञानावर समस्त मानवजातीचा अधिकार हवा; पण तसे वास्तव नाही आणि आपली सुरुवात तर ज्ञान म्हणजे काय, या प्राथमिक स्तरावरच घुटमळते आहे. माहिती म्हणजे ज्ञान नव्हे, हे अजून अगणित नागरिकांना तर माहीतच नाही. ते माहीत नसेल तर भविष्यातील ज्ञान-क्रांतीच्या दिशा कोणत्या असतील, हे नेमके कसे समजणार? त्या शोधण्यासाठी आम्ही भारतीय कसा प्रयत्न करणार? आजही उच्चविद्याविभूषित या संदर्भात गोंधळलेले दिसतात; सामान्यांची मग काय गत असणार?

भविष्यातील बुद्धिवाद हा आज आहे तसा

राहणार नाही. भविष्यातील सामाजिक व आर्थिक आव्हानेही वेगळी असतील. त्याची प्रारूपे बदलतील. प्रश्नांचे गुंतवळे वेगळ्या स्वरूपात सामोरे येतील. किंबहुना, जीवनशैलीच अत्यंत वेगळी बनलेली असेल. पण, ती कशी असेल अथवा असावी, हे ठरविण्याचीही शक्ती आम्ही प्रगल्भ पिढ्यांच्या अभावात घालवून बसलेलो असू. प्रगल्भ पिढी घडते ती बंधमुक्त शिक्षणातून, मानवी प्रेरणांना अवसर देणाऱ्या खुल्या व्यवस्थेतून. आज आपल्याला सर्वप्रथम विचार करावा लागणार आहे तो शिक्षणाबाबत, तिच्या पद्धतीबाबत, कार्यक्षम अंमलबजावणीबाबत. पालक ते शिक्षक आणि सभोवतालची व्यवस्थाच सक्षम नवी पिढी बनवू शकते. आम्हाला केवळ साक्षर नकोत, तर बौद्धिक झेपा घ्यायला निरंतर सज्ज अशा प्रगल्भ वाघांची पिढी घडवायची आहे. त्यातच आमच्या समाजाचे, राष्ट्राचे उज्ज्वल भविष्य सामावलेले आहे, हे आम्हाला लक्षात घ्यावे लागेल.

समाज कसा असणार हे समाजात बुद्धिवंत, प्रज्ञावंत किती अहेत व ते कोणत्या दिशेने विचार करतात यावर जेवढे अवलंबून असते, तेवढेच ते अन्य राष्ट्रे कोणत्या दिशेने प्रगती करत जातात, यावरही अवलंबून असते. परकीय प्रभावाने समाजाची दिशा ठरणे अनेकदा अडचणीचे असते, कारण मुळात त्यांच्या प्रगतीचा मूलगाभा न समजताच अनुकरणातून ही दिशा नाइलाजाने स्वीकारावी लागत असते. आपल्याला तसे होणे परवडणारे नाही, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

## ■ कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्रमानवीकरणाची आव्हाने

प्रगत राष्ट्रांत सध्या जोरदार चर्चा चालू आहे ती श्रमिकांची व कनिष्ठ कार्यांसाठी लागणाऱ्या कर्मचाऱ्यांची जागा यंत्रमानवाने घेणे कितपत सयुक्तिक व नैतिक आहे, यावर. औषधी उत्पादन, शेतकी ते अनेक रसायनी उद्योगांत अवाढव्य कारखाने यंत्रमानवाच्या वापराला पसंती देताना दिसून येतात. काहींनी त्यांचा वापर सुरूही केला आहे. त्यात आता भर पडली आहे ती म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) या वेगाने विकसित होत चाललेल्या संकल्पनेची. येथे मानवी मेंदूची जागाच संगणक कसा घेईल, याचा प्रयत्न सुरू आहे. संगणक सध्या माहितीचे विश्लेषण करतो; पण निर्णय घेत नाही. आवाज ऐकून त्याचे भावात्मक विश्लेषण करत नाही. वासही घेऊ शकत नाही, की पर्यावरणीय बदलांना प्रतिसादही देत नाही. विचार करणे, हे मानवाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य. पण, सध्याचा संगणक विचार करू शकत नाही.

पण, संगणकाने तसे करावे... किंबहुना संगणकाने मनुष्याचीच जागा घ्यावी, यासाठी प्रयत्न होत आहेत. यासाठी पुंजयामिकीय संगणकप्रणाली (Quantum mechanic based system) बनवता येईल, अशी संकल्पना मी १९९८ साली बेंगळुरू येथे एका कार्यशाळेत मांडली होती. हे काम माझ्या हातून होऊ शकले नसले, तरी आता जगात याही दिशेने प्रयत्न सुरू आहेत व त्याला कधी ना कधी यश मिळेल, यातही शंका नाही. शिवाय, मानवी मेंदू व संगणकीय चिप्स यांचा संकर करूनही अधिक प्रगत अर्धयंत्रमानव बनवता येईल का, या शक्यतेवर केवळ वैज्ञानिकाच नव्हे, तर शास्त्रज्ञही विचार करत आहेत, प्रयोग करत आहेत. म्हणजेच माणसाची जागा संगणक घेऊ लागेल, अशी शक्यता येत्या ७-८ वर्षांत नाकारता येत नाही.

समजा, उद्या सर्वच उद्योगांनी यंत्रमानव वापरायला सुरुवात केली व पगारी नोकरांची गरजच संपवली तर काय हाहाकार उडू शकतो, याची आपण कल्पना करू शकतो. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मानवसदृश संगणक-मानवाची निर्मिती झालीच, तर मग तर मनुष्याचीच गरज राहणार नाही की काय, अशीही भीती आहेच. या सर्वांत कायदा महत्त्वाचा रोल बजावत प्रायोगिक पातळीवर सोडले तर अन्यत्र असे घडू दिले जाणार नाही, हा आपला आशावाद आहे. रोबोटिक्सचा उपयोग आजच अनेक क्षेत्रांत करायला सुरुवात झाली आहे. उद्या ती लाट सर्वत्र पसरायला वेळ लागणार नाही. उदाहरणच द्यायचे झाले, तर फोक्सकोन (Foxconn) या जगातील अवाढव्य कंत्राटी उत्पादक कंपनीचे घेता येईल. चीनमध्ये २०११ साली या कंपनीचे दहा लाख कर्मचारी होते. याच वर्षी कंपनीने दहा हजार रोबो बसवले व यंत्रमानवीकरणाची सुरुवात केली. आता दर वर्षी तीस हजार रोबो बसवले जात आहेत. कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी टेरी गौ म्हणतात, की हाच दर ते प्रतिवर्षी एक लाख रोबो एवढा वाढविणार आहोत. याचाच अर्थ, दहा लाख कर्मचाऱ्यांची गरजच राहणार नाही. अन्य कंपन्यांचीही हीच दिशा आहे.

याचा अर्थ आम्हा भारतीयांना आजच समजून घ्यावा लागेल. एकीकडे रोजगार कमी होतील हे जेवढे सत्य आहे, तसेच दुसरीकडे या नव्या क्षेत्रांत मानवी रोजगारही वाढतील, असा आशावाद अनेक अर्थतज्ज्ञ करतात. कोणाचा आशावाद अथवा निराशावाद खरा ठरेल, याचे भवितव्य वर्तवता येणे शक्य नसले तरी यंत्रमानव व कृत्रिम बुद्धिमत्ता ही आव्हाने आहेत हेही मात्र खरे.

वरील बाबतीत नैतिकतेचा सिद्धांत चर्चिला जातो. माणसाची जागा कृत्रिम श्रमकौशल्ये व कृत्रिम बुद्धिमत्तेला घेऊ देणे हे नैतिक होणार नाही, कारण त्यामुळे माणसाचीच गरज संपेल व ते नैतिक व मानवीय होणार नाही, असा युक्तिवाद केला जातो. या युक्तिवादात नक्कीच तथ्य आहे; परंतु नैतिकतेचाच इतिहास पाहिला तर माणसाने आपल्या नीतितत्त्वांतही सोयीनुसार फरक केल्याचे आपल्या लक्षात येईल. संगणक क्रांती येण्याआधी भारतात तिला नैतिकतेच्याच पातळीवर विरोध करणारे, अगदी विद्यमान सरकारात असलेल्या पक्षासहित, अनेक होते, हे आपल्याला माहीतच आहे. पण, नीतिमूल्ये बदलतात, कायदेही बदलतात. त्यामुळे भविष्यात कायद्यांचे अथवा नैतिक मूल्यांचे संरक्षण राहीलच, असे नाही. ते वेळ येताच जाऊ शकते, याचे भान आम्हाला असले पाहिजे. कोणतीही नीतिमूल्ये ही स्थिर नसतात. भविष्यातील मूल्ये काय असतील, याबाबतही आपल्याला विचार करावा लागणार आहे. प्रवाहाबरोबर नुसते दैवगती समजत वाहत राहायचे की प्रवाहालाच दिशा देणारे व्हायचे, हे आमच्याच हाती आहे.

शिवाय, सारी कामे यंत्रांनी केली व माणसाला काही कामच राहिले नाही, तर तो उत्पन्न मिळवणार कोठुन? जगणार कसा? तो

बाजारातून काय व कसे खरेदी करेल? कारण, खरेदी करायला उत्पन्न म्हणजेच क्रयशक्ती लागते. रोबोला शारीरिक गरजाच नसल्याने तो काही केल्या खरेदीदार होणार नाही. थोडक्यात, संपूर्ण अर्थव्यवस्थाच कोलमडून पडेल किंवा सर्व मानवी नागरिकांना फुकट वा अतिस्वस्त जीवनमान उपलब्ध करून द्यावे लागेल. पण, मग उद्योगांच्या नफेखोरीचे काय? नफ्याखेरीज ते कशाला उत्पादने करतील? किंवा असेही होईल, की रोबोटिक्सच्या वापरामुळे उत्पादनेच एवढी स्वस्त होतील, की अल्प रोजगारातही अथवा बेरोजगारांनाही सुखसमृद्ध जीवन जगता येईल, अशी परिस्थिती निर्माण होईल. पण, आपण एका अनिश्चित स्थितीकडे वेगाने वाटचाल करत आहोत व नेमके त्याचेच भान आपल्याला नाही.

## ■ पुढारलेले विज्ञान व तंत्रज्ञान

अनेकदा असे म्हटले जाते, की आजकाल तंत्रज्ञानाचा वेग अचाट वाढला आहे. एक व्हर्जन येते न येते तोच त्याहीपेक्षा प्रगत व्हर्जन बाजारात हजरच असते. हे खरे आहे, की मानवी जीवन सुखद व्हावे, यासाठी तंत्रज्ञाने नवनवीन संशोधन करत प्रगत होतात व त्यामुळे नवनवीन उत्पादने आपल्यासाठी आणत असतात. तंत्रज्ञानाचा वेग अधिक नसून ते शिकण्याचा आपला वेग कमी आहे, हेही एक वास्तव आहे, हे मात्र आम्ही विसरत असतो. शिवाय, तंत्रज्ञानाची गरज कितपत आहे, याचाही अंदाज आम्हाला कधीच येत नाही. कारण, ते ठरविणारी साधने नेहमीच बाह्य असतात. आम्ही तंत्रज्ञान वापरू अथवा न वापरू, ती शिकण्यात आम्हाला रस असतो का, तेवढी जिज्ञासा असते का, हा प्रश्न मात्र अवश्य असतो. कल्पक, जिज्ञासू, अभ्यासू व बौद्धिक मेहनत घेऊ शकणाऱ्यांचीच फक्त भविष्यात गरज असेल का, हा प्रश्न आपल्यासमोर आजच उभा ठाकला आहे व तशी स्थिती निर्माण झालीच तर तिला कसे तोंड द्यायचे, याचीही खबरबात आपल्याला नाही, हे वास्तव आहे. आज जी स्मार्ट मशिन्स निर्माण होताहेत, त्यांचा सरासरी आयक्यू १०० एवढा आहे. तंत्रज्ञानातील प्रगती याच वेगाने सुरू राहिली, तर पुढील २५ वर्षांत अमेरिकन नागरिकांच्या सरासरी आयक्यूच्या ९०% पेक्षा जास्त आयक्यू असणारी कृत्रिम बुद्धिमत्ता तयार होईल. म्हणजेच, एकट्या अमेरिकेतील पाच कोटी रोजगार जातील, असा तज्ज्ञांचा होरा आहे. जगात काय होईल, याची कल्पना केलेली बरी.

या स्मार्ट मशिन्स, म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता असलेले यंत्र वा संगणक-मानव काय-काय करू शकतील? काही उदाहरणे आपण येथे अवश्य पाहू या. श्रमिकांची जागा घेणे हा एक भाग झाला. तेथे अधिक बुद्धिमत्तेची गरज नसते. आजकाल पोकलँड वगैरे बऱ्यापैकी श्रमिकांची जागा घेतच आहेत व त्यामुळे रोजगार कमी होतोय, असेही फारसे दिसत नाही. पण, सध्या मुळात श्रमिकांचीच कमतरता जगभर भेडसावत आहे. त्यामुळे त्यांचा परिणाम न जाणवता उलट काम वेगाने होऊ लागले आहे, असे एकीकडे चित्र आहे. पण, ही झाली आजची अवस्था. मनुष्याची गरज असते नियंत्रण ठेवण्यासाठी व स्थिती पाहून त्वरित निर्णय घेण्यासाठी.

पण, आता तंत्रज्ञान फार पुढे जाते आहे. अगदी वैद्यकीय क्षेत्रातही कृत्रिम बुद्धिमत्ता वापरात येऊ लागली आहे. उदा.- जॉन्सन अँड जॉन्सन या कंपनीने २०१३ मध्येच सिडॅसिस मशिन बनवले आहे. आता कोणत्याही भूलतज्ज्ञाची गरज उरणार नाही, अशा पद्धतीने हे वैद्यकीय मशिन काम करते. रेडिओलोजीसारख्या अत्यंत तज्ज्ञतेची गरज असलेल्या क्षेत्रातही संगणकीय कृत्रिम बुद्धिमत्ता डायग्नोसिस करण्यासाठी वापरता येईल, असे संशोधन पूर्ण झाले आहे. मानसशास्त्रासारख्या क्षेत्रातही मानसिक समस्यांचे विश्लेषण नजीकच्याच काळात संगणक करू लागतील, अशी चिन्हे आहेत. म्हणजे, भविष्यात जनरल फिजिशियनची तर मुळीच गरज राहणार नाही, अशी ही चिन्हे नाहीत काय?

खरे म्हणजे मानवी गरजांचा वेग भागवायला तंत्रज्ञान मागून पळत असते. किंवा अनेक गरजा कृत्रिमरीत्याच अशा उत्पन्न केल्या जातात, की सगळ्यांना ती जणू आपली नैसर्गिक गरजच आहे, असे वाटून ते गरजपूर्ती करण्यासाठी नव्या साधनामागे पळू लागतात. भविष्यातील आपल्या गरजा काय असतील, याचा आपल्याला मुळात अंदाजच नाही. आपल्याला मोबाईलची एवढी गरज असेल, असे जर कोणी २५ वर्षांपूर्वी सांगितले असते तर आपण त्याला वेड्यात काढले असते. पण, आज भिकाऱ्याचेही मोबाईलशिवाय चालत नाही, हे वास्तव आहे. म्हणजे कोणत्या गरजा आपल्यात निर्माण केल्या जातील, हे आपल्याला माहीत नसते किंवा आपण त्यावर विचारही करत नाही. प्रवाहात येईल त्या लाटेवर स्वार व्हायचे तेवढे आपल्याला माहीत असते; पण लाट निर्माण करण्याची क्षमता विकसित करण्यासाठी जे वातावरण व बौद्धिक सामर्थ्य लागते ते आमच्यात आहे का, हा खरा प्रश्न आहे. ते नसेल तर आपल्या महान संस्कृती आणि परंपरांच्या वायफळ गप्पा हाकण्यात काही अर्थ नाही, हे ओघाने आलेच.

## ■ पेच : शिक्षण व गुणवत्तेचा

दुसऱ्याच भागात मी म्हटल्याप्रमाणे मुळात आमची शिक्षणव्यवस्थाच इतकी बंदिस्त आणि आदिम आहे, की त्यापुढे गुरुकुलातील शिक्षण बरे वाटावे. मुळात आमच्या शिक्षणपद्धतीला कसल्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा आधार नाही. व्यावहारिक/जीवन स्पर्धेत अडकलेले पालक आपले अपत्य अमुकच का शिकावे- तमुक का नाही, या विचाराने नव्हे तर आपले अपत्य काय शिकले तर त्याला व म्हणून पालकांना भविष्यात व्यावहारिक फायदा होईल, याचाच विचार करतात आणि शिक्षणपद्धती त्याला साथ देते. नव्हे, त्या विचारसरण्यांना प्रोत्साहन देते. बरे, व्यावहारिक फायदा म्हणजे तरी काय? तर आज ज्या क्षेत्रात मागणी आहे, त्यातच पोरा-पोरींना कसेबसे ढकलत एकदाचे एखाद्या नोकरीला चिकटवायचे. हे झाले, की त्यांना कृतकृत्य झाल्यासारखे वाटते. दशकापूर्वी आयटी क्षेत्रात मोठी मागणी होती; म्हणून कोणीही त्या क्षेत्रात शिक्षण मिळवायला धडपडू लागले होते. फायदा झाला तो शिकवणाऱ्या संस्थांचा. आज या क्षेत्रातील मागणी-पुरवठा पार बदलून गेला आहे. हे जिवंत उदाहरण आहे. अनेक क्षेत्रांचे तसे झाले आहे. भविष्यातही असेच होईल. कारण

बौद्धिक साधनसंपत्तीची जपणूक, वाढवणूक आणि त्यासाठी आवश्यक काटेकोर नियोजनच आपल्याकडे नाही.

शिक्षणाचेही मूलभूत तत्त्वज्ञान असते, याचा विसर सर्व व्यवस्थेला पडला आहे. त्यातूनच बनचुकेगिरी, बनवेगिरी व शैक्षणिक व्यभिचाराला ऊत आला आहे. आम्ही शिक्षणाच्या निमित्ताने शिक्षण देणाऱ्यांना व्यभिचारी व्यापारी बनायला प्रोत्साहन देत पुढील पिढ्यांचे पंख छाटून टाकण्याच्या उद्योगाला हातभार लावत आहोत, हे पालकांच्या लक्षात येईल तो सुदिन! आम्हाला भविष्यातील आव्हानांचा वेध घेऊन त्या आव्हानांवर स्वार होणारी पिढी घडवायची आहे आणि त्याचा मार्ग आम्ही ही पिढी कशी घडवायला हातभार लावतो, यावर अवलंबून आहे.

## ■ शेतीचे बदलते स्वरूप

आमच्या आजच्या समस्या या वेगळ्याच आहेत. खरे तर आदिम स्तरावरच्या आहेत. कुपोषणाच्या आहेत. शेतीतील हाहाकाराच्या आहेत. शोषित-वंचितांच्या हातांना मुळात काय आणि कसे काम द्यावे, याच्या आहेत. आमच्या समस्या जातीय आहेत आणि धार्मिकही आहेत. याच समस्यांनी आमचे जीवन एवढे व्यापले आहे, की आम्ही आमच्याच कालांधारी गुंफेत रममाण होत हाती असली-नसलेली शस्त्रे परजत एकमेकांवर द्वेषाने तुटून पडलो आहोत. आरक्षण हेच आम्हाला आजही प्रगतीचे साधन वातते; पण जातसमस्या या वेगळ्या अर्थसमस्येत बदललेल्या आहेत आणि त्यावर नवे उत्तर शोधले पाहिजे, हे आमच्या सामाजिक विचारवंतांच्या गावीही नाही. प्रत्येक जातीत एक वेगळी स्तरीय संरचना झाली आहे आणि आपल्या जातीय हक्कांसाठी जे संघर्ष करतात, ते आपल्याच जातीतील वंचितांबाबत मात्र कसलीही भूमिका घेत नाहीत. जातिनिर्मूलनाचा आव आणणारे चळवळे आपल्याच जातीतील पोटजातीही अद्याप हटवू शकलेले नाहीत. सर्वधर्मीय मूर्ख धर्ममार्तंड आणि त्यांचे उन्मादी अनुयायी कालबाह्य, जमिनीतच गाडून टाकण्याची योग्यता असलेल्या धर्मग्रंथांतील येडचाप धर्माज्ञांना शिरोधार्य मानत आजही अमानवी व्यवहार तर करतातच; पण प्रसंगी हिंसकही होतात. आणि हे मतानुनयी शासन ते खपवूनही घेते. पुढील साताठ वर्षांत या स्थितीत बदल होण्याची सुतराम शक्यता नाही. प्रमाण तेवढे कमी-अधिक होऊ शकते, एवढेच. वंचितांची संख्या अधिक असणे, हे अर्थव्यवस्थेचे अपयश आहे. आपण समाजवादी अर्थव्यवस्था अधिकृतपणे स्वीकारल्यामुळे नागरिकांना पुरेसे व्यवसायस्वातंत्र्य नाही. शेतकरी व शेती तर कायद्यांच्या कचाट्यात बांधून ठेवलेली आहे. आपला संपत्तीचा अधिकार, व्यवसायाचे स्वातंत्र्य केवळ कागदावर असून प्रत्यक्षात व्यवसाय करू पाहणाऱ्याला परवान्यांच्या चक्रात आजही एवढे अडकवले गेले आहे, की ९०% होतकरू व्यावसायिक पहिल्या किंवा दुसऱ्या फेरीतच गारद होतात. आपले वित्तधोरण समाजानुकूल नसून ते फक्त नफ्यातच असलेल्या उद्योजकांना अनुकूल आहे. मग तो नफा केवळ कागदोपत्री असला, तरी चालतो. तात्कालिक कारणांनी अडचणीत आलेल्या व्यवसायांना वित्तीय संस्था नुसत्याच वाळीत टाकत नाहीत, तर वसुलीची सारी शस्त्रे उपसतात व पुन्हा सावरू शकणाऱ्या उद्योगाला ठारच मारून टाकतात आणि याला आम्ही समाजवादी धोरणे म्हणतो! समाजवाद हा अल्पसंख्याक भांडवलदारांच्या हितासाठी राबत असतो, जनसामान्यांच्या नाही हे आम्हाला सत्तर वर्षे उलटून गेली तरी समजलेले नाही. लघुतम ते मध्यम उद्योग वेगाने पुढे यावेत, तरच आपल्या देशातील बेरोजगारीची गहन होत चाललेली समस्या सुटायला मदत होईल, हे आमच्या गावीही नाही.

पंचावन टक्के नागरिक शेतीवर अवलंबून आहेत. हे नागरिक आर्थिकदृष्ट्या सबल होत नाहीत, तोवर त्यांची क्रयशक्ती वाढून देशाची अर्थव्यवस्थाही भरभक्कम होणार नाही. जागतिकीकरणाचे लाभ उद्योगजगताला होत असले, तरी शेती हे क्षेत्र मात्र एवढ्या बंधनात आहे, की जागतिकीकरण हे त्याला मात्र शापासारखे झाले आहे. म्हणजेच, हे सरकार एका क्षेत्राबाबत थोडेफार उदार असले, तरी मूलभूत क्षेत्राबाबत अनुदार आहे, हे उघड आहे आणि ही समाजवादनिर्मित भीषण विषमता आहे. समाजवादाला तिलांजली देत आम्ही स्वतंत्रतावादी आर्थिक धोरणे स्वीकारणार आहोत की नाही, हा खरा प्रश्न आहे व याचा निकाल आम्हाला येत्या सन २०२५ पर्यंत तरी लावावाच लागेल.

## ■ आर्थिक व सामाजिक समस्यांचा ताळमेळ

आर्थिक प्रश्न आणि सामाजिक प्रश्न यांचा निकटचा संबंध आहे, हे समजून घ्यायला हवे. दरिद्री लोक आपली जात हेच जगण्याचे शस्त्र बनवून इतरांचा द्वेष करू लागतात; किंबहुना वंचितता हे सामाजिक लढ्यांचे मुख्य भांडवल असते. हेच भांडवल साम्यवादी, नक्षलवादी वापरत आहेत व नव्या उद्रेकाच्या दिशेने देशाला नेत आहेत आणि हे पाहत असूनही त्यावर निरंतर सामाजिक चर्चेची आम्हाला गरजच भासत नाही, यातच आमचा बौद्धिक सवंगपणा दिसून येतो.

एकीकडे जग अत्याधुनिकतेकडून अति अत्याधुनिकतेकडे वाटचाल करू पाहत आहे. आमची वाटचाल भविष्याकडे कमी व गतकालीन संघर्षाकडेच अधिक होत आहे. अर्थप्रेरणा विकसित करून त्यांना वाव देणारी व्यवस्था निर्माण करायची असेल, तर आम्हाला आधी आमच्या ज्ञानप्रेरणा बदलाव्या लागतील, हे आम्हाला समजून घ्यावे लागेल. जगाच्या नुसत्या ज्ञानात भर घालण्याची कामगिरी आम्हाला करून चालणार नाही, तर नव्या जगाला सुसंगत अर्थतत्त्वज्ञानही तयार करावे लागेल. ते उधार-उसनवारीने नव्हे, तर स्वयंप्रेरणांनी.

सात-आठ वर्षे हा इतिहासात फार छोटा टप्पा असला, तरी असंभाव्य कार्येही अल्पकाळात जगात झालेली आहेत. पण, आम्ही मनावर साठलेली जळमटे साफ करून स्वच्छ दृष्टीने जगाकडे पाहतो की नाही, यावर हे अवलंबून आहे. येत्या साताठ वर्षांत एवढे जरी साध्य झाले, तरच जगाच्या स्पर्धेत भारतीय माणूस सन्मानाने जगू शकेल, अशी आशा आहे.



**संजय नहार**
संस्थापक, सरहद



# सावध ऐका पुढल्या हाका...

**भारत देश हा वैविध्यपूर्ण आहे. संपन्न बहुसांस्कृतिक व बहुभाषिकतेचे प्रतिनिधित्व करणारे हे जगाच्या पाठीवरचे एकमेव राष्ट्र आहे. असे असतानाही आगामी काळात अनेक खडतर आव्हानांना या देशाला सामोरे जावे लागू शकते. भूतकाळापासून योग्य तो धडा घेतला नाही आणि त्यानुसार योग्य पावले उचलली नाहीत तर देशाचा भूगोल धोक्यात येतो, हे ऐतिहासिक वास्तव समजून घेता आले पाहिजे. पुढील दशकामध्ये देशाची प्रगती ही केवळ आर्थिक नव्हे, तर येथे प्रस्थापित असणारी शांतता, सौहार्दपूर्ण वातावरण आणि एकात्मकतेची भावना यांवर अधिक अवलंबून असेल. तसे झाले नाही, तर दहशतवादाचे जगभरात घोंगावू लागलेले वादळ आपल्या देशात केव्हाही येऊ शकते. तेव्हा परस्परांवर दोषारोप न करता परिस्थितीचे वास्तविक, तर्कशुद्ध आकलन आपणा सर्वांनीच करून घेणे गरजेचे आहे. राज्यकर्ते, धोरणनिर्माते यांनाही भविष्यातील आव्हाने पेलण्यासाठी संयम, धाडस, सर्वसमावेशकता आणि प्रामाणिक प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल.**

राष्ट्राचा विकास हा तेथील राजकीय, सामाजिक व आर्थिक स्थैर्य यांवर प्रामुख्याने अलवंबून असतो. आगामी १० वर्षांत आपल्या देशापुढे एकात्मता व अखंडता यांवर परिणाम करणाऱ्या घटनांची मालिका सुरू होते की काय, अशी शंका मला भेडसावते आहे. गेल्या काही वर्षांमध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरांवर घडणाऱ्या अनेक घडामोडींचा अभ्यास करता, भारताला आगामी काळात देशातील शांतता व सुरक्षितता जपण्यासाठी अत्यंत सजग राहावे लागणार आहे. एकीकडे काश्मीर, दुसरीकडे ईशान्येकडील राज्यांवर प्रभाव पाडण्यासाठी चीनचा सुरू असलेला प्रयत्न याचबरोबर तिसऱ्या नव्या आणि काहीशा कठीण आव्हानाची भर येथे पडू शकते. ती म्हणजे, दहशतवाद आता सीमा ओलांडून देशात घुसण्याची. हा प्रश्न अत्यंत कल्पकतेने, संयमाने आणि दूरदृष्टीने हाताळावा लागेल; अन्यथा त्याच्या दुष्टचक्रात अडकण्याचा धोका आहे.

पंजाब, काश्मीर तसेच ईशान्येकडे आसाम, मणिपूर, नागालँड असे अशांत समजले जाणारे प्रांत मी 'सरहद'च्या कार्याच्या निमित्ताने पालथे घातलेले आहेत. तेथील समाजाशी, संबंधित घटकांशी सातत्याने संवाद साधत असल्याने प्रत्येक समस्येचे कारण समजून घेण्याची संधी मला मिळाली. पंजाबमधील दहशतवादाचे उग्र स्वरूप मी पाहिलेले आहे आणि तो शमविण्यासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांचाही जवळून साक्षीदार झालो आहे. काश्मीरमध्ये आम्ही अनेक वर्षांपासून कार्यरत आहोत. तेथील लोकांना भारतातील अन्य



प्रदेश जाणून घेता यावा आणि देशाच्या इतर राज्यांतील लोकांना काश्मीरची खरी ओळख व्हावी, यासाठी आम्ही प्रयत्नशील असतो. देशाच्या मुख्य प्रवाहात काश्मिरी प्रतिभेला स्थान मिळवून देतानाच देशाला त्यांच्या काश्मिरीयत भावनेची नेमकी ओळख करून देणे, जाणीव करून देणे, असा आमचा सदैव प्रयत्न राहिलेला आहे. यातून संवादाची दिशा सापडते. शस्त्रांनी नव्हे, तर संवाद आणि आत्मीयतेनेच सर्व प्रश्न सुटू शकतात, याची अनेक उदाहरणे आमच्या अनेक उपक्रमांतून पुढे आली, हे इथे आवर्जून नमूद करावेसे वाटते.


काश्मीर येतोय बाह्य शक्तींच्या विळख्यात

जम्मू आणि काश्मीर यांचे भारतातील विलीनीकरण आणि त्यानंतर आपला पाकिस्तानशी सातत्याने सुरू असलेला संघर्ष आपणास ठाऊक आहेच. केवळ धर्माच्या आधारावर फाळणी झाली आणि काश्मिरात बहुसंख्याक समाज मुस्लिम आहे, या एकाच तर्कावर पाकिस्तान काश्मीरवर हक्क गाजवू पाहतो. सर्वसामान्य भारतीय समाजदेखील पाकिस्तानचा हट्टाग्रह, त्यातून उडालेले लष्करी संघर्ष आणि नंतर घुसखोरीच्या माध्यमातून दहशतवाद्यांना दिल्या जाणाऱ्या पाठबळामुळे चिंतित तसेच क्रोधित आहे. यामध्ये काश्मीर खोऱ्यातील नागरिकांची अवस्था मात्र कठीण होत गेली. मुळात काश्मीर प्रश्न सोडविणे हे आपल्या धोरणकर्त्यांना, राज्यकर्त्यांना आणि नोकरशाहीला वाटते तितके सोपे राहिलेले नाही, हे वास्तव आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे, या प्रश्नाकडे आपण केवळ भौगोलिक व राजकीय चष्म्यातून पाहत आलो. या प्रश्नाचे उत्तर दडलेले आहे ते काश्मीरच्या इतिहासात. पाकिस्तान व अन्य इस्लामी देशांमध्ये प्रचलित असणारा इस्लाम आणि काश्मीरमधील इस्लाम यांत मूलभूत फरक आहे. काश्मिरी समाज व संस्कृतीवर शैव व सुफी तत्त्वज्ञानांचा मोठा पगडा आहे. शैविझम, बौद्धिझम आणि सुफिझम या तिन्ही प्रवाहांच्या मिलाफातून काश्मिरीयत विकसित झालेली आहे. काश्मिरातील हिंदू असो वा मुस्लिम, दोन्ही धर्मांना या तत्त्वज्ञानांतील अंतःस्थ प्रवाहांनी घडविले आहे. निरागसता आणि त्याच जोडीला विद्रोही ही काश्मिरींची ओळख होय, हे काश्मिरीयत समजून घेताना लक्षात घ्यावे लागेल. आपले सर्वांचे पूर्वज एक आहेत, हे येथील सर्वांनाच माहीत आहे, मान्यही आहे. त्याच वेळी काश्मीरवर कोणाही त्रयस्थ शक्तीने राज्य केलेले नव्हते; त्यामुळे तेथे स्वातंत्र्याची मागणी झाली तरी पाकिस्तानात सामील होण्याची मागणी होत नव्हती. इतकेच काय, पाकव्याप्त काश्मीरमध्येही बहुतांश लोकांना पाकिस्तानचे वर्चस्व नकोसे आहे. तेथे भारताच्या बाजूची चळवळ सुरू आहे. काश्मीरमध्ये कट्टर इस्लाम रुजलेला नाही, याची कारणे याच काश्मिरीयतमध्ये दडलेली आहेत.

अलीकडच्या काळात केंद्र व राज्यातील सत्तांतर व पुढे सुरू झालेले दगडफेकीच्या घटनांचे सत्र यानंतर काश्मिरी नेतृत्वाशी दिल्लीचा असणारा संवाद जसजसा कमी होऊ लागला, तसतसा त्याचा फायदा पाकिस्तानने घ्यायला सुरवात केली आणि आपल्या हस्तकांमार्फत भारतविरोधी भावनेला खतपाणी घालण्यावर लक्ष केंद्रित केले. पाकिस्तानचे अस्तित्व हेच मुळात भारतविरोधी भावनेवर असल्याने असे करणे तेथील राज्यकर्ते, लष्कर यांच्या सोयीचेच होते. काश्मिरी पंडितांना तेथून परागंदा होण्याची वेळ आली, हिंदूंवर हल्ले होऊ लागले ते पाकिस्तानच्या या धोरणाचा भाग म्हणूनच. भारतापासून स्वतंत्र झाले तरी केवळ इस्लामच्या नावाखाली काश्मिरी लोक पाकिस्तानात येण्यास तयार होणार नाहीत, याची पुरेपूर कल्पना पाकिस्तानला असल्याने या 'काश्मिरीयत'पासून त्यांना दूर सारून 'इस्लाम'चे कार्ड वापरण्याचे प्रयत्न सुरू

झाले. लष्कर-ए-तोयबा, हिजबुल मुजाहिद्दीन यासारख्या अतिरेकी संघटनांना काश्मीरमध्ये घुसवून तेथील असंतोष वाढविणे व त्यानंतर त्याचा फायदा उचलून पुढील सूत्रे आपल्या हाती घेणे, हे त्यांचे ध्येय आहे. थोडक्यात, पाकिस्तानला काश्मिरीयत, तेथील जनभावनेशी देणेघेणे नाही. बांगलादेशाच्या निर्मितीचा सूड उगवणे, हा त्यांच्या द्वेषभावनेतून आलेला विचार त्यांच्या काश्मीर धोरणाचा गाभा आहे. सध्या तर अशी परिस्थिती आहे, की पाकिस्तानी लष्करालाही हा प्रश्न सुटायला नको आहे. कारण, त्यामुळे त्यांची आजवर असलेली पाकिस्तानवरील पकड निसटण्याची शक्यता त्यांना भेडसावते. बलुचिस्तान व पाकव्याप्त काश्मीर हे नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध असणारे भाग अमेरिकन प्रभावाकडून चीनच्या प्रभावाखाली आले आहेत. तेथील भविष्यातील आपले नियंत्रण वाढविण्यासाठी काश्मीर प्रश्नाचा उपयोग एक दबाव म्हणून केला जातो. लोकशाही मार्गाने आलेले कोणतेही शासन व त्यांचा भारताशी संबंध सुधारण्याकडे टाकलेले पाऊल पाक लष्कराच्या पचनी पडत नाही. कारगिलची लढाई हे त्याचे अगदी अलीकडचे उदाहरण. पाकिस्तानी धोरणानुसार काश्मिरातील तरुणाईमध्ये भारतविरोधात असंतोष भडकवून देणे, दुसऱ्या टप्प्यांत त्यांना काश्मिरीयतपासून वेगळे करून जिहादी बनविणे, हा त्यांचा डाव आहे. केंद्रामध्ये नवे सरकार आल्यानंतर लष्कराला देण्यात आलेली मुभा, हुरियतसारख्या स्थानिक संघटनांच्या नेत्यांवर ठेवण्यात आलेला अंकुश यांमुळे काश्मीरमध्ये नागरी जीवनात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी संवाद नेमका कुणाशी करायचा, हा प्रश्न उद्भवतो. १९९० पासून काश्मीर खोऱ्यात ३,३६० पेक्षा अधिक पोलिस कर्तव्य बजावताना हुतात्मा झाले आहेत. दुर्दैवाने त्यांची, त्यांच्या कुटुंबीयांची दखल फारशी घेण्यात आलेली नाही. याचा तेथील पोलिस दलाच्या मनोधैर्यावरही नक्कीच परिणाम झालेला आढळतो. अशा परिस्थितीत निर्माण होणाऱ्या पोकळीचा पाकिस्तान धूर्तपणे वापर करण्याचा धोका संभवतो. या धोक्याचे गांभीर्य अधिक यासाठी आहे, की आजवर सीमेवर लष्कर अथवा राज्यात पोलिस व सरकारी यंत्रणांपुरते मर्यादित असणारे त्यांचे 'युद्ध' ते आता सार्वत्रिक करू पाहत आहेत. आगामी काळात देशात दहशतवादाचे नवे पर्व सुरू होण्याचा धोका यातून स्पष्ट दिसू शकतो. देशात सामाजिक व धार्मिक सलोखा जेव्हा-जेव्हा बिघडतो, तेव्हा-तेव्हा दहशतवाद्यांना त्यातून संधी दिसते, कच्चा माल मिळतो. अगदी अलीकडे सुरू झालेल्या रोहिंग्यांच्या विषयाचाही वापर करून घेऊन कच्चा माल तयार ठेवण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. माझ्या मते, देशाच्या राजकीय नेतृत्वाने यातील गांभीर्य त्वरित ओळखायला हवे. एखादा दहशतवादी हल्ला होतो, तेव्हा त्याला तोंड देण्यासाठी अत्याधुनिक शस्त्रे तसेच प्रतिबंधक उपाययोजनांसाठी भलीमोठी आर्थिक तरतूद करावी लागते, जी आवश्यकदेखील आहे. मात्र, कोणत्याही समस्येच्या मुळाशी जाऊन ती संयमाने, परस्परविश्वासातून हाताळली गेली, तर अनेक संभाव्य धोके परस्पर टाळता येऊ शकतात. आणखी सोप्या शब्दांत सांगायचे झाले, तर जो बंदूक उचलेल त्याला मारावेच लागेल. मात्र, त्यातून आणखी कोणी बंदूक उचलू नये, यासाठीची उपाययोजनाही व्हायला हवी. डास मारावेच लागतील; मात्र त्यांची पैदास जिथून होते, ती डबकीही स्वच्छ करणे आवश्यक आहे. काश्मीर स्वतंत्र होऊ शकत नाही. त्याला भारत हाच एकमेव पर्याय आहे. पाकिस्तान हा पर्यायच नाही, हा विश्वास काश्मिरींना द्यावा लागेल. त्यासाठी त्यांच्यात पूर्वापार खोल रुतलेल्या 'काश्मिरीयत' भावनेचा आपण स्वीकार करणे गरजेचे आहे.

सीमावर्ती भागातील अशांततेचा विचार करता चीन व अमेरिकेतील वर्चस्वाच्या सुप्त संघर्षाचीही किनार या विषयाला आहे, हेही इथे लक्षात घ्यायला हवे. देशाच्या ईशान्येकडे होऊ घातलेल्या घडामोडी हे त्याचेच द्योतक आहे. आगामी दशक देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. प्रगल्भ राजकीय व सामाजिक जाणिवेतून समस्यांची उकल झाली, तर अनेक धोके निर्माण होण्यापूर्वीच संपू शकतात. हे साध्य करण्यासाठी समाजाला एकदिलाने राहावे लागेल. रोजगाराच्या जास्तीत जास्त संधी निर्माण झाल्या, तर तरुणांच्या हाताला काम मिळेल. ज्यांच्या हातांना काम नसते, अशांचे मेंदू विध्वंसक विचारांनी भरणे ही देशाच्या हितशत्रूंसाठी संधीच असते. ती त्यांना मिळूच नये, यासाठी जे-जे करता येईल, ते-ते करणे हे आपले कर्तव्य आहे. ते बजावतानाच परस्परांवरील विश्वास, आदर आणि आस्था केंद्रस्थानी असायल्या हव्यात. प्रगतीचे चक्र हे त्यातूनच फिरते आणि असे चक्र फिरले, तरच देशाचा खऱ्या अर्थाने विकास होतो. आर्थिक, सांस्कृतिक आणि एकात्मिकदेखील!





**सचिन ईटकर**
वरिष्ठ सल्लागार,
स्ट्रॅटेजिक फोरसाईट ग्रुप



# जग! चौकटीबाहेरचं, मनात सामावलेलं!

**देशाची सीमा ओलांडून परदेशी जाणे, तिथे राहणे, तेथील संस्कृती समजून घेणे आणि तेथील माणसांच्या मनात डोकावणे यात एक आगळाच आनंद सामावलेला आहे. मागील दोन दशकांमध्ये कामाच्या निमित्ताने मला सुमारे २३ देशांनी हा आनंद दिला. एखाद्या उत्तुंग इमारतीला जमिनीवरून पाहून त्याविषयीचे आकलन आणि त्या इमारतीच्या छतावरून खाली पाहताना जगाचे होणारे आकलन यांत जो फरक आहे, तो केवळ दृष्टीतून नव्हे तर दृष्टिकोनातून टिपून घेता यायला हवा. असा दृष्टिकोन विचारांत जिवंतपणा आणतो, असा माझा अनुभव आहे.**

परदेशाबाबत आपणा भारतीयांच्या मनात अपार कुतूहल, आकर्षण आहे. एके काळी सातासमुद्रापार जाणे म्हणजे निषिद्ध असे मानणारा भारतीय समाज आज जगाच्या कानाकोपऱ्यात जाऊन पोचला आहे. आजही जगभरातील बहुतांश प्रमुख पर्यटनस्थळी भारतीयांची संख्या नजरेत भरणारी ठरते. पर्यटनच नव्हे तर आयटी आणि इतर उद्योगांमुळे भारतीय व्यावसायिकही मोठ्या प्रमाणात परदेशी जाऊन स्थिरावले आहेत. एखाद्या प्रकल्पापुरता म्हणून गेलेला व्यावसायिक नंतर तिथेच रमला आणि स्थिरावला, अशी कित्येक उदाहरणे आपणास ठाऊक असतील.

माझ्या व्यावसायिक कारकिर्दीमध्ये कॉर्पोरेट क्षेत्रातील कालखंड मोठा होता. सुरवातीला हेल्थकेअर, एज्युकेशन अशा क्षेत्रांत जगभरातील नामवंत व्यक्ती, संस्था यांना कोणत्या ना कोणत्या निमित्ताने भेट देण्याची संधी मला मिळाली. नंतरच्या काळात, जगभरातील विविध राष्ट्रीय नेतृत्वांना, धोरणकर्त्यांना दिशादर्शन करणारे मा. संदीप वासलेकर यांच्यासमवेत काम करताना होत गेलेला प्रवास निराळा अनुभव देणारा ठरला. वासलेकर सरांनी 'देश कसा बघावा' याचा आगळा दृष्टिकोन दिला, हे इथे कृतज्ञतापूर्व नमूद करावे लागेल. आजवर अमेरिका युरोपपासून जगातील बहुतांश सर्व खंडांमध्ये माझा प्रवास झाला. प्रत्येक देशाची स्वतःची अशी ओळख, संस्कृती मनावर छाप पाडणारी ठरली. कोणतीही संस्कृती विकसित होते ती तेथील माणसांमुळे, त्यांच्या आचारविचारांतून. म्हणूनच कदाचित, कोठेही गेलो तरी अन्य कोणत्याही बाबींपेक्षा तेथील माणूस, समाज माझ्या मनात मी बिंबविला. जेव्हा-जेव्हा मोकळा वेळ मिळत असे, तेव्हा त्या-त्या शहरात, गावात फिरणे, तेथील लोकांशी संवाद साधणे यांतून मी त्या देशातील लोकांच्या मनातील संस्कृतीच्या अधिक जवळ गेलो. 'ज्या देशातील नेता श्रीमंत, बलाढ्य (हुकूमशहा) तो देश कमकुवत, गरीब आणि ज्या देशातील नेते आणि सर्वसामान्य नागरिक यांच्यात कोणताही फरक जाणवत नाही, तो देश खऱ्या अर्थाने श्रीमंत, समर्थ' अशा सोप्या भाषेत वासलेकर सरांनी केलेले विश्लेषण मी स्वतः अनुभवत गेलो.

प्रवास खूप झालेला आहे, अजूनही होतो. तरीही, मनात बिंबलेले काही देश आणि तेथील लोकांची, समाजाची जाणवलेली वैशिष्ट्ये म्हणावी तर साधी, स्वाभाविक आणि म्हणावी तर खूपच विशेष. माझ्या आजवरच्या परदेशप्रवासात अमेरिकेतील मुक्काम सर्वाधिक. तेथील कार्यसंस्कृती जगातील सर्वोत्तम अशीच. ही कार्यसंस्कृती निर्माण झाली ती तेथील लोकांच्या आचारविचारांतून, अगदी स्वाभाविकपणे. अमेरिकन समाजात वांशिक विषमतेला थारा नाही. केवळ आणि केवळ गुणवत्तेला प्राधान्य. तुमची जात, धर्म, प्रांत कोणता यावर तुमचे मूल्यमापन होत नाही;



होते ते केवळ तुमच्या गुणवत्तेवर. गुणवत्तेला सदैव प्रोत्साहन देणारी आणि त्याचवेळी सर्वांमध्ये गुणवत्ता विकसित व्हावी, यासाठी प्रयत्नशील असणारी ही संस्कृती हेच खरे तर त्या देशाच्या प्रगतीचे गुपित आहे. ज्याच्यात प्रतिभा आहे, कल्पना आहे, नवे काही करण्याचा निश्चित विचार आहे, त्याचे या देशाने नेहमीच स्वागत केल्याचे आढळते. भारतातील कित्येक प्रतिभावंत आज अमेरिकेत केवळ स्थिरावले नाहीत, तर त्यांनी तेथे आपला वेगळा ठसा उमटविलेला आहे. मग तेथील उद्योगक्षेत्र असो वा राजकारण. अमेरिकेला लँड ऑफ अपॉर्च्युनिटीज् (संधींचे आगर) म्हटले जाते ते यामुळेच. तेथील अगदी लहानात लहान ते बहुराष्ट्रीय अशा बड्या कंपन्यांमध्ये जाण्याची, तेथील लोकांशी संवाद साधण्याची संधी मला मिळाली तेव्हा एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे, तेथे सर्वजण संघभावनेने, एक टीम म्हणून काम करतात. नेमून दिलेली गोष्ट प्रामाणिकपणे करणे आणि आपल्या वरिष्ठांपासून कनिष्ठांपर्यंत सर्व सहकाऱ्यांना त्यात सामावून घेणे, ही बाब आपण, विशेषतः भारतीयांनी लक्षात घेण्याजोगी आहे. श्रेयवादाचे नाटक नाही किंवा कोणाचा कोणावर दोषारोप नाही, काम टाळणे नाही की कामाचा खूप बोजा आहे म्हणून तक्रारही नाही. अमेरिकेची कार्यसंस्कृती ही अशी आहे. मला आठवतं, कंपनीत असो वा सार्वजनिक ठिकाणी, पार्किंग करताना जो आधी येतो तो आपली कार दूर लावतो, जेणेकरून नंतर येणाऱ्याला प्रवेशद्वाराजवळ गाडी लावता यावी आणि त्याला त्रास आणि विलंब होऊ नये. आपल्याकडे याच्या नेमके उलटे चित्र दिसते. आपल्याप्रमाणेच इतरांच्या वेळेलाही अत्यंत मोल आहे आणि त्यांचा तो वेळ आपण वाचवू शकतो, ही भावना त्यांच्यामध्ये अगदीच सहजपणे जाणवते.

युरोप म्हणजे या भूतलावरील अनोखे विश्व. निसर्गाने भरभरून दिलेले आणि मनुष्याने तितक्याच आत्मीयतेने जतन केलेले. तंत्रज्ञानापासून पायाभूत सुविधांपर्यंत उद्योगासाठी सर्वोत्तम देऊ करणारी तेथील संस्कृती. दोन जागतिक महायुद्धांनंतर होरपळून गेल्यानंतरही अक्षरशः राखेतून स्वर्ग निर्माण व्हावा, अशा पद्धतीने युरोपातील देशांनी स्वतःला नव्याने विकसित केले. भूतकाळाचे अवजड आणि नकारात्मक ओझे घेऊन प्रगती होणार नाही, याची तेथील समाजमनाला पूर्णतः जाणीव आहे. म्हणूनच युरोपातील अगदी चिमुकल्या देशांनीदेखील नजरेत भरणारी प्रगती केलेली आहे. आपल्यासारखी शो-ऑफ म्हणजेच उथळ प्रदर्शन करणारी त्यांची संस्कृती नाही. आपल्याकडे शिस्त ही लावावी लागते, स्वच्छता ही राखावी लागते (म्हणजे तसे सांगावे लागते, लिहावे लागते). तिथे मुळात शिस्त आणि स्वच्छताप्रेम समाजाच्या नसानसांत भिनलेले असावे. पर्यावरणाशी असणारे त्यांचे नाते, त्याचे संवर्धन करण्यासाठी असणारी बांधिलकी पाहून खरोखरच आश्चर्य वाटते. सार्वजनिक वाहतुकीसाठी रेल्वे, ट्राम, बस तसेच सायकल आदी वाहने तेथील नागरिक प्राधान्याने वापरतात. सर्वसामान्य लोकच नव्हे, तर बडे उद्योगपती, मंत्रीही त्यांचाच वापर करताना दिसतात. लाल दिव्याचा रुबाब तिथे नाही. किंबहुना, कार चालवणे म्हणजे तुम्ही पर्यावरणाविषयी असंवेदनशील असण्याचे लक्षण मानले जाते. निसर्गाने भरभरून दिलेली साधनसंपत्ती वापरताना पर्यावरणाचा जराही ऱ्हास होऊ नये, यासाठी विलक्षण सजग असणारा समाज युरोपात सर्वत्र आढळतो. तेथेही वांशिक समानतेचे सूत्र समाजाने जोपासलेले आहे. बर्लिनपासून ॲमस्टरडॅमपर्यंत, बेल्जियमपासून नॉर्वेपर्यंत थोड्याफार फरकाने माझा हाच अनुभव आहे. अर्थात, अलीकडच्या काळात काही द्वेषमूलक घटनांमुळे येथील समाजमन जरासे चिंतित बनते. मात्र, संधी मिळताच त्यावर मात करून शांतता आणि सौहार्दाच्या छताखाली सर्वजण येतात.

जपानी लोक अत्यंत परिश्रमी, चिवट आणि तितकेच देशभक्त. दुसऱ्या महायुद्धानंतर अणुहल्ल्यांनी होरपळलेला आणि सातत्याने नैसर्गिक संकटांच्या आघातांनी त्रस्त असलेला हा देश तेथील समाजातील अंगभूत गुणांमुळे जगात पुन्हा दिमाखात उभा राहिला.





उत्तम संघभावना कोणाकडून शिकावी, तर ती जपानी लोकांकडून. कोरिया आणि सिंगापूर हे देश कष्टाळू लोकांनी विकसित केलेले. सिंगापूर तर जगातले एक प्रकारचे आश्चर्यच. स्वतःची हक्काची अशी कोणतीही नैसर्गिक साधनसंपत्ती नसतानाही या चिमुकल्या देशाने करून दाखवलेली प्रगती थक्क करून सोडते. आपला देश पर्यटकांमुळे उभा आहे, याची जाणीव तेथील सामान्यांतील सामान्य माणसाला आहे. त्यामुळे त्यांना लुबाडणे तर दूरच पण पर्यटकांना ते देवासमान मानतात. तसाच प्रकार दक्षिण कोरियाचा. मला आठवतं, सेऊलला ट्रॅफिक जॅम असल्याने आमच्या टॅक्सीचालकाने टॅक्सीचे बिल मीटरवर आले त्यापेक्षा कमी घेतले. 'ट्रॅफिक जॅम असल्याने तुम्हाला उशीर झाला, त्याबद्दल आम्ही तुमची माफी मागायला हवी. जास्तीचे बिल तर दूरची बाब,' अशा शब्दांत त्या टॅक्सीवाल्याने आम्हाला बिल कमी घेण्याचे कारण सांगितले.

पूर्वी सोव्हिएत रशियाचा भाग असणारा अझरबैजान हा चिमुकला देश. बाकू ही त्याची राजधानी. 'जगातील सर्वांत स्वच्छ शहर' असा त्याचा लौकिक. भूतकालीन ऐश्वर्याची परंपरा सांगतानाच, अत्याधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालून हा देश तिथे जाणाऱ्या प्रत्येकाच्या मनात घर करून राहतो. आखातामधील कतार हा असाच एक छोटासा देश. तेथे कामानिमित्त स्थायिक झालेल्यांची संख्या मूळ कतारी नागरिकांपेक्षा कितीतरी पट कमी. तरीही, या देशाने अशी काही कामगिरी केली आहे, की आज तेथील दरडोई उत्पन्न (पर कॅपिटा इन्कम) जगात सर्वाधिक समजले जाते. कतार एअरवेज ही त्यांची विमानसेवा जगातील सर्वोत्तमपैकी एक म्हणून उदयास आली. आज आपल्या आखाती भावंडांपासून काहीसा दूरावला असतानाही कतार स्वतःच्या हिमतीवर आगेकूच करतो आहे.

एखाद्या राष्ट्राचा कायापालट कसा होऊ शकतो, याचे आदर्श उदाहरण म्हणजे संयुक्त अरब अमिराती, म्हणजेच यू.ए.ई. मध्ययुगीन परंपरांचा पगडा असतानाही या अरब देशाने कात टाकली. दुबई आज एक आंतरराष्ट्रीय महानगर म्हणून ओळखले जाते. जगभरातील पर्यटक दुबईकडे आकर्षित होतात. स्वच्छता, टापटीप आणि शिस्त हे गुण येथील समाजाने अंगीकारले आणि तंत्रज्ञानाची कास धरली. जगातील अत्याधुनिक तंत्रज्ञान, उपकरणांचे दुबईत दर्शन होतेच होते. केवळ पर्यटनच नव्हे, तर उद्योग-व्यवसाय करण्यासाठीही दुबईला प्राधान्य दिले जाते.

येथे उल्लेखलेले देश, तेथील शहरे आज जगात अत्यंत प्रगत, अग्रगण्य आहेत. या सर्वांमधील साम्य म्हणजे गुणवत्तेला न्याय देण्याबरोबरच शिक्षण व आरोग्य यांना दिले जाणारे महत्त्व. व्यक्तीला समाजात प्रगती साधण्यासाठी हवी असणारी संधी येथे अगदी शालेय स्तरापासून दिली जाते. त्यात कोणताही भेद नसतो. आरोग्य ही बाबदेखील अत्यंत प्राधान्याने घेतली जाते. बहुतांश प्रगत देशांमध्ये रुग्णालयांमध्ये उपचार करताना कोणताही भेद केला जात नाही. तुमच्या बेडशेजारी असणारा रुग्ण करोडपती आहे की गरीब, यावरून उपचार, औषधे ठरत नाहीत. प्रत्येकाच्या जिवाला तेवढेच महत्त्व आहे. नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी एक प्रकारे सरकार आणि तेथील व्यवस्थाच घेते. आपल्याकडे असणारे चित्र पाहता, हा फरक प्रकर्षाने जाणवतो.

अजूनही अशा कितीतरी शहरांचा, देशांचा उल्लेख करता येईल, ज्यांचे स्वतःचे काही वैशिष्ट्य आहे. देश आकाराने लहान असो वा मोठा, जेथील संस्कृती, लोक तुमच्या मनात अधिक वास करतात, सदैव काही भव्यदिव्य करण्याची प्रेरणा देतात, तोच खऱ्या अर्थाने महान देश असतो. या सर्व देशांचे आकार, त्यांच्या भाषा, खाद्यसंस्कृती, पेहराव यांत खूप फरक आहे. मात्र, एक साधर्म्य नक्कीच आहे. त्यांनी मला त्यांच्या लोकांत स्थान दिले आणि तेथील लोकांच्या, समाजाच्या रूपाने माझ्याही मनात स्थान निर्माण केले. मनाला जेव्हा केव्हा मरगळ वाटेल, तेव्हा केव्हाही यांतील कोणत्याही देशाची एखादी आठवण, वैशिष्ट्य समोर आणावे आणि नव्या ऊर्जेने कामाला लागावे... मन समृद्ध करतानाच आपल्या मनाचा आकारही विशाल करायला लावणाऱ्या या अनुभवांचा हाच सांगावा!



**सुनील चव्हाण**
मुक्त पत्रकार
व कृषी अभ्यासक

महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन तीन वर्षांनी ६० वर्षे पूर्ण होतील. स्थापनेच्या वेळी नवमहाराष्ट्रापुढे राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, उद्योग आणि शेती क्षेत्रांचे अनेक प्रश्न होते. इतिहासाने आपल्या राज्यापुढे अनेक अडचणी निर्माण करून ठेवल्या होत्या. बऱ्याच अंशी त्या आपण दूर सारल्या. या काळात आपण विकास केला नाही, असे नाही. मात्र, विकासाच्या व्याख्येत सर्वंकष विकास अपेक्षित असतो. 'एखाद-दुसऱ्या क्षेत्राचा विकास झाला म्हणजे प्रगती झाली म्हणजे विकास होतो, असे नाही. 'संतुलित प्रगती म्हणजे विकास' अशी व्याख्या पहिले मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांनी केली होती.

# महाराष्ट्राच्या शेतीचे भवितव्य

संपूर्ण देशाचा विचार करता ६८ टक्के जनता अजूनही खेड्यांमध्ये रहाते. ३२ टक्के लोकसंख्या शहरी आहे. २०३० पर्यंत हे प्रमाण अनुक्रमे ६० व ४० टक्के असे होण्याचा अंदाज आहे. थोड्याफार फरकाने हीच टक्केवारी राज्याची आहे. शेती क्षेत्र आजही महाराष्ट्राचे प्रमुख क्षेत्र आहे. महत्त्वाची बाब म्हणजे शेतीक्षेत्र कुंठीत झाले असले तरी ५६ टक्के जनतेचे पोट अजूनही या क्षेत्रावर अवलंबून आहे.

राज्यातील कृषी क्षेत्राची ताजी आकडेवारी पाहिली तर १ कोटी ३८ लाख अधिकृत (ज्यांच्या नावावर शेतीचा सात-बारा उतारा आहे.) शेतकरी आहेत. खातेफोड किंवा हिस्से झाले नसल्याने हा आकडा कमी दिसतो. वास्तवात साडेपाच ते पावणेसहा कोटी जनता शेतीवर अवलंबून आहे. दरडोई शेतीचे प्रमाणे अडीच एकरांच्या आत आहे. एकूण शेतीपैकी ८२ टक्के शेती कोरडवाहू (पावसाच्या पाण्यावर अवलंबून) आहे. त्यापैकी ५२ टक्के क्षेत्र सतत दुष्काळाच्या छायेत आहे. म्हणजे दहापैकी चार वर्षे या ठिकाणी दुष्काळ असतो. हवामानातील बदलांमुळे दुष्काळाची तीव्रता आणि वारंवारिता वाढत आहे. वारसा हक्कांमुळे शेतजमिनीची विभागणी होत असल्याने जवळपास सर्वच शेतकरी अल्प किंवा अत्यल्प भूधारक आहे. भूमिहीन शेतकऱ्यांची संख्याही खूप मोठी आहे. कमी उत्पादकता, उत्पादनातील अस्थिरता, वाढता उत्पादनखर्च, बाजारभावातील चढउतार यांमुळे शेतकरी मेटाकुटीला आले आहेत.



ही पार्श्वभूमी असताना पुढील २५ वर्षांनंतर शेतीचे चित्र काय असेल किंवा असले पाहिजे, हा महत्त्वाचा विषय आहे. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यापासून एक प्रश्न सतत कायम आहे. तो म्हणजे, शेतीचे

आधुनिकीकरण. उत्पादकता वाढविल्याने शेतकऱ्यांचे प्रश्न सुटतील, असे म्हणणे योग्य नाही. आधुनिकीकरणाच्या बाबतीत आपण इतर राज्यांच्या तुलनेत खूप मागे आहोत, हे कबूल केले पाहिजे. महाराष्ट्राची सिंचनक्षमता जेमतेम १७ टक्के आहे. म्हणजे उपलब्ध जमिनीपैकी फक्त १७ टक्के जमिनीला सिंचनाच्या सुविधा आहेत. या बाबतीत आपला क्रमांक देशात शेवटून दुसरा आहे. शेवटी केरळ आहे. दुसरी बाजू म्हणजे देशात सर्वाधिक धरणे महाराष्ट्रात आहेत. हा प्रचंड विरोधाभास आहे.

महाराष्ट्र खूप प्रगत राज्य आहे, अशी फुशारकी आपण मारतो. परंतु मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक सोडले तर महाराष्ट्रात आहे काय? ओसाड मैदाने, ५२ टक्के सतत दुष्काळी पट्ट्यातील शेतजमीन, आणि अभिमान बाळगावा असे जुने किल्ले. अजूनही ८२ टक्के क्षेत्र पावसावर अवलंबून आहे. असा आपला गरिबीचा संसार आहे. खेड्यांकडे पाहिले तर असे दिसते की जवळपास सगळा समाज शेतीच्या मूलभूत उद्योगावर आधारलेला आहे. यातून भूमिहीनांच्या प्रश्नासारख्या अनेक सामाजिक कटकटी निर्माण झाल्या.

विदर्भ आणि मराठवाडा हा महाराष्ट्राचा विस्तीर्ण प्रदेश. एकूण जिल्ह्यांपैकी १९ म्हणजे निम्म्याहून अधिक जिल्हे या प्रदेशात आहेत. विदर्भ आणि मराठवाड्यात दरडोई शेतीचे प्रमाण अन्य प्रदेशाच्या तुलनेत अधिक आहे. शेती हाच इथला मुख्य व्यवसाय आहे. असे हे प्रदेश अजूनही भावनेने महाराष्ट्राशी एकरूप झालेले नाहीत. स्वतंत्र विदर्भाची भावना राज्य स्थापनेपासून आहे. आजही ती प्रबळ आहे. सहनशील मराठवाडाही ती भाषा करू पहात आहे. हे कशाचे लक्षण आहे? या पार्श्वभूमीवर एकविसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या शेतीकडे पहायचे असेल तर या प्रदेशातील शेतीचे चित्र बदलले पाहिजे. त्यासाठी काही प्रमुख उपाय तातडीने केले पाहिजेत. सर्वप्रथम शेतीमधील सिंचनक्षमता आगामी काळात १७ टक्क्यांवरून किमान ४० टक्के तरी झाली पाहिजे. कापूस, सोयाबीन, मका, तूर, ऊस, ज्वारी या पिकांमध्ये अनेक अडचणींवर मात करून उत्पादनात आघाडी घेतली आहे. फलोत्पादन पिके - द्राक्षे, डाळिंब, संत्रा, मोसंबी, केळी, आंबा, पेरू, काजू, कांदा-टोमॅटो, भाजीपाला पिके आणि फूलशेती यामध्ये महाराष्ट्राचा ठसा देशभर आहे. तरीही शेतकरी अडचणीत का, असा प्रश्न विचारला जाईल. त्याचे उत्तर म्हणजे आपली बाजारव्यवस्था शेतकऱ्याला धार्जिणी नाही. ती आधी दुरुस्त केली पाहिजे. ती सुधारणे शेतकऱ्यांच्या आवाक्यात नाही. काही प्रमाणात पश्चिम महाराष्ट्र व कोकणातील शेतकऱ्यांनी आपल्या बळावर या प्रश्नावर मात केली. त्यामुळेच या प्रदेशातील तालुके विदर्भ-मराठवाड्यातील जिल्ह्यांपेक्षा प्रगत आहेत. हीच बाब शेतीमधील गुंतवणुकीची. शेतीमध्ये गुंतवणूक केल्याशिवाय हे क्षेत्र पुढे जाऊ शकणार नाही. ही गुंतवणूक सार्वजनिक की खासगी हे शासनाने ठरवावे. तिसरी बाब म्हणजे आधुनिक तंत्रज्ञान. तुकड्यातुकड्यांत विभागलेल्या शेतीची उत्पादकता वाढवायची असेल तर शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वेगाने वाढविला पाहिजे. मशागत, पेरणी, अंतरमशागत, फवारणी, काढणी, मळणी, प्राथमिक प्रक्रिया, साठवण, वाहतूक व विक्री अशा प्रत्येक टप्प्यांवर अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित यंत्रांची गरज आहे. शेतीत ट्रॅक्टर आला म्हणजे यांत्रिकीकरण झाले हा खोटा समज आहे. वर उल्लेखलेल्या प्रत्येक टप्प्यावर यांत्रिकीकरणाची गरज आहे. चौथा उपाय म्हणजे तुकड्यांमध्ये विभागली गेलेली शेती सामूहिक शेती स्वरूपात कसली गेली पाहिजे. शासनाने शेतकरी उत्पादक कंपन्या किंवा गटशेतीच्या माध्यमातून शेतकरी व त्यांची उत्पादने यांचे एकत्रीकरण (ॲग्रिगेशन) करून उत्पादक आणि पणन (मार्केटिंग) कंपन्या यांचे थेट व भक्कम संबंध (लिंकेज) स्थापित करणे आवश्यक आहे. या प्रमुख उपायांनी शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनास योग्य मोबदला मिळून त्यांची क्रयशक्ती वाढू शकेल. क्रयशक्ती वाढणे हे विकासाचे मोठे परिमाण आहे.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे खेड्यांमधील शेती न करणाऱ्या वर्गाला शहरांमध्ये आणले पाहिजे. हे विस्थापन नियोजनबद्ध असले पाहिजे. आज सुरू असलेले नागरीकरण हे अपरिहार्यतेतून आले आहे. दुसरा पर्याय असा आहे, की खेड्यांमध्ये निव्वळ शेतीवर आधारलेल्या समाजासाठी कृषी-उद्योग अधिक वाढले पाहिजेत. असे प्रयत्न झाले तर खेडे हे खेडे उरणार नाही. खेडे आणि शहर, खेडे आणि नगर यामधील अंतर हे कृत्रिम आहे ते दूर झाले पाहिजे. शेतीमधून निर्माण होणाऱ्या गोष्टींवर औद्योगिक प्रक्रिया करणे म्हणजे कृषी-औद्योगिक समाज नाही. अजून आपल्या खेड्यांमध्ये १२-१२ तास वीज नसते. 'आर्थिक जीवनात विजेची शक्ती नसेल तर तर खेड्यांचे जीवन आपण बदलू शकणार नाही', असे लेनिनने कित्येक वर्षांपूर्वी सांगून ठेवले आहे. वीज, रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण आणि स्वच्छता या मूलभूत बाबी शहरांमध्ये निदान उपलब्ध होतात. खेड्यांमध्ये काय? लोकशाही कारभारात महत्त्वाचे सूत्र असते की नुसते न्यायाने वागून भागत नाही, तर न्याय मिळत आहे, अशी भावना तयार व्हावी लागते. आपल्याला न्याय मिळतो आहे, ही खेड्यांतील शेतकऱ्यांची भावना तयार होत नाही तोवर काही खरे नाही. पुढच्या २५ वर्षांचा 'रोडमॅप'पुढे ठेवून त्यातून कसा मार्ग काढतो, यावर महाराष्ट्राच्या शेतीची भरभराट आणि उत्कर्ष अवलंबून आहे.




# रेरा

## बांधकाम प्रकल्पाचे अंदाजपत्रक (Estimate) व प्रमाणपत्र (Certificate)



**मराठी बांधकाम व्यावसायिक असोसिएशन, म्हणजेच एमबीव्हीएच्या रेरा व जीएसटी समितीतर्फे ८ जून २०१७ रोजी 'रेरा' कायद्याअंतर्गत विविध प्रकारची प्रमाणपत्रे कशी तयार करावीत, याबद्दल माहितीपर सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले.**

रेरा कायद्याअंतर्गत 'महारेरा' (महाराष्ट्र रिअल इस्टेट रेग्युलेटरी अथॉरिटी) या प्राधिकरणाची मुंबईत स्थापना करण्यात आली. यामध्ये महाराष्ट्रातील प्रत्येक रिअल इस्टेट प्रकल्पाची नोंदणी करणे आवश्यक आहे. बांधकाम प्रकल्पांच्या नियंत्रणासाठी व मुख्यतः ग्राहकांकडून घेतलेली रक्कम बांधकाम व्यावसयिक योग्य त्या कामांसाठी वापरत आहेत का, यावर देखरेख ठेवण्यासाठी सदर प्राधिकरणाची नेमणूक करण्यात आली आहे. रेरा कायद्यानुसार ग्राहकांकडून घेतलेल्या रकमेपैकी ७०% रक्कम एका वेगळ्या बँक खात्यात जमा करण्याचे बंधन बांधकाम प्रकल्पाच्या प्रवर्तकावर (Promoter) असून या खात्यातून कोणतीही रक्कम काढताना प्रथम आर्किटेक्ट, इंजिनिअर व चार्टर्ड अकाउंटंट यांचे प्रमाणपत्र घ्यावे लागते. सदर प्रमाणपत्रात प्रमाणित केलेल्या रकमेपेक्षा अधिक रक्कम काढता येत नाही. या तिन्ही प्रमाणपत्रांमध्ये अचूकता येण्याकरिता संपूर्ण प्रकल्पाचे तपशीलवार अंदाजपत्रक तयार करावे लागते.

संस्थेच्या सभासदांना या नवीन विषयासंदर्भात खुलासेवार मार्गदर्शन मिळावे म्हणून या सादरीकरणाचे नियोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम दोन सत्रांत पार पडला. प्रथम सत्रात 'प्रकल्पाचे अंदाजपत्रक कसे तयार करावे?' याविषयी इंजिनिअर श्री. आर. बी. चाफळकर यांनी तपशीलवार सादरीकरण केले. तसेच, रेरा कायद्याअंतर्गत प्रमाणपत्रे कशी तयार करावीत, याविषयी आर्किटेक्ट शिरीष केंभावी, इंजिनिअर आर. बी. चाफळकर व चार्टर्ड अकाउंटंट श्रीधर पाठक यांनी आपापले सादरीकरण केले. द्वितीय सत्रात याच विषयासंबंधित आर्किटेक्ट शिरीष केंभावी, इंजिनिअर आर. बी. चाफळकर, चार्टर्ड अकाउंटंट श्रीधर पाठक व ॲड. संकेत बोरा या तज्ज्ञांसमवेत चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या तज्ज्ञांनी बांधकाम व्यावसायिकांच्या व इतर आर्किटेक्ट, इंजिनिअर व चार्टर्ड अकाउंटंट यांच्या शंकांचे निरसन केले. तसेच, एमबीव्हीएचे अध्यक्ष गजेंद्र पवार व माजी अध्यक्ष राजेंद्र पाटे यांनी मनोगत व्यक्त केले.

## प्रथम सत्र : प्रकल्पाचे अंदाजपत्रक कसे करावे?

**सादरकर्ते: इंजिनिअर श्री.आर.बी. चाफळकर**

- कोणताही रिअल इस्टेट प्रकल्प नोंदविण्यासाठी व बांधकामासाठी बँकेतून पैसे काढण्यापूर्वी या आर्किटेक्ट, इंजिनिअर व चार्टर्ड अकाउंटंटचे प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे.
- ग्राहकांकडून घेतलेल्या रकमेपैकी ७०% रक्कम एका वेगळ्या बँक खात्यात जमा केली जाते. ही रक्कम बँकेतून काढण्यासाठी आर्किटेक्ट, इंजिनिअर व चार्टर्ड अकाउंटंट यांच्याकडून बांधकाम व्यावसायिकांनी प्रत्येकी एक, अशी तीन प्रमाणपत्रे मिळविणे आवश्यक आहे.
- आर्किटेक्ट हे बांधकामाचे टप्पे तपासतील व त्याप्रमाणे बांधकाम व्यावसायिकाला त्याचे प्रमाणपत्र देतील.
- इंजिनिअर हे आजपर्यंतच्या बांधकामाला, त्यांच्या अंदाजपत्रकानुसार नेमका किती खर्च आला, हे तपासतील व त्याप्रमाणे बांधकाम व्यावसायिकाला प्रमाणपत्र देतील.
- चार्टर्ड अकाउंटंट हे बांधकामाचा खर्च, जमिनीचा खर्च व इतर खर्च अशाप्रकारे एकूण खर्चाचा हिशोब मांडतील व त्याप्रमाणे बांधकाम व्यावसायिकाला प्रमाणपत्र देतील.
- या तिन्ही प्रमाणपत्रांसाठी प्रथम प्रकल्पाची अंदाजे रक्कम म्हणजेच अंदाजपत्रक (Estimation) ठरविणे गरजेचे असते.
- या सर्व गोष्टींसाठी आर्किटेक्ट, इंजिनिअर व चार्टर्ड अकाउंटंट यांची प्रमाणपत्रे असणे अत्यंत गरजेचे आहे व ती कशी तयार केली जातात, याची पद्धत माहिती करून घेणे आवश्यक आहे.
- म्हणूनच संस्थेने पहिल्या सत्रात रिअल इस्टेट प्रकल्पाचे अंदाजपत्रक (Estimation) कसे तयार करावे, यावर इंजिनिअर आर. बी. चाफळकर यांचे मार्गदर्शन-सादरीकरण आयोजित केले.
- आर्किटेक्ट व्यावसायिकांनी प्रमाणपत्र कसे तयार करावे, याचे मार्गदर्शन आर्किटेक्ट शिरीष केंभावी यांनी केले.
- तर अभियंत्यांनी (इंजिनिअर) त्यांचे प्रमाणपत्र कसे तयार करावे, याबद्दल श्री. आर. बी. चाफळकर यांनी सखोल मार्गदर्शन केले.
- चार्टर्ड अकाउंटंट श्रीधर पाठक यांनी सी.ए. प्रमाणपत्र कसे तयार करावे, याची माहिती दिली.

## द्वितीय सत्र : चर्चासत्र

- द्वितीय सत्रामध्ये वरील विषयावरच आधारित तज्ज्ञांसमवेत प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम पार पडला.

या चर्चासत्रात आर्किटेक्ट शिरीष केंभावी, इंजिनिअर आर. बी. चाफळकर, चार्टर्ड अकाउंटंट श्रीधर पाठक व ॲड. संकेत बोरा यांनी बांधकाम व्यावसायिक, कार्यालयीन कर्मचारी व सर्व बांधकाम व्यावसायिकांचे आर्किटेक्ट, इंजिनिअर, चार्टर्ड अकाउंटंट यांच्या शंकांचे निरसन केले.
बांधकाम व्यावसायिक मिलिंद देशपांडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाच्या नियोजनात श्री. मिलिंद देशपांडे यांच्याबरोबरच एमबीव्हीएचे विद्यमान अध्यक्ष श्री. गजेंद्र पवार, माजी अध्यक्ष श्री. राजेंद्र पाटे, उपाध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर घाटे, विश्वस्त श्री. अंकुश आसबे, विश्वस्त श्री. आर. बी. चाफळकर, आर्किटेक्ट श्री. शिरीष केंभावी, आर्किटेक्ट श्री. हेमंत साठे, आर्किटेक्ट श्री. सुनील हिंगमिरे, सीए श्री. सुहास बोरा, सीए श्री. रणजीत नातू, सीए श्री. श्रीधर पाठक, इंजिनिअर श्री. बाळ कुलकर्णी, ॲड. संकेत बोरा यांनीदेखील मोलाचे योगदान दिले.

**सामान्य ग्राहकांना रेरासंदर्भात सखोल माहिती व बांधकाम प्रकल्पाबाबत संपूर्ण माहिती मिळवायची असल्यास** maharera.mahaonline.gov.in **या संकेतस्थळाला भेट द्यावी.**







# जीएसटीअंतर्गत विक्रीवरील परिणाम व अर्थलाभ

मराठी बांधकाम व्यावसायिक असोसिएशन, अर्थातच एमबीव्हीएच्या रेरा व जीएसटी समितीतर्फे २३ जून २०१७ रोजी जीएसटीसंदर्भातील मार्गदर्शनपर कार्यक्रम घेण्यात आला. कोणत्याही बांधकाम प्रकल्पाचा GST अंतर्गत Cost Benefit (खर्च लाभ) कसा मोजायचा व तो ग्राहकांपर्यंत कोणत्या पद्धतीने पोचवायचा, याची सखोल माहिती या कार्यक्रमात देण्यात आली. कार्यक्रम दोन सत्रांत पार पडला. या कार्यक्रमात प्रामुख्याने बांधकाम व्यावसायिक व चार्टर्ड अकाउंटंट मोठ्या संख्येने हजर होते. सदर कार्यक्रमात तज्ज्ञ चार्टर्ड अकाउंटंटनी उपस्थितांच्या शंकांचे निरसन केले. सीए श्री. महेश बांद्रे, सीए श्री. निशांत मुंदडा व सीए श्री. विकास खरे या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. तसेच, एमबीव्हीएचे अध्यक्ष श्री. गजेंद्र पवार यांनी मनोगत व्यक्त केले.



### प्रथम सत्र -
### 'जीएसटी'अंतर्गत किमतीतील सवलत व विक्रीवरील परिणाम (Sales impact of cost benefit under GST)

- या सत्रात, बांधकाम प्रकल्पाच्या किमतीमध्ये जीएसटी लागू केल्यापासून त्याचा विक्री किमतीवर काय परिणाम झाला, याची माहिती देण्यात आली.
- तसेच, जीएसटीनंतर बांधकाम प्रकल्पाच्या किमतीतील सवलतीवर त्याचा काय परिणाम झाला, या संदर्भात सखोल मार्गदर्शन करण्यात आले.
- या सत्रात Cost Benefit (खर्च लाभ) कसा काढायचा व त्यानंतर त्याचा विक्रीवर काय परिणाम होतो, याबद्दल उपयुक्त माहिती काही प्रत्यक्ष उदाहरणांवरून चार्टर्ड अकाउंटंट महेश बांद्रे व रेरा व जीएसटी समितीचे प्रमुख श्री. मिलिंद देशपांडे यांनी दिली.
- तज्ज्ञांनी कार्यक्रमाला उपस्थित सर्व व्यावसायिकांच्या शंकांचे निरसन केले व योग्य मार्गदर्शन केले.





## द्वितीय सत्र - चर्चासत्र

- द्वितीय सत्रामध्ये जीएसटीअंतर्गत खर्चाचा लाभ (Cost Benefit) व विक्रीवरील परिणाम या विषयावर मान्यवर तज्ज्ञांच्या सोबत प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम झाला.
- या जीएसटीविषयक चर्चासत्रात प्रामुख्याने चार्टर्ड अकाउंटंटना सहभागी करून घेण्यात आले होते. सीए महेश बांद्रे, सीए निशांत मुंदडा व सीए विकास खरे यांनी उपस्थित बांधकाम व्यावसायिक व त्यांचे चार्टर्ड अकाउंटंट तसेच कार्यालयीन कर्मचारी यांना सखोल मार्गदर्शन केले.
- यानंतर प्रश्नोत्तरांचे सत्र पार पडले व तज्ज्ञांनी उपस्थितांचे शंका निरसन केले.

बांधकाम व्यावसायिक मिलिंद देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले व कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाच्या नियोजनात श्री. मिलिंद देशपांडे यांच्या व्यतिरिक्त एमबीव्हीएचे उपाध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर घाटे आणि रेरा व जीएसटी समितीचे सभासद श्री. अभय केले, श्री. नितीन देशपांडे व श्री. जितेंद्र पेठकर यांनीदेखील मोलाचे योगदान दिले.





# वसुंधरेचं धन... वृक्षारोपण!



वसुंधरेचे संवर्धन व प्रदूषणमुक्त पर्यावरण ही काळाची गरज आहे. या भावनेतून एमबीव्हीए विविध उपक्रमांतून नेहमीच कार्यरत असते. याचाच एक भाग म्हणून मराठी बांधकाम व्यावसायिक असोसिएशन (एमबीव्हीए) व पुणे मेट्रोपोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने ४ जुलै २०१७ रोजी भुकूम येथे वृक्षसंवर्धनासाठी वृक्षारोपण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यास पीएमआरडीएचे  महानगर आयुक्त श्री. किरण गित्ते, पीएमआरडीएचे अधिकारी श्री. विवेक खरवडकर, एमबीव्हीचे संस्थापक श्री. एस. आर. कुलकर्णी, अध्यक्ष श्री. गजेंद्र पवार, माजी अध्यक्ष श्री. राजेंद्र पाटे उपस्थित होते. त्याचबरोबर एमबीव्हीचे इतर सभासद व पीएमआरडीएचे सदस्य आदी मान्यवर कार्यक्रमास उपस्थित होते. वृक्षारोपण सोहळ्याच्या निमित्ताने गायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.














# जीएसटीचा वेध घेताना...

मराठी बांधकाम व्यावसायिक असोसिएशन म्हणजेच एमबीव्हीएतर्फे २५ जुलै २०१७ रोजी 'वस्तू व सेवा कराचा (जीएसटी) बांधकाम व्यवसायावरील परिणाम' विषयावर एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात जीएसटी म्हणजेच 'वस्तू व सेवा कर' याविषयी सखोल माहिती देण्यात आली व त्याचा बांधकाम व्यवसायावर भविष्यात होणारा परिणाम स्पष्ट करण्यात आला. या कार्यक्रमात टॅक्स इन्सोल्युशन प्रायव्हेट लि.चे अध्यक्ष श्री. दीपक नाईक यांनी 'जीएसटीचा बांधकाम व्यवसायावर होणारा परिणाम' या विषयावर सादरीकरण केले. या वेळी श्री. सुनील जवळेकर व एमबीव्हीएचे अध्यक्ष श्री. गजेंद्र पवार हे उपस्थित होते.

**सदर कार्यक्रमात पुढील विषयांचा आढावा घेण्यात आला व चर्चा करण्यात आली :**

- वस्तू व सेवा कराचे प्राथमिक स्वरूप व रचना
- वस्तू व सेवा कराची प्राथमिक संकल्पना
- वस्तू व सेवा कराचे प्रकार - राज्य शासनाचा वस्तू व सेवा कर केंद्र शासनाचा वस्तू व सेवा कर, एकात्मिक वस्तू व सेवा कर व केंद्र शासित प्रदेशांचा वस्तू व सेवा कर
- वस्तू व सेवा कर नियमावली
- वस्तू व सेवा करामध्ये समाविष्ट केलेले व न केलेले इतर कर
- वस्तू व सेवा कराची प्रस्तावित रचना
- बांधकाम व्यवसायासंबंधी वस्तू व सेवा कराची व्याप्ती व मालाचे दर
- जीएसटी व आयटीसी (Input Tax Credit)
- वस्तू व सेवा कर लागू झाल्यानंतरचे बांधकाम व्यवसायातील मागणी व पुरवठा
- वस्तू व सेवा करातील बांधकाम व्यवसायविषयक काही तरतुदी व काही नवीन संकल्पना
- वस्तू व सेवा कर आणि बांधकाम व्यवसायातील विकास व पुनर्विकास
- बांधकाम व्यवसायाला वस्तू व सेवा करामधून मिळणाऱ्या सवलती व सूट
- बांधकाम व्यवसायात वस्तू व सेवा करासंदर्भात आवश्यक असलेली कागदपत्रे
- वस्तू व सेवा कर लागू झाल्यानंतर बांधकाम व्यवसायातील बदलते दर व खर्च
- बांधकाम व्यवसायाच्या इतर करप्रणालीत वस्तू व सेवा करामुळे झालेले बदल
- बांधकाम व्यवसायात वस्तू व सेवा करामुळे विक्री व विपणनावर (Marketing) परिणाम

वरील विषयांवर श्री. दीपक नाईक यांचे सादरीकरण झाले. यानंतर बांधकाम व्यावसायिकांच्या शंकांचे निरसन नाईक यांनी केले.

# Impact of Revised Earthquake Design Codes on Building

On 19th August, 2017, there was a seminar called 'Impact of Revised Earthquake Design Codes' organized. It was arranged by MBVA at a convenient location in the Pudumjee Hall, Tilak Road. The purpose of the seminar was to come up with some new solutions that can contribute in building the industry in a better way. With huge participation from the audience sharing the same interest this seminar was a huge hit.

Er. Ojas Joshi was anchoring the program which needless to say was impeccable. The opening speech was made by Mr. Nandkumar Ghate while Mr. Gajendra Pawar expressed his views on the said subject. The JW consultants Er. Umesh Joshi and Er. Achyut Watve made a thorough and studious presentation on the topic. It was certainly an eye opener for the members that gave a better insight about impact on planning aspects of the buildings and cost implications. Furthermore, Chairman of ISSE Er. Dhairyashil Khairepatil and Secretary Er. Kishor Jain along with other members of ISSE also attended the seminar. There was a good response from the members and technical staff on such seminar which eventually has encouraged Managing Committee to come up with such more technical seminars in near future as well.

Such seminar serves a meaningful purpose to the society. Certainly, small changes can bring a big difference and this was once such initiative that was made. With the vote of thanks Mr. Pranav Mate concluded the program.









## मराठी बांधकाम व्यावसायिक असोसिएशन

# वार्षिक सर्वसाधारण सभा २०१६-१७

मराठी बांधकाम व्यावसायिक असोसिएशनची २०१६-१७ सालातील वार्षिक सर्वसाधारण सभा ही २२ ऑगस्ट २०१७ रोजी शेरटन ग्रँड येथे खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. यानंतर एमबीव्हीएचे संस्थापक श्री. एस. आर. कुलकर्णी, एमबीव्हीएचे अध्यक्ष श्री. गजेंद्र पवार, कार्याध्यक्ष श्री. जितेंद्र सावंत, उपाध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर घाटे, कोषाध्यक्ष श्री. प्रमोद पाटील व माजी अध्यक्ष श्री. राजेंद्र पाटे यांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन करण्यात आले.

२०१६-१७ सालच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षपदी श्री. गजेंद्र पवार यांना नियुक्त करण्यात आले.

एमबीव्हीएचे सदस्य कै. अरुण साने व वास्तुविशारद कै. सुभाष टकले यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. श्री. संदीप कोलटकर यांनी सभेचे सूत्रसंचालन केले.

### २०१५-१६ सालच्या सभेचे इतिवृत्त व त्यातील काही ठळक मुद्दे -

- २०१५-१६च्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये श्री. सुधीर दरोडे यांची सभेच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली होती व २०१४-१५च्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील इतिवृत्त कायम करण्यास परवानगी दिली.
- आर्थिक वर्ष २०१५-१६ सालच्या लेखापरीक्षण अहवालाला मान्यता व मंजुरी देण्यात आली.
- २०१६-१७ सालासाठी मे. एच.एन.व्ही. अँड कंपनी यांची लेखापरीक्षक म्हणून निवड करण्यास मान्यता देण्यात आली.
- २०१६-१७ सालासाठीचे अंदाजपत्रक मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली.

## अध्यक्षांनी वर्षभरातील उपक्रमांचा घेतलेला आढावा -

२०१६-२०१७ या वर्षात अनेक स्थित्यंतरे झाली. यावर्षी जाहीर झालेल्या नोटबंदी, जीएसटी, रेरा, डेव्हलपमेंट प्रोग्रॅम यांमुळे बांधकाम व्यवसायावर परिणाम झाला. यंदाच्या वर्षी असोसिशनने तब्बल १८ कार्यक्रमांचे आयोजन केले होते. सभेमध्ये, अध्यक्षांनी २०१६-१७ या कार्यकाळात घेण्यात आलेल्या



सर्व कार्यक्रमांचा आढावा घेतला. 'परिवर्तनातील वाट' या कार्यक्रमाद्वारे रेरासंबंधित कार्यक्रम घेण्यात आला. असोसिएशनमध्ये संघटीत व असंघटीत क्षेत्रातील सदस्य असल्याने त्यांना मार्गदर्शन करणे गरजेचे होते, त्यासाठी अभ्यासगटाची स्थापना करण्यात आली. एमबीव्हीएची ओळख म्हणून सदस्यांना मेंबर्स सर्टिफिकेट देण्यात आली.

यानंतर महाराष्ट्राचे अर्थमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्याबरोबर चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बांधकाम व्यावसायिकांची त्यांच्यासोबत पर्यावरण व वृक्षलागवड याबाबत मुख्य चर्चा झाली. याचदरम्यान केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्याशी भेट झाली व बांधकाम व्यावसायिकांच्या सद्यस्थितीबाबत चर्चा करण्यात आली. बांधकामाच्या ठिकाणी होणारे अपघात टाळण्यासाठी व बांधकाम व्यावसायिकांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी यासाठी 'साईट आपली, सुरक्षा आपली' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

तरूण बांधकाम व्यावसायिकांसाठी एमबीव्हीए युथ ची स्थापना करण्यात आली. या कार्यक्रमात सकाळचे संचालक श्री. प्रताप पवार यांना मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. त्यानंतर नोटबंदी जाहीर झाल्यानंतर त्यासंदर्भातील कार्यक्रम घेण्यात आला, ज्या मध्ये श्री. मुकेश येवले हे मार्गदर्शक होते. रेरा व रेरा प्रमाणपत्र या महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शनपर कार्यक्रम घेतला. जीएसटीसंदर्भात २ चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले. पीएमआरडीएचे आयुक्त श्री. किरण गित्ते यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

अभ्यासदौरा हा एमबीव्हीएच्या वार्षिक उपक्रमातील महत्वाचा भाग. मागच्या वर्षी हा अभ्यासदौरा यशस्वीपणे इस्त्राईलला जाऊन आला आणि आता यावर्षीचा अभ्यासदौरा अझरबैजान येथे आयोजित करण्यात आला आहे. एमबीव्हीएकडून सर्व अनेक शासकीय कार्यालयांना भेटी दिल्या जातात व असोसिएशनबद्दल माहिती दिली जाते. अखेरीस श्री. पवार यांनी संघटनेची कार्यकारिणी, सर्व समित्यांचे प्रमुख व सभासदांचे आभार मानले व संघटनेच्या विस्ताराची इच्छा व्यक्त केली.

## विशेष चर्चासत्र

**वार्षिक सर्वसाधारण सभेत 'ओपन हाऊस' चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात जीएसटी, रेरा यांचा बांधकाम व्यवसायावर झालेला व होणारा परिणाम तसेच इतर अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. या विविध मुद्द्यांवर मार्गदर्शन करण्यासाठी या क्षेत्रातील तीन तज्ज्ञांना आमंत्रित करण्यात आले होते. एमबीव्हीएचे संस्थापक एस. आर. कुलकर्णी, माजी अध्यक्ष राजेंद्र पाटे आणि व्यवस्थापन समितीचे सदस्य अंकुश आसबे या तज्ज्ञांचा सहभाग होता.**



### एस. आर कुलकर्णी

नोटबंदी, डिपी, पी.एफ, जीएसटी, रेरा याचा बांधकाम व्यवसायावर जरी बरा-वाईट परिणाम झाला किंवा होत असला तरी आपण मराठी माणसं या गोष्टींना सामोरे जाण्यासाठी सक्षम आहोत. मार्च, एप्रिलनंतर मार्केटमधील स्थिती नक्कीच सुधारेल, यात पूर्णपणे बदल होईल. बांधकाम व्यावसायिकांनी व्यवसाय करताना काही पथ्य पाळणे आवश्यक आहेत. स्वत:च्या यशाला किंवा अपयशाला आपणच जबाबदार असतो. आपण कधीही दुस-यांना दोष देऊ नये. प्रामाणिक राहून आपले काम करीत रहावे. त्याचप्रमाणे आपण महत्वाकांक्षी व ध्येयवादी असले पाहिजे, पण हव्यास असता कामा नये. या गोष्टी त्यांनी लक्षात घेतल्या पाहिजेत. एमबीव्हीएच्या सर्व सभासदांनी एकत्र येऊन सल्लामसलत करून व्यावसायिकांच्या समस्या सोडविल्या पाहिजेत. त्यासाठी समविचारी लोकांनी एकत्र आले पाहिजे. एकत्र येऊन व्यवसाय करणे ही आजच्या काळाची गरज आहे व त्यासाठी एमबीव्हीएसारख्या संघटनेची स्थापना करण्यात



आली आहे. बांधकाम व्यावसायिकांनी स्वत:च आपले फायनान्सर झाले पाहिजे. ज्याच्याकडे जमीन आहे त्यांनी प्रकल्पासाठी गुंतवणूकदार शोधावेत. व्यावसायिकांनी वेळेच्या आधीच कर्ज फेडले पाहिजे व कर्जमुक्त व्हायला पाहिजे.

बांधकाम व्यावसायिकांनी 'ब्रेक इव्हन' ही संकल्पना नीट समजून घेऊन ती आपल्या व्यवसायात आमलात आणली पाहिजे. ब्रेक इव्हन म्हणजे तुम्हाला बांधकामाला येणारा खर्च आणि तुमच्या एकूण प्रकल्पांचा बांधकामाचा खर्च आणि तुमची घरे विकल्यानंतर तुम्हाला मिळणारा एकूण नफा, तसेच डिस्ट्रेस सेल या सर्वांचा तपशील म्हणजे ब्रेक इव्हन. बांधकाम व्यावसायिकांनी आपले बॅलन्सशीट रोज अपडेट ठेवावे. आपण एकमेकांबद्दल फक्त चांगले बोलावे आणि चांगला विचार करावा. कोणाबद्दलही वाईट बोलू नये किंवा विचार करू नये. अशी पथ्ये जर व्यावसायिकांनी पाळली तर ते चांगल्यारीतीने आपला व्यवसाय करू शकतील.

---



## राजेंद्र पाटे

काळाप्रमाणे आपण बदलले पाहिजे. काळाप्रमाणे बांधकामाच्या पध्दतीही बदलत गेल्या. त्यामुळे व्यावसायिकांनीही त्या पध्दती आमलात आणणे आवश्यक आहे. आज व्यवसायामध्ये वेगवेगळी मॉडेल्स उपलब्ध आहेत ती तपासून बघा. त्यातले तुम्हाला कुठले उपयुक्त आहे ते पहा. आपण आपला व्यवसाय वाढवण्याच्या दृष्टीने विचार करा. प्रकल्पासाठी गुंतवणूकदारांकडून घेतलेल्या किंवा कर्ज घतलेल्या पैशांचा दुरूपयोग करू नये.

व्यावसायिकांनी आपल्या कुटंबाला आपल्या कामाबद्दल माहिती दिली पाहिजे, कारण व्यवसायात त्यांचेही सहकार्यही आवश्यक आहे. त्यांच्यापाशीही काही गोष्टी किंवा अडचणी व्यक्त केल्या पाहिजेत. व्यावसायिकांनी आपल्या कामाचे व पैशाचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. या व्यवसायाकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पहा. व्यवसायात व्यावसायिकांना येणा-या अडचणी किंवा महत्वाच्या गोष्टींवर तज्ञांशी किंवा मार्गदर्शकांशी चर्चा केली पाहिजे व त्यांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. आपण कठीण परिस्थितीला सामोरे जाऊन त्यावर मात करून आपण आपले वेगळे मॉडेल तयार केले पाहिजे. असे केल्याने आपल्याला नक्कीच यश मिळेल.

---



## अंकुश आसबे

आजच्या काळात बांधकाम व्यायसायिकांना जमिनीबरोबरच खेळते भांडवल महत्वाचे आहे. कोणताही प्रकल्प हाती घेताना काही गोष्टींचा प्रामुख्याने विचार केला पाहिजे त्यामध्ये कोणत्या व्याजदराने किती कर्ज घ्यावे, आपल्या प्रकल्पामध्ये किती नफा मिळण्याची शक्यता आहे, एकावेळी किती प्रकल्प हाती घेतले पाहिजेत आणि प्रत्यक्षात तेवढी विक्री आहे का याचा विचार करणे आवश्यक आहे. ज्या प्रकल्पासाठी कर्ज काढलय त्याच प्रकल्पासाठी ते वापरावे, त्याचा उपयोग दुसऱ्या प्रकल्पासाठी करू नये. प्रकल्पाला जेवढे पैसे लागणार आहेत तेवढ्या पैशांची सोय झालीच पाहिजे त्याशिवाय प्रकल्प सुरु करू नये. रेरा कायद्यामुळे बँकांकडून सहजपणे कर्ज मिळू शकते. ज्या बँकेतून कमीत कमी व्याजदराने कर्ज मिळत आहे तिथूनच कर्ज घ्यावे. बांधकाम व्यावसायिकांनी स्वत: साईटवर जाऊन काम कसे चालले आहे ते पाहिले पाहिजे, त्यातून किती पैसे वाचून किती नफा मिळू शकतो याचा अंदाज येईल. प्रकल्पाचा प्लॅन कसा आहे, प्रकल्पाची किंमत किती आहे, डिझाईन कसे आहे याही गोष्टी आपण पाहणे आवश्यक आहे. या सर्व गोष्टींमुळेच बांधकाम व्यावसायिक व्यवसायात टिकू शकतात आणि आपले काम वेळेत पूर्ण करू शकतात.

बांधकाम प्रकल्पांसाठी बँका कमी व्याजदाराने कर्ज देण्यास तयार आहेत. पण त्यासाठी बांधकाम व्यावसायिकांचे ट्रॅक रेकॉर्ड चांगले हवे. बांधकाम व्यावसायिकांना कायद्याचे सखोल ज्ञान असणे आवश्यक आहे.

**मराठी बांधकाम व्यावसायिक असोसिएशनसंदर्भात अधिक माहितीसाठी भेट द्या - www.mbva.in**








**मोहन कलाटे**
बांधकाम व्यावसायिक




फ्लेम टॉवर्स, हॉक

# तिसऱ्या जगाची एक अद्भूत सफर..!


मराठी बांधकाम व्यावसायिक असोसिएशनची स्थापना मा. श्री. एस. आर. कुलकर्णी यांनी केली. एमबीव्हीएचे विद्यमान अध्यक्ष श्री. गजेंद्र पवार हे आहेत. असोसिएशन विविध प्रकारे मराठी बांधकाम व्यावसायिकांना मार्गदर्शन करत असते. याचाच एक भाग म्हणून एमबीव्हीए दरवर्षी अभ्यासदौऱ्याचे आयोजन करते. असोसिएशनचा अभ्यासदौरा आयोजित करण्यामागचा उद्देश हा त्या-त्या देशातील बांधकाम व्यावसायिक कशा प्रकारे व्यवस्थापन करतात, त्यांच्यासमोरील आव्हाने काय आहेत व त्यांवर ते काय उपाययोजना आखतात हे समजून घेणे, हा आहे. एमबीव्हीए नेहमीच वेगवेगळ्या देशांत अभ्यासदौरा आयोजित करण्यासाठी प्रयत्नशील असते. नेहमीप्रमाणे याही वर्षी मराठी बांधकाम व्यावसायिक असोसिएशनतर्फे एमबीव्हीएच्या सदस्यांसाठी आंतरराष्ट्रीय अभ्यासदौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. अभ्यासदौऱ्याचे आयोजन ७ सप्टेंबर २०१७ ते १३ सप्टेंबर २०१७ यादरम्यान करण्यात आले होते. या वर्षीचा अभ्यासदौरा हा पूर्वी सोविएत रशियाचा भाग असलेले, पण आता स्वतंत्र झालेले लहानसे देश



हैदर अलीयो म्युझियम, बाकू




जस्टिस बिल्डींग, बातुमी




अझरझू ऑफिस टॉवर्स, बाकू


क्रिस्टल हॉल, बाकू


बाकू व्हाईट सिटी, बाकू


बाकू ऑलिम्पिक स्टेडियम, बाकू


अली-निनो, बातुमी


अल्फाबेटिक टॉवर, बातुमी


तिब्लीसी ब्रिज, जॉर्जिया

अझरबैजान व जॉर्जिया येथे गेला होता. हे लहान देश व त्यांच्या सुंदर राजधान्या हे खास वैशिष्ट्य आहे.

प्रथम अझरबैजानची राजधानी बाकू येथे अभ्यासदौरा पोहोचला. बाकूला हैदरअली एअरपोर्टवर पोहोचल्यावर जाणवले, की १९९१ साली स्वतंत्र झालेला हा देश अत्यंत विकसित आहे. तसेच, तेथील पायाभूत सुविधा या अतिशय पुढारलेल्या आहेत. बाकूमधील झाआ हदीद या जगविख्यात आर्किटेक्टने बनवलेल्या हैदरअली सेंटरला भेट दिली. ही वास्तू संपूर्ण स्टील स्ट्रक्चरमधील आहे. येथील बाकू ऑलिम्पिक स्टेडियम हे जगातील सर्वोत्कृष्ट स्टेडियम आहे. तसेच, बाकूमधील क्रिस्टल हॉल हा आधुनिक वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. या देशात मुस्लिम धर्मीय बहुसंख्य आहेत. अझरबैजान हा देश शांतताप्रिय व संयमी असून, आंतरराष्ट्रीय दर्जाची विकासकामे या देशाने केलेली आहेत. अझरबैजानला गेल्यावर तेथील भारताचे राजदूत संजय राणा यांची सदस्यांशी भेट झाली. या भेटीत त्या देशाचा विकास, प्रगती, नैसर्गिक साधनसंपत्ती या विषयांवर चर्चा करण्यात आली. त्याचबरोबर, तेथील अनेक क्षेत्रांतील व्यावसायिकांशी एमबीव्हीएच्या सदस्यांची भेट व चर्चा झाली आणि एकमेकांची आव्हाने त्यांनी समजून घेतली.

यानंतर अभ्यासदौरा जॉर्जिया या देशात पोचला. तिब्लीसी हे शहर या देशाची राजधानी. हा देश सोविएत युनियनमधून बाहेर पडल्यामुळे काही प्रमाणात तेथे प्रगतीला वाव कमी मिळाला आहे. या देशात नैसर्गिक साधनसंपत्ती, डोंगराळ भाग मुबलक प्रमाणात आहे; पण राजकीय ओढाताणीमुळे येथील जनतेचे काही प्रमाणात नुकसान झालेले दिसते. येथील लोकांना काचापुरी व वाईन यांचे विशेष आकर्षण आहे. सदस्यांनी तिब्लीसी येथील एका वाईन फॅक्टरीला भेट दिली व त्यानंतर येशू ख्रिस्ताचे अखेरच्या क्षणी अंगावर असलेले कपडे जिथे पुरले होते, त्या चर्चला भेट दिली.

बातुमीला जाताना दिसून आले, की या देशात बहुसंख्य लोक प्रतिकूल परिस्थितीत



मराठी बांधकाम व्यावसायिक असोसिएशनचे सदस्य अझरबैजान-इंडिया कंस्ट्रक्शन फोरममध्ये.

राहत असून, मुख्यत्वे शेतीवरच अवलंबून आहेत. समुद्रकिनाऱ्यावर असलेले जॉर्जिया देशातील बातुमी हे शहर आर्थिक व पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे केंद्र आहे. बातुमीच्या समुद्रकिनाऱ्यावर अली व निनो या ऐतिहासिक प्रेमवीरांचे बनवलेले हलते स्टील स्ट्रक्चर देशाची ओळख बनलीय. बातुमी शहरात आंतरराष्ट्रीय दर्जाचा किमान ८ किमीचा समुद्रकिनारा उत्कृष्ट सोयीसुविधांनी युक्त असा तयार करण्यात आला आहे. यामुळेच आजूबाजूच्या देशांतील पर्यटक मोठ्या प्रमाणात बातुमीच्या समुद्रकिनाऱ्याकडे आकर्षित होतात.

या अभ्यासदौऱ्यात अनेक ओळखी झाल्या, अनेक अद्‌भुत गोष्टी बघायला मिळाल्या, उत्कृष्ट वास्तुशिल्पे बघितली. दुसऱ्या देशातील समाजजीवन बघायला मिळाले. विचारांची देवाणघेवाण करण्यात आली व अनेक चांगले अनुभव गाठीशी धरून यशस्वी असा हा अभ्यासदौरा पार पडला. या अभ्यासदौऱ्याची दखल तेथील स्थानिक वृत्तपत्रांनीदेखील घेतली. आरोहन ट्रॅव्हल्स्च्या आदिती भेंडे व तेथील त्यांच्या सहकारी मंडळींनी अभ्यासदौऱ्याचे उत्कृष्ट नियोजन केले होते. सर्व सदस्यांनी तेथील स्थानिक खाद्यपदार्थ व चहा यांचा आनंदाने आस्वाद घेतला. अभ्यासदौऱ्याचे यशस्वीपणे आयोजन करणारे असोसिएशनचे अभ्यासदौरा प्रमुख श्री. संदीप कोलटकर, कोषाध्यक्ष श्री. प्रमोद पाटील व अनिश रुईकर,आरोहन ट्रॅव्हल्स्च्या आदिती भेंडे व सहकाऱ्यांचे विशेष आभार!

**अभ्यासदौऱ्याचे यशस्वी आयोजक**



संदीप कोलटकर



अनीश रुईकर



प्रमोद पाटील



बाकू व्हाईट सिटी प्रकल्पाची पाहणी करताना



अझरबैजान आंत्रप्रेन्युअर असोसिएशनचे प्रमुख यांचा सत्कार करताना एमबीव्हीएचे अध्यक्ष श्री. गजेंद्र पवार, सोबत अझरबैजानमधील भारताचे राजदूत श्री. संजय राणा

## Indian businessmen visited Baku White City

Members of the Indian Maratha Building Business Association, visiting Baku within the framework of the Azerbaijani-Indian business forum, came to Baku White City project.
The foreign guests were provided with detailed information about the project. It was noted that the territory known as the "Black City", polluted with oil products for many years, was completely ecologically refined, and in accordance with the new development plan a modern large residential community is being built.
The head of the delegation Gagendra Pavar, president of the business association, said that the Baku White City project is of great interest to Indian businessmen. Mr. Pavar noted that the purpose of the visit of the Indian delegation is to familiarize with the construction sector in Azerbaijan, and the delegation intends to expand investment relations between the two countries.

www.bakuwhitecity.com

## Indian Entrepreneurs got acquainted with Baku White City Project

Entrepreneurs of Indian Marathi Bandhkam Vyavasayik Association (MBVA) got acquainted with the Baku White City project, within the framework of India-Azerbaijan Construction Business Forum.
The guests were given detailed information about the project. They were informed that, the area, for many years known as "Black City" and polluted with oil products, ecologically completely cleared. In accordance with the new development project, the world's most up-to-date large living center is being created there, administrative and commercial facilities, recreational and tourism centers are being built.
Head of the delegation, president of the association Mr. Gajendra Pawar emphasized the interest of Indian businessmen to Baku White City project. He also stressed that, the visit of Indian delegation aims to get acquainted with the construction sector in Azerbaijan and to expand investment ties between the two countries.

September 18, AZERTAC

## Indian businessmen familiarize with Baku White City

Entrepreneurs of Indian Marathi Bandhkam Vyavasayik Association (MBVA) got acquainted with the Baku White City project, within the framework of India-Azerbaijan Construction Business Forum.
They were informed about the project and ongoing construction work. They were informed that, the area, for many years known as "Black City" and polluted with oil products, ecologically completely cleared. In accordance with the new development project, the world's most up-to-date large living center is being created there, administrative and commercial facilities, recreational and tourism centers are being built.
The masterplan for Baku White City aims to transform the area into a brand new, high quality urban quarter, acting as a catalyst for the regeneration of the city and the wider region.
The project is one of the major urban-planning projects carried out in Azerbaijan in respect of Decree of the President of the Azerbaijan Republic, Ilham Aliyev, entitled to "Comprehensive action plan for improving the ecological conditions in the Azerbaijan Republic during 2006 - 2010" and according to the order of the Executive Power of Baku City dated June 11, 2007.
Head of the delegation, President of the Association Mr. Gajendra Pawar emphasized the interest of Indian businessmen in Baku White City project.
Pawar further stressed that the visit of Indian delegation aims to get acquainted with the construction sector in Azerbaijan and to expand investment ties between the two countries.
The India-Azerbaijan Construction Business Forum organized by the National Confederation of Entrepreneurs (Employers') Organizations of Azerbaijan kicked off last week.
Last year the trade and economic exchanges between India and Azerbaijan progressed from strength to strength, increasing by 63 percent in 2016 as compared to 2015.
India has recently facilitated the visa application procedures for Azerbaijan.
From now on, Azerbaijani nationals would be able to get online e-Visa for visits to India for recreation, sightseeing, casual visit to meet friends or relatives, short duration medical treatment or casual business.

September 18, AZERNEWS

## Indian companies exploring business opportunities in construction field in Azerbaijan

Indian companies exploring business opportunities in construction field in Azerbaijan
The delegation consisting of members of Marathi Bandhkam Vyasayik Association (Maratha Construction Business Association) ( MBVA) visited Azerbaijan in order to explore possibilities of joint projects and mutual investment opportunities in Azerbaijan. During the visit, Indian businessmen were acquainted with architecture pieces in Baku, innovations in our country's construction sector and real estate market. For this purpose, Azerbaijan-India Business Forum was organized by the National Confederation of Entrepreneurs (Employers) of the Republic of Azerbaijan at Fairmont Baku Hotel. During the event, presentations were made on current state of entrepreneurship, investment and partnership opportunities in both countries and discussions held on future cooperation possibilities. to entrepreneurship, measures taken by ASK to attract foreign investments into to non-oil sector of the country and invited Indian businessmen for an active cooperation.
Mr. Vugar Zeynalov spoke about the development trends in the construction sector of Azerbaijan. He informed Indian businessmen about investment procedures, the privileges, as well as existing legislation in our country. Mr. Zeynalov noted that the main purpose of bringing together Azerbaijani and Indian businessmen is to explore opportunities for business cooperation, investment and trade in two countries. He added that joint cooperation would be useful in terms of expanding business relations, attracting mutual investment and establishing joint ventures.
Speaking on the occasion, Ambassador Extraordinary and Plenipotentiary of India to Azerbaijan H.E. Mr. Sanjay Rana touched upon the development of friendly relations between Azerbaijan and India. According to Ambassador, serious political, economic, cultural cooperation and exchange projects are being implemented between two countries. Noting that the Azerbaijani economy is attractive for Indian businessmen, he mentioned that a large number of Indian entrepreneurs are engaged in entrepreneurial activity in Azerbaijan. He also invited representatives Indian Marathi Bandhkam Vyasayik Association to take advantage of these opportunities. Ambassador emphasized that such meetings would have a positive impact on the further development of relation.
Economic and social development has accelerated the development of construction, urbanization and architecture. Mr. FexriAydemir noted that the country attaches special importance to the preservation and protection of national and historical heritage, urban planning, architectural monuments, natural-cultural landscape, and other reserve areas. It is possible to witness it more clearly in achievements of our country in the recent years, in construction and restoration of architectural monuments. Role of foreign architects are indispensable along with local architects in the preparation of the project documentation of the magnificent architectural facilities built in capital. As a result of the fusion of classic and modernity, Baku has been one of the most beautiful cities in the world.
According to Mr. Sandeep Kolatkar, General Secretary of the Indian Marathi Bandhkam Vyasayik Association, which has more than 350 members, he has traveled to many countries to get acquainted with innovations and trends in the real estate sector. The guest noted that rapid development in Azerbaijan was noticed by the members of the Association and they will get closely acquainted with the real estate sector innovations, the main architectural pieces of the city, urban development process and sustainable development models explore cooperation possibilities in construction.
The event continued with presentations and questions.
Then representatives of Indian construction companies visited Crystal Hall, Heydar Aliyev Center, Baku Olympic Stadium and other famous construction sites of Baku.

Azerbaijan Entrepreneur Confederation

# परवडणाऱ्या घरांसाठी 'अच्छे दिन'

**पहिल्या तिमाहीतच आठ प्रमुख शहरांतील उलाढाल चार ते सहा टक्क्यांनी वाढली**

पुणे - नोटाबंदीच्या निर्णयाला एक वर्ष पूर्ण होण्यास दीड महिना शिल्लक आहे; मात्र त्यापूर्वीच बांधकाम क्षेत्राला 'अच्छे दिन' येत असल्याचे दिसत आहे. २०१७-१८ या वर्षाच्या पहिल्या तिमाहीतच देशातील आठ प्रमुख शहरांतील सरासरी उलाढाल चार ते सहा टक्क्यांनी वाढल्याचे खासगी संस्थेच्या सर्वेक्षणातून समोर आले आहे. पुणे शहरातही १८ टक्के वाढ झाली आहे व त्यात प्रामुख्याने परवडणाऱ्या घरांचा समावेश आहे.

नोटाबंदीचा निर्णय गेल्या वर्षी आठ नोव्हेंबरला जाहीर झाल्यानंतर बाजारातील रोकड कमी झाली, त्यामुळे खरेदीदार आणि बांधकाम व्यावसायिकांना व्यवहार पूर्ण करण्यामध्ये अडचणी वाढल्या. त्यामुळे अनेक व्यवहार पुढे ढकलण्यात आले, तर नव्या प्रकल्पांच्या घोषणा थंडावल्या. मात्र, नव्या नोटांचा पुरवठा सुरळीत झाल्यानंतर आता बांधकाम व्यवसायाला 'अच्छे दिन' येण्यास सुरवात झाली आहे. नोटाबंदीचा प्रभाव ओसरला असून, आतापर्यंत देशामध्ये २८ टक्क्यांनी सदनिका विक्रीत वृद्धी झाली आहे. नोटाबंदीनंतर बँकांकडून कमी करण्यात आलेल्या व्याजदरामुळे, तसेच बांधकाम व्यावसायिकांनी किमती न वाढविल्यामुळे बांधकाम क्षेत्रात तेजी येण्यास मदत झाली आहे.

'लायसेस फोरास' या रिअल इस्टेट रिसर्च कंपनीने जाहीर केलेल्या अहवालानुसार, मागील वर्षाच्या तुलनेत यंदाच्या वर्षाच्या पहिल्या तिमाहीत कोलकता शहरातील बांधकाम क्षेत्राच्या उलाढालीत सर्वाधिक म्हणजे २७ टक्के वाढ झाली आहे, तर चेन्नईत तब्बल ३६ टक्क्यांनी घट झाली आहे.

### पुण्यातील सदनिका विक्री

| | |
|---|---|
| जानेवारी - मार्च २०१६ | ९३५५ |
| ऑक्टोबर - डिसेंबर २०१६ | ७७६२ |
| जानेवारी ते मार्च २०१७ | ९६२२ |

### विक्रीमधील वाढ सकारात्मक

एकूण सदनिका विक्रीपैकी १७ टक्के विक्री ही परवडणाऱ्या घरांची झाली आहे. परवडणाऱ्या घरांच्या बाबतीत देशामध्ये सर्वाधिक सदनिका 'एमएमआर'मध्ये (२५ टक्के) आणि त्यापाठोपाठ पुण्यात (१९ टक्के) विकल्या गेल्या आहेत. नोटाबंदी, वस्तू व सेवाकर आणि 'रेरा' कायद्याच्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर सदनिका विक्रींमध्ये वाढ होणे सकारात्मक लक्षण आहे. 'रेरा'अंतर्गत नोंदणी नसल्यास प्रकल्पांच्या जाहिरातीवर निर्बंध घालण्यात आले होते, तरीही सदनिका विक्रीत वाढ झालेली पाहायला मिळत आहे. आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सदनिका विक्रीतील या वाढीमध्ये गुंतवणूकदार व अनिवासी भारतीयांचे प्रमाण कमी आहे. म्हणजेच देशांतर्गत व गरजू व्यक्तींनीच बहुतांश प्रमाणात गृहखरेदी केल्याचे या अहवालात म्हटले आहे. बांधकाम क्षेत्राच्या दृष्टीने सदनिकांच्या किमती नियंत्रणात राहण्यासाठी याची मदत होईल, असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले.

सकाळ, सप्टेंबर २५, २०१७

---

# पुण्याच्या 'रिंग रोड'साठी नगररचना योजना!

मुंबइः पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या वतीने (पीएमआरडीए) राबविण्यात येणाऱ्या रिंग रोड प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी नगररचना योजना राबविण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

यावेळी पुण्याचे पालकमंत्री गिरीश बापट उपस्थित होते. रिंग रोडच्या प्रस्तावित आखणीतील बदलाबाबत व वाढीव रुंदीबाबतच्या बदलास महाराष्ट्र क्षेत्रीय आणि नगररचना अधिनियम १९६६ नुसार शासनाच्या दि.१७ एप्रिल २०१७ रोजीच्या अधिसूचनेनुसार मान्यता मिळाली आहे. प्रकल्पाची लांबी १२९ किमी. असून प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अंदाजे १७ हजार ४१२ कोटी रुपये इतका खर्च आहे.

रिंग रोडमधील हवेली, मावळ, मुळशी व खेड या चार तालुक्यातील ५८ गावांमधील सुमारे २ हजार ३७ गटामधील जागेचा यात समावेश आहे. रिंग रोडचे बांधकाम हे दोन टप्प्यात करण्याचे नियोजित आहे. प्रथम टप्प्यात चार पदरी रस्त्याचे बांधकाम ३.७५ किमी. लांबीच्या बोगद्याची कामे, ६ पुलांची कामे, टाऊनशीप मधील रस्त्याचे बांधकाम, टाऊनशीपमधील जमीन सपाटीकरण, पाणीपुरवठा व पथदिव्यांची कामे करण्याचे नियोजित आहे. तसेच दुसऱ्या टप्प्यामध्ये आठ पदरी रस्त्याचे बांधकाम, दोन्ही बाजूस सायकल ट्रॅकचे बांधकाम, दोन्ही बाजूस पादचारी मार्गाचे काम, विनामोटार वाहतुकीच्या सुविधा, आठ उड्डाण पूल, तीन रेल्वे उड्डाण पुलांचे काम, टाऊनशिपमधील अंतर्गत रस्त्याची कामे व टाऊनशीप मधील मूलभूत पायाभूत सुविधांची कामे यांचा समावेश राहील.

नगररचना योजनेतील सुमारे ५०० हे. इतकी जागा आर्थिक दुर्बल घटकासाठी राखीव ठेवण्यात येईल. त्यामुळे या घटकांना पुणे महानगर प्रदेश क्षेत्रात दोन लाखाहून अधिक घरे उपलब्ध होणार आहेत. नगर रचनेमुळे प्राधिकरण क्षेत्रात नियोजित विकास होणार आहे. बैठकीतील विविध विषयांचे सादरीकरण महानगर आयुक्त किरण गित्ते यांनी केले.

बैठकीस महापौर मुक्ता टिळक, पिंपरी-चिंचवडचे महापौर नितीन काळजे, मुख्य सचिव सुमीत मल्लिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव प्रविणसिंह परदेशी, महसूल, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव नितीन करीर, पुणे महानगरपालिकेचे स्थायी समिती अध्यक्ष मुरलीधर मोहोळ, पिंपरी- चिंचवड महानगर पालिकेच्या स्थायी समिती अध्यक्ष सीमा सावळे, पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी, पोलीस आयुक्त रश्मी शुक्ला, पुणे महानगरपालिका आयुक्त कुणाल कुमार उपस्थित होते.

सरकारनामा, जून २२, २०१७

# Government announces new PPP policy for private investments in affordable housing



MUMBAI: Taking its efforts to achieve 'Housing for All by 2022' further, the central government has announced a new public-private partnership (PPP) policy for affordable housing that allows extending central assistance of up to Rs.2.50 lakh per each house to be built by private builders even on private lands.

Under this policy announced by Minister of Housing & Urban Affairs Hardeep Singh Puri, eight PPP (Public Private Partnership) models have been provided for private sector to invest in affordable housing segment. It has also opened potential for private investments in affordable housing projects on government lands in urban areas.

While addressing real estate body NAREDCO's summit, Puri explained that this policy seeks to assign risks among the government, developers and financial institutions, to those who can manage them the best besides leveraging under-utilized and un-utilized private and public lands towards meeting the target of Housing for All.

The two PPP models for private investments in affordable housing on private lands include extending central assistance of about Rs 2.50 lakh per each house as interest subsidy on bank loans as upfront payment under the Credit Linked Subsidy Component (CLSS) component of Pradhan Mantri Awas yojana (Urban). Under the second option, central assistance of Rs 1.50 lakh per each house to be built on private lands would be provided, in case the beneficiaries do not intend to take bank loans.

Puri also added that last week he has announced a time bound review of FSI/FAR norms in 53 cities with a population of million and above each and State capitals to enable better utilization of scarce urban land parcels.

Online mechanism for time bound approvals for building plans and construction permits has already been introduced in Mumbai and Delhi and the same would happen soon in additional 53 cities with population of above one million each, he said.

The Economic Times, Sep 21, 2017

# Reforms such as RERA, REITs and easier FDI norms main draw: Experts

MUMBAI: Foreign institutional investors have raised their game in the Indian real estate market and the offshore investor base is on the rise as a new set of investors, including pension funds and sovereign wealth funds from countries such as Canada, Netherlands, Qatar and Singapore, are increasing their stake in Indian real estate.

The total annual investments into Indian real estate from foreign investors have consistently outpaced their domestic counterparts, and in the past couple of years, the gap has widened further. Since 2016, foreign investors have invested close to $9 billion, against $2.1 billion by Indians.

Among foreign investors, participation from a few countries such as Canada, Hong Kong, the Netherlands and Qatar have gained prominence over traditional investors like Singapore and the United States. Overall, these countries have gained around 24% additional market share."The strength of the Indian economy and favourable demographics, coupled with the introduction of several growth-oriented reforms including Real Estate (Regulation and Development) Act, 2016; Real Estate Investment Trusts; Goods and Services Tax; relaxation of Foreign Direct Investment (FDI) norms, etc., are aiding the real estate sector to attract higher investments," said Neeraj Bansal, Partner and Head, ASEAN Corridor, Building, Construction and Real Estate, KPMG in India.

The investment since 2016 by foreign funds has mostly been in commercial assets such as office space, warehouse and retail. However, investors from Hong Kong as well as Indian domestic institutions have largely allocated capital towards residential projects. "While PE funds continue to be bullish about India, there's a growing interest from foreign pension funds and sovereign wealth funds, which have more than doubled their investments in year-to-date 2017, accounting for nearly 60% share ($3 billion) of total investments as of date," said Bansal. Since last year, pension funds have invested more than $1.7 billion in Indi an real estate sector and have emerged as the second largest investor after private equity players. On the other hand, sovereign wealth funds, which were investing around $700-800 million on an annual basis in India since 2014, have deployed about $1.7 billion this year.

While pension funds have been primarily interested in taking up warehousing, retail and to some extent office assets, SWF have mostly invested in office space, and to some extent, residential. Both categories prefer investing mostly in Metro and Tier 1 cities.

With improved transparency and governance in the sector, the funding from banks may enhance on the back of reduced risk.

The Economic Times, Sep 23, 2017

# गृहबंध

गृहबंध हे न्यूजलेटर मराठी बांधकाम व्यावसायिक संघटनेच्या (एम.बी.व्ही.ए.) वतीने २०१४मध्ये मराठी नववर्ष चैत्र प्रतिपदेच्या मुहूर्तावर सुरु करण्यात आले. अल्पावधीत, गृहबंध हे सर्व सभासद, हितचिंतक तसेच सर्वसामान्य वाचकांच्या पसंतीस उतरले. त्याचे वितरण सभासदांखेरीज, महापालिकेपासून मंत्रालयापर्यंत महत्त्वाच्या व्यक्तींना केले जाते. एम.बी.व्ही.ए.च्या कार्याचा प्रसार व प्रचार करतानाच समाजातील, उद्योगक्षेत्रातील विविध मान्यवरांचे निरनिराळ्या विषयांवरील विचारही आपण त्यांच्या लेखांच्या माध्यमातून प्रसिद्ध करतो.

गृहबंधाच्या आगामी अंकासाठी सभासदांनी आपले स्वलिखित लेख, प्रतिक्रिया तसेच जाहिरात द्यावयाची असेल, तर जाहिरातीचे आर्टवर्क mbvabulletin@gmail.com या ई-मेलवर पाठवावे. जाहिरात व मजकुराच्या प्रसिद्धीबाबतचा अंतिम निर्णय संपादन समितीचा असेल. गृहबंधमध्ये जाहिरात देणे सशुल्क असून जाहिरातीच्या आर्टवर्कसह जाहिरात मूल्याचा धनादेश संघटनेच्या कार्यालयात पोहोचता करावा. आपल्या सहभागातूनच हा उपक्रम पुढे जाणार आहे, यासाठी सर्व सभासदांना हे विनम्र आवाहन.

बुलेटिन कमिटी

गृहबंध हे न्यूजलेटर मराठी बांधकाम व्यावसायिक असोसिएशनच्या वतीने खासगी वितरणासाठी मराठी बांधकाम व्यावसायिक असोसिएशन, ऑफिस नं.२०१, दुसरा मजला, प्रो-१ बिझनेस सेंटर, रत्ना मेमोरिअल हॉस्पिटल समोर, सेनापती बापट रोड, पुणे - ४११ ०१६ येथे प्रकाशित केले.

संपादक : श्री. नितीन ढेपे, प्रकाशक : श्री. गजेंद्र पवार (अध्यक्ष, बुलेटिन कमिटी, मराठी बांधकाम व्यावसायिक असोसिएशन)

संकल्पना, मांडणी व प्रकल्प व्यवस्थापन : संतोष देशपांडे (मिडियाक्युरा इन्फोलाइन : ९९२३३२२६४४)

मराठी बांधकाम व्यावसायिक असोसिएशन संपर्क: ०२० ६५७०६५७१, www.mbva.in

टीप : या न्यूजलेटरमध्ये प्रसिद्ध झालेल्या कोणत्याही प्रकारच्या मजकुराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखांमध्ये वापरण्यात आलेली छायाचित्रे प्रातिनिधिक वा प्रतिकात्मक आहेत.

# THINK REAL ESTATE
# FUNDING
# THINK POSIVIEW



## Posiview, Your Trusted Financial Advisor

With a successful track record of arranging funding for 100+ Real Estate projects, Posiview is one of India's leading real estate focused financial advisory companies. We offer you 360 degree services right from feasibility for selecting the best land parcels / projects, raising finance and monitoring the funds to ensuring timely repayment.

**Offering Customised 360° Services For Real Estate Sector**

Debt Funding for Ongoing Projects | Equity Funding for New Projects
Inventory / Project Completion Funding | Structured Funding Solutions
RERA Audit, Training & Advisory

posiview®
consulting partners
Leadership In Realty Finance

202, Chintamani Pride Bldg., Near City Pride Multiplex, Kothrud, Pune 411038
+91 91300 18000 | +91 20 6030 0202
md@posiview.in www.posiview.in
/PosiviewRealty /PosiviewConsultingPartners

www.onezeroeight.in

स्नेहाचा सुगंध दरवळला, विनंती आमची परमेश्वराला,
सौख्य, समृद्धी लाभो तुम्हाला, दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!